गुरुवार, २६ जानेवारी २०२३
किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१५६
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • THURSDAY 26 JANUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-156 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-14 • PRICE-5

# जामिया युनिव्हर्सिटीत राडा

## बीबीसीच्या वादग्रस्त डॉक्युमेंटरीचे स्क्रीनिंग : चार विद्यार्थ्यांना अटक

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : गुजरात दंगलीवर आधारित नुकतीच प्रदर्शित झालेली बीबीसीची एक डॉक्युमेंटरी सध्या वादग्रस्त ठरली आहे. काल दिल्लीच्या जेएनयूमध्येही त्यावरुन डावे आणि उजवे आमनेसामने आले. जेएनयूनंतर जामिया यूनिवर्सिटीमध्येही या डॉक्युमेंटरीमुळे वाद निर्माण झाला. जामिया यूनिवर्सिटीमधून डॉक्युमेंटरीच्या स्क्रीनिंगमुळे चार विद्यार्थ्यांना ताब्यात घेतले. दिल्ली पोलिसांनी सांगितले की, बुधवारी जामिया यूनिवर्सिटीच्या बाहेर बीबीसीच्या एका डॉक्युमेंटरीच्या स्क्रीनिंगमुळे गदारोळ झाला होता. याप्रकरणी चार विद्यार्थ्यांना ताब्यात घेण्यात आले आहे.**



बीबीसीच्या डॉक्युमेंटरीमुळे जे एन यू.. अर्थात जवाहरलाल नेहरु विद्यापीठ पुन्हा चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. यावेळी निमित्त आहे पंतप्रधान मोदींवरील बीबीसीच्या डॉक्युमेंटरीचे मंगळवारी या डॉक्युमेंटरीच्या स्क्रीनिंगवरुन जेएनयू विद्यापीठात पुन्हा डावे आणि उजवे आमनेसामने आले. स्क्रीनिंग होऊ नये यासाठी तब्बल तीन तास लाईट बंद ठेवल्या गेल्याचा आरोप आहे. लॅपटॉपवर दाखवायला सुरुवात झाली. अभाविपच्या विद्यार्थ्यांनी दगडफेक केल्याचाही आरोप केला आहे. इंडिया द मोदी क्वेश्चन ही बीबीसीची डॉक्युमेंटरी प्रदर्शित झाल्यापासूनच भारतात वादात आहे. केंद्र सरकारने ती युट्युबवरुन हटवली, ट्विटरवर कुणाला त्याबाबत प्रसारास बंदी करण्यात आलीय. याच डॉक्युमेंटरीचे स्क्रीनिंग करण्यासाठी डाव्या संघटनांनी तयारी सुरु केली. पण ज्या वेळेला ही डॉक्युमेंटरी दाखवली जाणार होती, त्याच्या अर्धा तास आधी विद्यापीठाच्या एक तृतीयांश कॅम्पसमधली लाईटच गायब झाली. 2002 च्या गुजरात दंगलीप्रकरणी बीबीसीची ही 59 मिनिटांची डॉक्युमेंटरी आहे. ब्रिटीश फॉरेन ऑफिसच्या अधिकाऱ्यांच्या हवाल्याने हा माहितीपट तयार करण्यात आला आहे. भाजप समर्थकांचे म्हणणे आहे की, सुप्रीम कोर्टाने याबाबत एकदा निर्णय दिल्यानंतर विदेशी मीडिया अजूनही यात मोदींना अडकवू पाहत आहे.

कालच हैदराबाद विद्यापीठातही बीबीसीच्या या डॉक्युमेंटरीचे स्क्रीनिंग करण्यात आले होते. त्यानंतर विद्यापीठाने आता संबंधितांना नोटीस बजावलीय. आता दिल्लीतल्या जामिया विद्यापीठातले विद्यार्थीही स्क्रीनिंगच्या तयारीत आहेत. कोलकाताच्या विद्यापीठातही मोठ्या स्क्रीनवर ही डॉक्युमेंटरी दाखवणार असल्याचे जाहीर करण्यात आले. त्यामुळे या डॉक्युमेंटरीवरुन सुरु झालेली वादाची ठिणगी पुढच्या काही दिवसात वाढतच जाण्याची शक्यता आहे.

## चर्चेतली बातमी

### शिक्षकांमध्ये संभ्रमासाठी 'जुन्या पेन्शन'चा डाव

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** जुनी पेन्शन योजना लागू करण्यास साफ नकार देणारे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आता मात्र योजना लागू करण्याची भाषा करत आहेत. जुनी पेन्शन योजना पुन्हा लागू करण्याची 'धमक' फक्त आपल्यातच आहे अशी फुशारकी मारायलाही त्यांनी कमी केले नाही. विधान परिषदेच्या शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या प्रचारादरम्यान शिक्षकांमध्ये संभ्रम निर्माण करण्यासाठी फडणवीस यांनी जुनी पेन्शन योजना लागू करण्याचे विधान केले असले तरी फडणवीस यांच्या कपटनितीची शिक्षकांनाही कल्पना आहेच. जुनी पेन्शन योजना लागू करण्याची 'धमक' आहे तर मग पाच वर्षे मुख्यमंत्री असताना देवेंद्र फडणवीस यांनी झोपा काढल्या काय? असा सवाल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केला आहे. यासंदर्भात बोलताना अतुल लोंढे म्हणाले की, केंद्रातील अटबलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारनेच २००३ साली जुनी पेन्शन योजना बंद करुन नॅशनल पेन्शन योजना (NPS) लागू केली असताना देवेंद्र फडणवीस धादांत खोटे बोलत त्याचे खापर काँग्रेस सरकारवर फोडत आहेत. भारतीय जनता पक्षाचे नेते आरएसएसच्या शिकवणुकीनुसार धादांत खोटे बोलण्यात पटाईत असतात, त्याप्रमाणे फडणवीस यांनी जुनी पेन्शन योजना बंद करण्याचे खापर काँग्रेसवर फोडले.

# पंतप्रधान मोदी- इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष अल-सीसी यांच्यात द्विपक्षीय चर्चा

## धोरणात्मक भागीदारीस दोन्ही देश नव्याने पुढे नेणार

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** यंदाच्या प्रजासत्ताक दिनाच्या



सोहळ्याला इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष अब्देल फतेह अल-सीसी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणार आहेत. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी गेल्या महिन्यात इजिप्तला दिलेल्या भेटीदरम्यान अब्देल फतेह अल -सीसी यांना भारताकडून औपचारिक आमंत्रण दिले होते. दरम्यान यंदा अल-सीसी हे प्रजासत्ताक दिनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून भारत आले असून, पंतप्रधान मोदींसोबत त्यांची बुधवारी द्विपक्षीय बैठक झाली आहे.

या बैठकीत दोन्ही देशांमधील धोरणात्मक भागीदारीस नव्याने पुढे नेण्यावर सहमती झाली. बैठकीनंतरच्या पत्रकारपरिषदेत परराष्ट्र सचिव विनय क्वात्रा म्हणाले की, दोन्ही नेत्यांमधील आजच्या चर्चेचा मुख्य मुद्दा द्विपक्षीय संबंधांना धोरणात्मक भागीदारीच्या रुपात पुढे नेणे आहे. ज्यामध्ये चार प्रमुख स्तंभ आहेत, राजकीय आणि सुरक्षा सहकार्य, आर्थिक सहभाग, वैज्ञानिक आणि शैक्षणिक सहकार्य, व्यापक सांस्कृतिक आणि लोकांमधील संपर्क यांचा समावेश आहे.

परराष्ट्र सचिवांनी माहिती दिली की, इजिप्तची सशस्त्र दलाची तुकडीही प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये सहभाग घेणार आहे. आज सकाळी अल -सीसी यांचे राष्ट्रपती भवनातील फोरकोर्टमध्ये औपचारिक स्वागत करण्यात आले, यानंतर परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी त्यांची भेट घेतली.

इजिप्तचे शिष्टमंडळ उद्या(गुरुवार) सायंकाळी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांची भेट घेणार आहे. भारताच्या प्रजासत्ताक दिनी प्रमुख पाहुणे म्हणून इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष अल-सीसी यांची भेट ही दोन्ही देशांमधील अनोखे द्विपक्षीय संबंध दर्शवते, असे क्वात्रो यांनी सांगितले. करोना संसर्गामुळे २०२१ आणि २०२२ या दोन वर्षी प्रजासत्ताक दिनाच्या सोहळयासाठी भारताकडून कोणत्याही देशाच्या नेत्याला प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले नव्हते.




# ढगाळ वातावरणाचा फळ पिकांना बसतोय फटका

## बागायतदार शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण

आधुनिक केसरी न्यूज

दादासाहेब घोडके

पैठण : थंडीच्या सुरुवातीला आंबा पिकासाठी अनुकूल वातावरण निर्माण झाल्यामुळे आंब्याला मोहोर चांगल्या प्रकारे आला होता. तसेच येथील फळबागा कैऱ्या धरण्याच्या स्थितीत असताना अचानक वातावरणात बदल झाल्यामुळे मोहोर काळवंडून जाण्याची शक्यता नाकारता येत नसून, कैऱ्याही गळून पडतील, असा अंदाज कृषी तज्ज्ञ तथा कृषी जगतचे संचालक रामेश्वर सुसे यांनी व्यक्त केला. आंब्याप्रमाणेच भाजीपाला, टरबूज, मोसंबी, शेवगा फळावरही या ढगाळ वातावरणाचा चांगलाच परिणाम होण्याची भीती बागायतदार व शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. मोसंबी, आंबा व शेवग्याच्या झाडांना यावर्षी चांगल्या प्रकारे मोहोर व शेंगाही आलेल्या असताना ढगाळ वातावरणामुळे हा मोहोर गळून जावुन मोसंबी सध्या तानावर सोडलेल्या असल्याने त्यांचा तान सुटण्याची भिती आहे.तर ज्या मोसंबीच्या बागा फुलोरा अवस्थेत आहेत त्याची फुल गळ झाल्यास मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होतु शकते त्यामुळे शेतकरी पुन्हा संकटात सापडला आहे.




माझी पैठण तालुक्यात दादेगाव शिवारात ६०० झाडे चार एकर क्षेत्रावर असुन मि साधारण पणे तिन अठवड्यापुर्वी बागेचा तान सोडला असुन आता नवीनच लागत असलेली फुले यांचे या ढगाळ वातावरणात संरक्षण कसे करावे हाच शेतकऱ्यांनपुढे मोठा प्रश्न आहे.



भागवत करमाडकर,
शेतकरी,दादेगाव,पैठण

# तीर्थ, तीर्थरूप आणि तीर्थक्षेत्र...




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

तेव्हा कृष्ण ते निमित्त करून त्यांना समजावून सांगतो की आपल्या मनाचेही तसेच आहे. नुसती तीर्थयात्रा केल्याने आपण पवित्र आणि मन शांत होत नाही. त्या ठिकाणी शरीरशुद्धी बरोबरच मनातील पापे, वाईट वासना सुद्धा नष्ट झाल्या पाहिजेत. आपले मन जर पवित्र आणि शुद्ध असेल तर तीर्थाला जाण्याची सुद्धा गरज नाही. प्रत्येकाने आपल्या धर्माचे पालन केले पाहिजे. धर्म म्हणजे कर्तव्य. जसे विद्यार्थ्यांचे कर्तव्य अभ्यास करणे, गुरुचे कार्य अध्यापन करणे, राज्यकर्त्यांचे कर्तव्य आपल्या राज्याकडे आणि प्रजेच्या कल्याणकडे लक्ष देणे. असे सांगून पांडवांना तो आपल्या कर्तव्याची जाणीव करून देतो. मंगेश पाडगावकर आपल्या एका गीतात म्हणतात, 'कुठे शोधिसी रामेश्वर अन कुठे शोधिसी काशी , हृदयातील भगवंत राहिला हृदयातून उपाशी..' त्याचा अर्थ हाच आहे. तर संत तुकाराम म्हणतात, 'तीर्थी धोंडा पाणी, देव रोकडा सज्जनीं..' म्हणजे सज्जन माणसांचे आचार विचार आणि वर्तन एकसमान असते. म्हणून जो बोलतो तसा चालतो त्याला वंदन केले पाहिजे. समाजातील अशा सज्जन व्यक्ती म्हणजे देवाचेच रूप असतात. त्यांच्या पाठीमागे जावे, त्यांचे अनुसरण करावे हे त्यांचे सांगणे आहे. सगळी तीर्थे आणि तीर्थक्षेत्रे माणसाच्या मनातच वसलेली आहेत. संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेव दोघेही विठ्ठलाचे निस्सीम भक्त. पण तरीही ज्ञानेश्वर महाराज जेव्हा तीर्थयात्रेला निघाले, तेव्हा त्यांनी नामदेवांना आपल्याबरोबर तीर्थयात्रेसाठी येण्याची विनंती केली. पण नामदेव महाराज विठ्ठलाला सोडून कुठेही जायला तयार नव्हते. तेव्हा प्रत्यक्ष विठ्ठलानेच नामदेवांना दृष्टांत देऊन ज्ञानेश्वरांबरोबर जा असे सांगितले. असे करण्यात त्यांचा उद्देश हा होता की नामदेव महाराजांना विठ्ठल मंदिराव्यतिरिक्त बाहेरही सर्वत्र विराजमान आहे ही जाणीव व्हावी . आपणही तीर्थयात्रेचा हा मतितार्थ लक्षात घेऊन ती केली तर फलदायी होईल. पांडव तीर्थयात्रेला गेले पण त्यांचा अभिमान गळाला नाही. ते श्रीकृष्णाने दिलेल्या लिंबाच्या काडीसारखे कोरडेच राहिले. आपणही तीर्थयात्रा जरूर करावी, रम्य ठिकाणे पाहावीत. पण सगळ्या वाईट वासना, अहंकार त्या तीर्थयात्रेतून गाळून आपले मन शुद्ध झाले पाहिजे. नाहीतर आपलीही गत त्या लिंबाच्या काडीसारखीच व्हायची.



## आनंदी पहाट



# विश्वास आश्वस्त नव्हे, तर आश्वस्थ करणारा असावा

आधुनिक केसरी

आपल्या आयुष्यांत येणारी माणसे ही झाडांच्या अवयवासारखी असतात. काही फांदीसारखी, जास्त जोर दिला तर तुटणारी; काही पानासारखी, अर्ध्यावर साथ सोडून देणारी; काही काट्यासारखी, सोबत असूनही टोचत राहणारी; आणि काही मात्र मुळासारखी, न दिसताही शेवटपर्यंत साथ देणारी, श्वास असेपर्यंत विश्वास टिकवून ठेवणारी. ही विश्वास टिकवून ठेवणारी माणसे प्रगल्भ विचारांची असतात. त्यामुळेच प्रगल्भ विचार, दिलदार मन लाभलेली कोणतीही व्यक्ती आकृती उरत नसते, तर ती स्वतःच एक कलाकृती बनून जगण्यापलीकडचे जीवन जगत असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अशी व्यक्ती आपल्या संस्कृतीचे स्मरण ठेवून स्वतःच्या प्रकृतीला अनुसरून समाजातील विकृतीकरण थांबवण्यात सक्रीय असते. यांतूनच कलाकृती साकारली जात असते, पाहायला मिळते. मैत्रीचे धागे हे कोळ्याच्या जाळ्यापेक्षाही बारीक असतात. पण लोखंडाच्या तारेहुनही मजबूत असतात. तुटले तर श्वासानेही तुटतील, नाहीतर वज्राघातानेही तुटणार नाहीत. विश्वसनीय मैत्रीच्या विश्वात मैत्रीचे नाते देखील असेच मजबूत असते आणि म्हणूच ते विश्वासावर निरंतर टिकून राहते. तहानलेला जीव आणि तहान भागवणारा जीव ह्यांना लांबून पाहणारा एक जीव लागत असतो. पण तो ही कसा असला पाहिजे तर, त्याला तहानेची आर्तता समजली पाहिजे आणि ती भागवणाऱ्याची क्षमताही. तो अस्वस्थता दूर करणारा आणि आश्वस्त करणारा, ज्याच्यावर पूर्णपणे विश्वास टाकता येईल असाच असला पाहिजे. आपण सगळेच जाणतो कि, हे संपूर्ण जग केवळ विश्वासावर कार्यरत आहे.जगांतील प्रत्येक नाते, व्यवहार, आपापसातील संबंध हे पूर्णपणे विश्वासाशी निगडीत असतात. म्हणूनच आश्वस्त करणारा विश्वास हा श्वासाइतकाच महत्वाचा असतो.



आधुनिक केसरी

मोक्षाचे आंदन | लाभो देवा ||
कैवलयाचे झाड | असावे अंगणी ||
आत्माराम मनी | वास करो ||१||
चंदनी उंबरा | असावा घराला ||
तोरण दाराला | चैतन्याचे ||२||
ओसरीत रांगो | बाळकृष्ण तान्हा ||
गोकुळीचा राणा | भाग्योदय ||३||
तुळशीने द्यावे | सौभाग्याचे लेणे ||
मांगल्याचे गाणे | जात्यावर ||४||
धेनु हंबरावी | वत्सास अधिर ||
गोरसाची धार | निरंतर ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर


खुशाल वर्णन करा स्वतःच्या गुणांचे पण दुसऱ्याच्या गुणांचाही आदर करा. दुसऱ्याच्या गुणांचे स्वागत आणि स्वतःच्या दोषांचे परिमार्जन करण्यास नेहमी तयार रहा.

सत्य नाकारणे, हरल्या मनाने स्वीकारणे, भ्रामक समजुतीने त्याला सामारे जाणे ही अवलक्षणे आहेत. सत्य हे सत्य म्हणूनच स्वीकारणे श्रेयस्कर होय.

आयुष्यात अनेक गोष्टी आपल्या सोबत सुंदर पर्याय घेऊन येतात पण काही गोष्टी इतक्या सुंदर असतात की, त्यांना पर्यायच नसतो.

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आधुनिक केसरी



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**विद्युत से गति चपल है, मन कर चाल अपार । इन्द्रिन संचालन करे, कर्म वर्ण विस्तार ।।२०।। (स्वर्वेद पंचम मण्डल द्वितीय अध्याय) ०५/०२/२०**


**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :** विजेपेक्षाही मनाची गती चपळ आहे तसेच मनाची चाल अपार आहे. ते इंद्रियांचं संचालन करून कर्म आणि वर्णांचा विस्तार करते. आत्मा याच कर्म आणि क्षर वर्णांमधे गुरफटून आपल्या चेतन स्वरूपाला आणि परब्रम्हाला प्राप्त न करता अनेक जन्मांपासून जन्म-मृत्यूच्या फेऱ्यारूपी दुःखाला प्राप्त करीत आहे.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

# अनुसंधानासाठी सतत नामस्मरण करावे


आधुनिक केसरी

नामस्मरण हे प्रपंचाकरिता, म्हणजे तो चांगला व्हावा म्हणून नाही, तर प्रपंचाची आसक्ती कमी करण्यासाठी आहे. तरी पण त्याने प्रपंच बिघडणार नाही. जे होईल ते आपल्या बऱ्याकरिता आहे असे मानून परमात्म्यावर विश्वास ठेवून राहावे. एक गृहस्थ मला भेटले तेव्हा म्हणाले, मी रिकाम्या वेळेत नामस्मरण करतो. त्यावर मी म्हटले, साऱ्या जन्मात महत्त्वाचा आणि सार्थकी लागलेला वेळ असेल तर तो हाच; त्याला तुम्ही रिकामा वेळ कसा म्हणता ? '' पुढे ते म्हणाले, '' प्रारब्धाचे भोग काही केल्या टळत नाहीत, ते भोगावेच लागतात, असे सर्व संत सांगतात. हे जर खरे, तर प्रारब्धाचे भोग आपण भोगत असताना त्यामध्ये भगवंताच्या स्मरणाची काय गरज आहे ? '' खरोखर हा प्रश्न अगदी बरोबर आहे. आपल्या कर्माचे भोग आपल्यालाच भोगावे लागतात हे खरे. पण भोग आले की, आपल्या मनाला चैन पडत नाही, तिथे मनाला भगवंताच्या स्मरणात गुंतवून ठेवले की आपले समाधान टिकते. आपल्या सध्याच्या अवस्थेमध्ये, 'भगवंताच्या इच्छेने घडायचे ते घडते असे मानणे, किंवा 'भगवंत चांगले करील' असा विश्वास ठेवून वागणे, हेच सोपे जाईल. हे दिसायला साधे दिसले तरी यात फार मोठे मर्म साठविले आहे हे ध्यानात धरा. 'भगवंताच्या इच्छेने घडणार ते घडू द्यावे' अशी निष्ठा उत्पन्न व्हायला त्याचे अनुसंधान सतत



ठेवले पाहिजे. ''आहे त्यात समाधान, आणि भगवंताचे अनुसंधान,'' एवढीच सद्‌गुरूची आज्ञा असते. दुसऱ्याने आपल्याला दुःख दिले असता आपले अनुसंधान चुकते ही त्याची नव्हे, आपली चूक आहे. 'विषय कसा सुटेल ? मन एकाग्र कसे होईल ?' हे न कळले तरी चालेल. सोडण्याच्या गोष्टीचा अभ्यास करण्यापेक्षा धरण्याच्या गोष्टीचा, म्हणजे अनुसंधानाचा, अभ्यास करावा. एक भगवंताचे अनुसंधान ठेवले की सर्व गुण आपोआपच वाढतील; ते कसे, तर शरीराचे अवयव सारख्या प्रमाणात वाढतात तसे. झाडाच्या मुळाला पाणी घातले की, त्याच्या सर्व भागांना ते पोहोचते, तसे भगवंताचा विसर पडू न दिला तर सर्व काही बरोबर होते. ''अज्ञानाच्या अंधकाराने दुःख भोगत असताना तू माझे स्मरण, माझे अनुसंधान ठेव, म्हणजे तुला पुढे उजेड दिसेल,'' असे गीतेमध्ये प्रत्यक्ष श्रीकृष्णच अर्जुनाला सुचवीत आहेत. दिवा जळायला हवा असेल तर त्यामध्ये सतत तेल घातले पाहिजे, तसे भगवंताचे अनुसंधान सारखे राहण्यासाठी त्याचे नामस्मरण आपण सतत करीत असावे. ज्याचे अनुसंधान अखंड टिकले, त्याचे खाणे, पिणे, उठणे, बसणे वगैरे सर्व क्रिया भगवंताची सेवाच बनतात. **आजचे बोधवचन आहे -** भगवंताचे अनुसंधान हे आपले ध्येय. त्याला अनुसरून बाकीच्या गोष्टी आपण करू या.

## काव्य-चरितावली



पुष्प ११वे

आधुनिक केसरी

सद्‌गुरुंच्या शोधाची तळमळ अंतरी
ओढ भेटीची ती मनात खोल खरी ।।
श्रीमहाराज साधू-सत्पुरुषांना भेटती
अध्यात्मिक अधिकारी ना भेटे कुणी
आशीर्वाद देती साधू- साधक हे सारे
श्रीमहाराजांना पुढे जाण्यास सांगती ।।
कृष्णा-वारणा संगमाकाठीच्या गावी
हरिपुरात त्यांना साध्वी राधाबाई भेटली
जा मिरजेला, अन भेटा अण्णाबुवाना
साध्वीने सूचना श्रीमहाराजांना केली ।।
मिरजेस भेट दोघांची जाहली खरी
आशीर्वादही अण्णाबुवांनी तो दिला
परमात्मा तुझे कल्याण करील "
आशीर्वाद घेऊन हो महाराज निघाले
सटाणे गावच्या देव-मामलेदाराकडे आले ।।
या ठिकाणी श्रीमहाराज बरेच राहिले
देव- मामलेदार एक दिवस मग म्हणाले
"अनुग्रह देण्याचा माझा अधिकार नाही
निरोप त्यांचा घेउनी श्रीमहाराज निघाले ।।
अक्षर-सेवा माझी गुरुराया गोड मानावी
कवी अरूणदासा लेखन प्रेरणा द्यावी ।।



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

आधुनिक केसरी

गुरुवार, २६ जानेवारी २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari



# सर्वांकडून व्हावी लोकशाही मूल्यांची जपणूक

## आधुनिक केसरी : लोकशाहीच्या विचारांचा जागर

आधुनिक केसरी

**आज आपण भारतीय प्रजासत्ताक दिनाचा 74 वा वर्धापनदिन साजरा करतो आहोत. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समता,स्वातंत्र्य आणि बंधुता यावर आधारित राज्य घटना देत लोकशाही प्रदान केली. परंतु समाजव्यवस्थेत या लोकशाहीचे सोयीस्कर पणे करण्यात आलेले अवमूल्यन अनेक प्रश्न उभा करीत आहे. आज भारताचा 74 वा प्रजासत्ताक दिन साजरा करताना निश्चितच मनामनांत आनंदासोबत अनेक प्रश्नांची धग कायम आहे. याच अमूल्य लोकशाही मूल्यांचा विचार सभोवताल पोहोचवा यासाठी आधुनिक केसरी यानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून लोकशाहीच्या विचाराचा जागर घडवित आहे खास वाचकांसाठी...**

### लोकशाहीत नवसृजनांचे प्रतिबिंब दिसेल का ?



भारतीय लोकशाहीचा वर्धापनदिन साजरा करताना लोकशाहीची झालेली दयनीय अवस्था बघून ओल्या दुःखाचे वारे मनात गुंजी घालत आहे. स्वातंत्र्य-समता-बंधुता ही समाजमूल्ये समाजमनात रुजविण्यासाठी तहहयात संघर्षरत राहिलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राजकीय लोकशाहीपेक्षा सामाजिक लोकशाहीला अधिक महत्व दिले. सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी बाबासाहेबांनी आपले सारे आयुष्य वेचले. मात्र गो-यांच्या गुलामगिरीतून मुक्त झालेला समाज स्वकीयांच्या शोषणातून मुक्त होऊ शकला नाही ही आजच्या घडीची खूप मोठी शोकांतिका आहे. आणि त्यामुळेच समाजात समतेच्या तत्वांची पेरणी पूर्णपणे होऊ शकली नाही. आणि म्हणूनच अर्थ व्यवस्थेतील भांडवलदारांनी ही समता प्रस्थापित होऊ नये यासाठी केलेले अटोकाट प्रयत्न आमच्या डोळयात खोलवर बोटे घालून जातात. शिक्षणाचे तीनतेरा, गोरगरिबांच्या कल्याणकारी योजनांची लूट, मूलभूत हक्कावर आणण्यात आलेली गदा, प्रादेशिकवाद,आरक्षणवाद, सीमावाद, भाषावाद, विभागीय विकासाचा असमतोल, आरोग्य सुविधांचा उडालेला बोजवारा, हुकुमशहांचा बोलबाला, आणि गलिच्छ राजकारणातील निंदानालस्ती इत्यादीमुळे राष्ट्रीय भावनेला खीळ बसत गेली. लोकशाहीतील नव्या जाणिवांसाठी नवनिर्मितीची वज्रमूठ बांधावी लागणार आहे. लोकशाहीचा गजर करताना सर्वत्र स्वातंत्र्य, समता बंधुता नांदावी म्हणून माणूसपणाची लयलूट होताना का दिसत नाही हा प्रश्न अस्वस्थ करतो आहे. लोकशाहीतील वेगवेगळे विचार अतिरंजितपणाचा कळस गाठून एका वेगळ्याच वळणावर गेल्याचे सदोदित चित्र देश आणि देशाची आत्मीयता याला धक्का पोहोचवत आहेत.तर लोकशाहीतील मूल्यांचा पराभव करण्यासाठी करण्यात आलेली वेगवेगळी कटकारस्थाने संयमाचा बांध फूटून आतल्या आत गुदमरताना दिसत आहे. लोकशाहीचे संवर्धन करण्याची जबाबदारी आपल्यावर आलेली असताना तिच्याकडे सतत ओशाळ नजरेने पाहणे हेही कितीतरी धक्कादायक वाटत आहे. देशाभिमानाला अहंकाराची लाभलेली चादर सतत काटयासारखी रुतत आहे. आणि मग विशाल महासत्तेची स्वप्ने रंगतदार कशी होणार ?हा प्रश्न डोळ्यासमोर तरळून जातो आहे. शहरे वाढली,ग्रामीण भाग ओस पडले,कृषी संस्कृतीची वाट लागली, बेरोजगारीचे एक तटस्थ आव्हान उभा राहिले, भ्रष्टाचार बोकाळला, आणि यामुळेच लोकशाहीतील मूल्यांना सतत ठेच लागत गेली , म्हणूनच देशाभिमानाला उतरती कळा लागली. आणि खोटेपणाचा मनोरा वाढतच गेल्याने देशाची अखंडता, त्याचे संवर्धन आणि लोकशाहीच्या विचाराला आलेली मरगळ देशाच्या अखंड वाटचालीसाठी घातक ठरत आहे. मग लोकशाहीत नवसृजनांचे प्रतिबिंब कसे दिसून येईल हा प्रश्न सतत चिंतेत भर घालणारा ठरतो आहे.

**- बाळासाहेब जोगदंड, संवाद-9423051246**
**( लेखक प्रसिद्ध साहित्यिक आणि लोककलेचे अभ्यासक आहेत)**

### सर्वप्रथम भारतीय आहे ही भावना जागृत व्हावी



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले भारतीय संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने स्वीकारले. २६ जानेवारी १९५० रोजी लागू करण्यात आले. संविधान मुल्यांची जोपासना करताना डॉ. आंबेडकर यांनी संविधानातील मुल्ये सामाजिक बदल घडवून आणणारी असल्याचे सांगितले होते. तर संविधानाचे रक्षण करण्याचे भान सुज्ञ नागरिकांमध्ये काळानुसार येईल, असा विश्वास व्यक्त केला होता. ती स्थिती आज निर्माण झाली आहे. गणराज्य दिन पाळताना काही प्रश्न सुजाण नागरिकांच्या मनात निर्माण होतात. संविधानाचा वापर जनतेच्या हितासाठीच झाला असता तर देश आतापर्यंत महासत्ता बनला असता. परंतु सत्ताधाऱ्यांनी आणि राजकीय पक्षांनी केवळ स्वार्थी राजकारण केले. संविधान प्रणाली राबवण्याऐवजी पक्षाची नव्हेतर स्वतःची प्रणाली वापरली. पक्ष आणि विचार पेरण्यासाठी वापरली. स्वतःच्या तत्वप्रणालीला देशापेक्षा मोठे मानले यामुळे आज देशातील वातावरण बिघडले आहे. देशाचे स्वातंत्र्य धोक्यात येऊ नये म्हणजे झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, आपण राजकीय लोकशाहीवर समाधान न मानता तिचे रुपांतर सामाजिक लोकशाहीमध्ये करावयास हवे . तरच, राजकीय लोकशाही खऱ्या अर्थाने अधिक काळ टिकू शकते. सामाजिक लोकशाही स्वातंत्र्य , समता , बंधुता यांना जीवनमुल्यांना मान्यता देते. स्वातंत्र्य गणराज्य हेच सर्व स्तरातील व्यक्तींना जगण्याचा खरा आनंद देते. मात्र ते टिकविण्यासाठी मार्गातील अडथळे ओळखणे ही काळाची गरज आहे. आज 19 जानेवारी २०२३ पासून अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे संस्थापक श्याम मानव आणि बागेश्वर धाम वाले धीरेंद्र महाराज यांच्यामध्ये 'दिव्यशक्ती सिद्ध' करण्यावरून आगडोंब उसळला आहे. भारतातील सर्व माध्यमांनी या दोघांचे 'युद्ध' पेटवले आहे. या घटनेकडे बघितल्यानंतर भारतामध्ये असलेल्या अंधश्रध्दा आणि व्यक्ती पूजेसह अनेक प्रकरणांमध्ये अंधभक्तीमुळे देशातील जनतेसमोरचे जगण्याचेच प्रश्न मागे पडले आणि अस्वस्थ वर्तमान आपल्यापुढे आला आहे. यामुळे मी प्रथम आणि अंतिम भारतीय आहे, हीच भावना गणराज्य दिनाच्या पर्वावर सर्व भारतीयांच्या मनात जागृत व्हावी, येवढेच.

**- केवल जीवनतारे, संवाद- ९८५०२०९७२५(लेखक प्रसिद्ध जेष्ठ पत्रकार आहेत)**

### लोकशाही मूल्यांची खऱ्या अर्थाने परिपूर्तता व्हावी...



भारतीय संविधानानुसार आज आपल्या देशातील प्रत्येक माणूस स्वतंत्र आहे. याचाच अर्थ या देशातील माणसाने कुठेही, कसेही वागायचे असा नव्हे तर तो आपला सर्वांगीण विकास करण्यासाठी स्वतंत्रपणे विचार करू शकतो. यासाठी त्याला कुणाच्या अधिपत्याखाली राहायची गरज नाही. आपल्या आवडीच्या क्षेत्रामध्ये विकास करण्याचे माणसाला पूर्ण स्वातंत्र्य आहे. त्यामुळेच त्याच्या प्रगतीसाठी जाती, धर्मानुसार भेदभाव भेदभाव केल्या जाऊ शकत नाही. आज आपण पाहतो की, या पृथ्वीतलावरील सर्व मानव जात एकमेकांशी समतेच्या भावनेने आचरण करते. हा उच्च जातीचा,हा कनिष्ठ जातीचा असा भेदभाव माणसांमध्ये नसल्यामुळेच एक समानतेचे तत्त्वज्ञान आज लोकशाहीतून पाझरताना दिसते. या देशावर पाकिस्तानने असो वा चीनने असो आक्रमण करण्याचा प्रयत्न केला तर देशाच्या सीमेवरील सैनिक ज्याप्रमाणे आपल्या देशाचे संरक्षण करण्यासाठी प्राणाची आहुती द्यायला तयार असतात; त्याप्रमाणेच बंधुत्वाची भावना सद्यस्थितीत भारतीयांच्या मनात खोलवर रुजत असल्याचे दिसून येते. देशाविषयी असलेला अभिमान हे या मागील मुख्य कारण आहे असेही आपल्याला म्हणता येईल.आज जगामध्ये एक प्रगत आणि विकसनशील देश म्हणून भारताकडे पाहिले जाते. याला मुख्य कारण ज्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला दिलेले भारतीय संविधान आहे त्याप्रमाणेच या देशातील सामान्य जनता ज्याप्रमाणे एकमेकांशी बंधुत्वाच्या भावनेतून मानवतेचा प्रगल्भरीत्या परिचय देते ते सुद्धा आहे. अलीकडेच जगात कोरोनाचे मोठ्या प्रमाणावर सावट पडलेले असताना आपल्या देशातील लोकांनी जाती, धर्म, पंथ आणि परंपरांचा विचार न करता गोरगरिबांना बंधुत्वाच्या भावनेतून अन्न, वस्त्र आणि निवाऱ्यासारख्या मूलभूत गरजांची पूर्तता करून सच्चा माणुसकीचा परिचय करून दिला. समानतेच्या भावनेतून एकमेकांच्या मदतीला माणसे धावून आली. माणूस माणसापासून पारखा होत असल्याची प्रचिती कोरोना काळात माणसाच्या वाट्याला आलेली असतानासुद्धा माणसाने परिस्थितीशी स्वतंत्रपणे तोंड देण्याची हिंमत दाखविली. आज आपल्या देशातील प्रत्येकाच्या मनात समतेचे तत्त्वज्ञान पेरल्या गेल्यामुळेच आंतरजातीय विवाहसुद्धा मोठया प्रमाणावर होताना दिसतात. खरे तर माणूस माणसाशी जोडला जाऊन देशाचा मोठ्या प्रमाणावर आर्थिक, सामाजिक, धार्मिक विकास होण्यासारखी परिस्थिती लोकशाहीने आपल्या देशात निर्माण केली आहे. मात्र आज आपण ज्यावेळी उद्याचे भवितव्य म्हणून या देशातील तरुण वर्गाकडे अर्थात तरुण पिढीकडे पाहतो त्यावेळी जे चित्र नजरेसमोर येते ते अतिशय विदारक आहे. याला मुख्य कारण बेरोजगारीची समस्या असल्याचेही दिसते. दिवसेंदिवस बेरोजगारांच्या संख्येमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. औद्योगीकरणामुळे खेडोपाड्यातील शेतीव्यवसाय हळूहळू लयाला जाताना दिसतो.शेती विकून जवळ आलेला पैसा नव्या पिढीच्या हातात टिकत नाही. आणि त्या पैशाचा योग्य वापर करण्यासाठी तरुण वर्ग वेगवेगळ्या व्यसनांच्या आहारी जातो. त्यामुळे साहजिकच सद्यस्थितीत स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाच्या भावनेचा विसर या नव्या पिढीला पडला की काय असे वाटू लागते. वयाने आणि मानाने मोठ्या असलेल्या व्यक्तीला घरात आणि समाजातसुद्धा पाहिजे त्या प्रमाणात सन्मानाची वागणूक मिळत नाही. जो माणूस कधी काळी आपल्या कुटुंबासाठी राबराब राबत होता त्यालाच म्हातारपणी त्याची मुले किंवा नातवंडे वृद्धाश्रमाची वाट चालायला भाग पाडतात.एकीकडे या पिढीने मोठ्या प्रमाणात शिक्षण तर प्राप्त केले परंतु संस्कार नावाच्या गोष्टीपासून ही पिढी बरीच दूर राहिली. त्यामुळे जुन्या पिढीतील आजी- आजोबांना नव्या पिढीतील तरुणांनी घरातील अडगळीत पडलेल्या सामानांसारखे करून टाकले. आपण स्वातंत्र्यामुळे स्वतंत्र जीवन तर जगतो परंतु जुन्या पिढीचे मूलभूत स्वातंत्र्यच आपण हिसकावून घेतले. इतरांशी आपण समानतेने वागतो परंतु घरातील वडीलधाऱ्यांशीच आपण समतेने, बंधुभावाने वागत नाही. शिवाय मोबाईलचा वापर मोठ्या प्रमाणात होऊ लागल्यामुळे घरातील माणसामाणसांमधील संवाद हरवत चालला आहे. जो तो आपल्याच भावविश्वात रममान होताना दिसतो. त्यामुळे साहजिकच मानवी संवादाच्या कार्यशाळा मोठ्या प्रमाणावर निर्माण होण्याची गरज आहे. जोपर्यंत अनुभवी व्यक्तींच्या मनातील भावना चारचौघांसमोर मोकळेपणाने अभिव्यक्त होणार नाही तोपर्यंत लोकशाहीतील स्वातंत्र्य, समता आणि बंधूतेसारखी मूल्ये नीरस वाटेल. आजचे युग धावपळीचे आहे. कुणीच कुणासाठी आपला वेळ द्यायला तयार नाही. आम्ही आर्थिक आणि सामाजिक पातळीवर आजही पाहिजे त्या प्रमाणावर जवळ आलेलो नाही. शहरातील झोपडपट्टी परिसरात गेलो की समतेच्या मूल्यांची पातळी नैतिकदृष्ट्या किती खालावलेली आहे याचे आपणास दर्शन घडते. स्वातंत्र्याचा खरा उपभोग श्रीमंत वर्गाने घेतला परंतु झोपडपट्टीच्या परिसरात किंवा आदिवासी समाजात खरंच माणूस स्वतंत्रपणे जगतो आहे का? आजही सावकारदार वर्ग त्यांचे आर्थिक आणि शारीरिक शोषण करतात. त्यांना सुख आणि समाधानाने पोटभर अन्नही खायला मिळत नाही. पोटासाठी आमचाच आदिवासी बांधव किंवा गोरगरीब रात्रंदिवस वणवण भटकतात. मग त्यांच्या दारात खरेच स्वातंत्र आले काय?बंधुभावनेची व्याख्या सांगायला आम्हाला जरी बरी वाटत असले तरी जाती, धर्माच्या नावाने आजही राजकारणी लोक राजकारण खेळतात. हिंदू- मुस्लिमांमध्ये देव देवतांच्या नावावर आमच्यामध्ये भांडणे लावून ते आपल्या राजकारणाची पोळी भाजून घेतात. त्यामुळे स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या संकल्पना आजच्या स्थितीत भारतीय संविधानानुसार कितीही गोंडस वाटत असल्या तरी त्यामागे दडलेले आजचे भीषण वास्तव मात्र अमानुषतेची पायरी गाठणारे आहे. या देशात स्त्रीला समतेने, सन्मानाने वागविण्यासाठी आम्ही कटिबद्ध असलो तरी दिवसाढवळ्या या देशातील अल्पवयीन मुलींवर बलात्कार करणारे नराधमसुद्धा दिसतात. अशा स्थितीत शासनाने लोकशाही विचारांचा जागर करीत कठोर पावले उचलण्याची गरज आहे.'जिथे अपराध तिथेच शिक्षा' असे शासनाचे धोरण असायला हवे. तेव्हाच स्वातंत्र, समता आणि बंधुतेची मूल्ये घरात, गावात आणि देशात रुजू लागतील. आपल्या देशाचा सर्वांगीण विकास होण्यास मोठ्या प्रमाणावर हातभार लागेल. कारण हा देश सर्वांचा आहे.त्यामुळे या देशाची प्रगती करायची असेल तर सर्वांनी मिळून एकत्र आले पाहिजे. तेव्हाच देश प्रगतीच्या मार्गाला लागेल आणि लोकशाही मूल्यांची खऱ्या अर्थाने परिपुर्तता होईल.

**- डॉ. अनंता सूर, संवाद-.९४२१७७५४८८ (लेखक प्रसिद्ध साहित्यिक तथा मराठी भाषेचे अभ्यासक आहेत )**



**बाबूराव पाटील, भोकर**

### स्वातंत्र्य, समता, बंधुतेवर चिंतनाची वेळ



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या राज्यघटनेमुळे माणसाला माणसासारखे जगण्याचे स्वतंत्र मूलभूत अधिकार मिळाले. सर्वात मोठा मताधिकार मिळाला. पण त्यांचा वापर निर्भयपणे करता आला नाही. बंदुकीच्या नळीवर व तलवार, भाले यांच्या भीतीने देशभरातील गोरगरीब असंघटित कष्टकरी मजूर कामगार मागासवर्गीय आदिवासी अल्पसंख्याक समाज मालक सांगेल त्यालाच मत देत होता. त्यावर चर्चा करण्याची कुणातच हिंमत नव्हती. त्यामुळेच बहुजन समाज पार्टीचा जन्म झाला. त्यातुनच सर्व बहुजन समाज राजकीय दृष्ट्या जागृत झाला. बाबासाहेबांनी संविधानात सर्व अधिकार दिले पण ते आज ही काही समाजाला घेता येत नाहीत. कारण भारतीय राज्यघटनेची अंमलबजावणी करण्यासाठी जी प्रामाणिक, निःपक्षपाती निर्भय यंत्रणा लागते ती आज ही आपल्या देशात नाही. मग निर्भयपणे हे मागासवर्गीय आदिवासी अल्पसंख्याक समाजाचे असंघटित कष्टकरी मजूर कामगार मत कसे देतील? मजूर हा स्वतंत्र नाही तो रोजीरोटीसाठी कोणा कोणाकडे बांधलेला असतो. याची जाणीव बाबासाहेबांना झाल्यावर मजूर पक्षाची भूमिका त्यांनी सोडून दिली. रिपब्लिकन पक्षाची संकल्पना मांडली होती. स्वतंत्र मजदूर युनियनची संकल्पना मांडली १२ व १३ फेब्रुवारी १९३८ मनमाड येथे रेल्वे गँगमॅन कामगारांची दोन दिवसीय कामगार परिषद झाली तेव्हा त्यांनी सांगितले होते की मागासवर्गीय आदिवासी अल्पसंख्याक यांची स्वतःची कामगार कर्मचारी संघटना युनियन स्थापना करून ती स्वतंत्र मजदूर युनियनशी राष्ट्रीय पातळीवर संलग्न करावी. कामगारांचे मुख्य ध्येय हे शासन यंत्रणेवर नियंत्रण ठेवणे असावे. त्यातून राजकीय परिवर्तन घडवून आणल्या जाईल. स्वातंत्र्य, समता, बंधुता ही आत्म्याची तीन रूपे आहेत; समाजाच्या बाह्य यंत्राद्वारे किंवा माणूस जोपर्यंत केवळ व्यक्ती आणि सांप्रदायिक अहंकारात राहतो तोपर्यंत ते खरोखर साध्य होऊ शकत नाहीत. जेव्हा अहंकार स्वातंत्र्याचा दावा करतो, तेव्हा तो स्पर्धात्मक व्यक्तिवादावर पोहोचतो. जेव्हा ते समानतेचे प्रतिपादन करते, तेव्हा ते प्रथम कलहात पोहोचते, नंतर निसर्गाच्या भिन्नतेकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न करते आणि ते यशस्वीरित्या करण्याचा एकमेव मार्ग म्हणून, तो एक कृत्रिम आणि यंत्रनिर्मित समाज तयार करतो. जो समाज स्वातंत्र्याचा आदर्श मानून त्याचा पाठपुरावा करतो तो समता प्राप्त करू शकत नाही; समानतेचे ध्येय ठेवणारा समाज स्वातंत्र्याचा त्याग करण्यास बांधील असेल. अहंकाराने बंधुत्वाबद्दल बोलणे म्हणजे त्याच्या स्वभावाच्या विरुद्ध काहीतरी बोलणे होय. सामान्य अहंकारी उद्दिष्टांचा पाठपुरावा करणारी संघटना आहे आणि श्रम, उत्पादन, उपभोग आणि उपभोग यांच्या समान वितरणासाठी एक जवळची संघटना आहे. तरीही बंधुता ही मानवतेच्या कल्पनेच्या तिहेरी आनंदाची खरी गुरुकिल्ली आहे. स्वातंत्र्य आणि समतेचे संघटन केवळ मानवी बंधुत्वाच्या सामर्थ्यानेच प्राप्त होऊ शकते आणि ते इतर कशावरही स्थापित केले जाऊ शकत नाही. परंतु बंधुत्व केवळ आत्म्यात आणि आत्म्यानेच असते; ते इतर कशानेही अस्तित्वात असू शकत नाही. कारण हा बंधुत्व हा शारीरिक नात्याचा किंवा महत्त्वाच्या सहवासाचा किंवा बौद्धिक कराराचा विषय नाही. जेव्हा आत्मा स्वातंत्र्याचा दावा करतो, तेव्हा ते त्याच्या आत्म-विकासाचे स्वातंत्र्य असते, मनुष्यामध्ये त्याच्या सर्व अस्तित्वात असलेल्या परमात्म्याचा आत्म-विकास होय. जेव्हा ते समानतेचा दावा करते, तेव्हा तो दावा करतो की सर्वांसाठी समान स्वातंत्र्य आणि सर्व मानवांमध्ये समान आत्म्याची, समान देवत्वाची ओळख. जेव्हा ते बंधुत्वासाठी प्रयत्नशील असते तेव्हा हे लक्षात येते की समान उद्दिष्ट, समान जीवन, मनाची एकता आणि या आंतरिक आध्यात्मिक एकतेच्या ओळखीवर आधारित आत्म-विकासाचे समान स्वातंत्र्य. या तीन गोष्टी खरे तर आत्म्याचे स्वरूप आहेत; स्वातंत्र्यासाठी, समानता, एकता हे आत्म्याचे शाश्वत गुणधर्म आहेत. ही सत्याची खरी ओळख आहे, माणसातील आत्म्याला जागृत करणे आणि त्याला त्याच्या स्वतःच्या प्रेरणेने जगू देण्याचा प्रयत्न करणे हे ज्यावेळी प्रत्यक्षात येईल तेव्हाच डॉ. बाबासाहेबांच्या विचारातील स्वातंत्र्य, समता, बंधुता यांना खरा अर्थ प्राप्त होईल.

**-उध्दव भयवाळ, 8888925488, (लेखक साहित्यिक तथा सामाजिक विश्लेषक आहेत)**

# धक्कादायक दावा

आधुनिक केसरी

चीन आणि भारतीय सैनिकांमध्ये झटापटीच्या घटनेनंतर गेल्या तीन वर्षांपासून दोन्ही देशांमधील संबंध काहीसे ताणलेलेच राहिले आहेत. या पार्श्वभूमीवर लडाखमधील सीमाभागातील तणाव वाढल्याचे चित्र निर्माण झाले आहे. दिल्लीत गेल्या आठवड्यात झालेल्या उच्चस्तरीय बैठकीमध्ये पूर्व लडाखसंदर्भात सादर करण्यात आलेल्या शोध पत्रकामध्ये यासंदर्भात उल्लेख करण्यात आला आहे. 'द हिंदू'ने यासंदर्भात वृत्त दिले आहे. त्यानुसार चीनला लागून असलेल्या पूर्व लडाखच्या सीमाभागातील ६५ पैकी एकूण २६ गस्ती बिंदूंवरील अर्थात पेट्रोलिंग पॉइंट्सवरील (पीपी) ताबा गमावल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. 'द हिंदू'नं दिलेल्या वृत्तानुसार, गेल्या आठवड्यात सीमाभागातील सुरक्षेच्या मुद्द्यांसंदर्भातील वार्षिक उच्चस्तरीय बैठक दिल्लीत पार पडली. या बैठकीला पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हेही उपस्थित होते. या बैठकीमध्ये देशातील सीमाभागातल्या सुरक्षेचा आढावा घेण्यात आला. यावेळी लडाखच्या सीमाभागातील परिस्थितीचा आढावा देणारा एक रीसर्च पेपर सादर करण्यात आला. पेपरमध्ये भारताने ६५ पैकी २६ पेट्रोलिंग पॉइंट्सवरील ताबा गमावल्याचा दावा करण्यात आला आहे. या पेपरनुसार, लडाख आणि चीनच्या सीमेवर काराकोरम पास ते चुमुर भागामध्ये एकूण ६५ गस्ती बिंदू आहेत. सप्टेंबर २०२१पर्यंत काराकोरम पासपर्यंत गस्तीसाठी जाता येणे स्थानिक प्रशासन आणि सुरक्षा दलासाठी शक्य होते. मात्र, आता या भागात भारतीय लष्कराकडून चेकपोस्ट बसवण्यात आले आहेत. त्याच्यापुढे जाण्यास मज्जाव करण्यात आला आहे. त्यामुळे एका अर्थाने हे सर्व भाग भारतीय प्रशासन, नागरिक किंवा नियमित गस्त घालणाऱ्या सुरक्षा पथकांसाठी अघोषित बफर झोनच ठरले आहेत. द हिंदूमध्ये छापून आलेल्या या वृत्तानुसार, भारतानं ताबा गमावलेल्या २६ गस्ती बिंदूंमध्ये पीपी क्रमांक ५ ते १७, २४ ते ३२, ३७, ५१, ५२ आणि ६२ या ठिकाणांचा समावेश आहे. चीनने आत्तापर्यंत काबीज केलेल्या भारतीय हद्दीतील भूभागाप्रमाणेच या गस्तीबिंदूंवरही चीन आपला ताबा मिळवेल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. काही काळानंतर चीन असा दावा करू शकतो की या भागांमध्ये भारतीय लष्कराचा किंवा सुरक्षा दलाचा वावर नाही, त्यामुळे हा भूभाग आमचा आहे, असेही म्हटले जात आहे.



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

# आपल्या देशाचा सुवर्णदिन कोणता रे भावा ?

आधुनिक केसरी

**भारतातील सर्व शाळा आणि महाविद्यालये तसेच शासकीय-खाजगी संस्था, ग्रामपंचायती अशा विविध ठिकाणी ध्वजवंदन केले जाते आणि भारतीय संविधानाप्रती आदर व्यक्त केला जातो. लेखाद्वारे या अविस्मरणीय दिवसाची आठवण ताजी करत अलककार-श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी आपले मन पुलकित करण्याचा प्रयत्न करत आहेत. २६ जानेवारीचा हा राष्ट्रीय समारंभ असल्यामुळे या दिवशी सार्वजनिक सुट्टी असते. दि.२६ जानेवारी १९५० रोजी नव्याने स्वातंत्र्य मिळालेल्या भारत देशाने संविधान अंमलात आणून लोकशाहीतील एका नव्या पर्वाची सुरुवात केली होती.**

प्रजासत्ताक दिवस भारतातील तीन राष्ट्रीय सुट्ट्यांपैकी एक आहे. अन्य दोन- स्वातंत्र्यदिन १५ ऑगस्ट व गांधी जयंती २ ऑक्टोबर हे आहेत. या दिवशी भारताची राजधानी नवी दिल्ली येथे एक मोठी परेड- संचलन राजपथ मार्गावरून निघते. भारतीय प्रजासत्ताक दिवस हा भारताच्या प्रजासत्ताकात दरवर्षी २६ जानेवारी रोजी पाळला जाणारा राष्ट्रीय सणाचा दिवस आहे. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधान समितीने दि.२६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताचे संविधान स्वीकारले व दि.२६ जानेवारी १९५०पासून ते अंमलात आणले गेले. पं.जवाहरलाल नेहरू यांनी दि.३१ डिसेंबर १९२९ रोजी लाहोरजवळ रावी नदीच्या काठी तिरंगा फडकावून पूर्ण स्वराज्याची- स्वातंत्र्याची घोषणा केली होती. त्याची आठवण म्हणून २६ जानेवारी हा दिवस राज्यघटना अंमलात आणण्यासाठी निवडण्यात आला. या दिवशी देशभरात भारताच्या राष्ट्रध्वजाचे आरोहण होऊन त्याला मानवंदना दिली जाते, राष्ट्रगीत म्हटले जाते आणि आदर व्यक्त केला जातो. हा दिवस आपल्या देशातील सुवर्णदिन आहे. या दिवसाची प्राप्ती हजारो देशभक्तांच्या बलिदानातून झाली होती. या दिवशी शाळा, महाविद्यालय शासकीय कार्यालय यांमध्ये विविध कार्यक्रमांसह भाषणे आयोजित केली जातात. संविधान प्रास्ताविकेचे मोठ्याने वाचन केले जाते.

भारताला दीडशे वर्षांहून अधिक कालावधीतील ब्रिटीश राजवटीपासून दि.१५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले. यामागे भारताचा स्वातंत्र्यलढा आणि त्यातील म.गांधींच्या अहिंसा पद्धतीचा मोठा हातभार आहे. तेव्हा स्वतंत्र भारताला स्वतःचे संविधान नव्हते. भारताचे कायदे हे मात्र भारतीय राज्यशासनाच्या सन १९३५ सालच्या कायद्यावर- कलमावर आधारित होते. दि.२९ ऑगस्ट १९४७ रोजी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र भारताचे संविधान तयार करण्यासाठी मसूदा समिती स्थापना केली गेली. या समितीने संविधानाचा मसुदा तयार करून तो सभेपुढे दि.४ नोव्हेंबर १९४७ रोजी सादर केला. या सभेने सार्वजनिक चर्चेसाठी सभागृहात हा प्रस्ताव १६६ दिवसांसाठी खुला केला होता. तब्बल २ वर्ष ११ महिने आणि १८ दिवसाच्या प्रदीर्घ कालावधीनंतर समितीने हा मसुदा अंतिम केला. बरेचसे विचारविमर्श आणि सुधारणा केल्यानंतर समितीच्या ३०८ सद्स्यांनी दोन हस्तलिखित प्रती- हिंदी आणि इंग्रजी या दि.२४ जानेवारी १९५० रोजी स्वाक्षरांकित केल्या. दोन दिवसानंतर हे भारताचे संविधान संपूर्ण राष्ट्रासाठी लागू करण्यात आले. म्हणून भारतीय संविधानाच्या निमित्ताने हा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात येऊ लागला.

दरवर्षी २६ जानेवारी रोजी भारताच्या राजधानीत म्हणजे नवी दिल्ली येथे एक मोठे संचलन आयोजित केले जाते. हे संचलन रायसीना हिलपासून राष्ट्रपती भवनापर्यंत राजपथ मार्गाद्वारे जाते. संचलनाच्या अगोदर अनाम सैनिकांसाठी बनवले गेलेले स्मारक व अमर जवान ज्योती येथे भारताचे पंतप्रधान पुष्पचक्र अर्पण करतात. भारतासाठी आपले प्राणार्पण करणाऱ्या वीर सैनिकांना श्रद्धांजली वाहण्यात येते. त्यानंतर पंतप्रधान राजपथाच्या मुख्य मंचावर जातात व आलेल्या पाहुण्यांना भेटतात. तेवढ्यात प्रमुख पाहुण्यांसोबत राष्ट्रपतींचे आगमन होते. राष्ट्रगीत सुरू होताच राष्ट्रपती ध्वजारोहण करतात आणि २१ तोफांची सलामी दिली जाते. त्यानंतर देशासाठी शौर्य गाजवलेल्या सैनिकांना राष्ट्रपतींच्या हस्ते अशोकचक्र आणि कीर्तिचक्र हे मुख्य पुरस्कार देण्यात येतात. राष्ट्रीय शौर्य पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलेली देशातील शूर बालके सजवलेल्या हत्तीवरून किंवा वाहनावरून या संचलनात सहभागी होतात. प्रमुख पाहुणे म्हणून परराष्ट्रीय राष्ट्राध्यक्षांना निमंत्रण दिले जाते. भारतीय फौजा- नौदल, पायदल, वायुसेना यांचे वेगवेगळे सेनाविभाग, घोडदळ, पायदळ, तोफखाना आणि इतर अद्ययावत शस्त्रे-क्षेपणास्त्रे जसे- पृथ्वी, अग्नी, रणगाडे समवेत संचलन करतात. भारताचे राष्ट्रपती या फौजांची मानवंदना स्वीकारतात. भारताच्या विविधतेतून एकता या वैशिष्ट्याला ही मानवंदना असते. या संचलनाच्या सादरीकरणाची पूर्वतयारी विशेष काळजीपूर्वक व शिस्तीने केली जाते, इतके या संचलनाचे महत्त्व आहे. नवी दिल्ली येथे होणाऱ्या संचलनाप्रमाणेच भारतातील सर्व राज्यांतही एकेक संचलन होते. प्रत्येक राज्यात त्या त्या राज्याचे राज्यपाल फौजांची मानवंदना स्वीकारतात. शेवटी बीटिंग रिट्रीट या कार्यक्रमाने प्रजासत्ताक दिन सोहळ्याची सांगता केली जाते.

प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देण्यासाठी देशभक्तीपर गीतांच्या ओळी, तिरंगा ध्वज आदी संकल्पनांचा कल्पकतेने वापर करून परस्परांना शुभेच्छा दिल्या जातात. देशाभिमान मनात टिकून राहण्यासाठी भारतीय नागरिक अशा शुभेच्छा एकमेकांना देऊन परस्परांमधील ऐक्य टिकवून ठेवण्याचे आवाहनही केले जाते.





दुशांत बाबुराव निमकर
संपर्क क्र. 9765548949

# लोकशाहीची मूल्ये बळकट करावी

आधुनिक केसरी

**"मतदार राजा जागा हो,लोकशाहीचा खरा धागा हो" यासाठी मागील २०११ पासून २५ जानेवारी हा दिवस 'राष्ट्रीय मतदार दिन' म्हणून संपूर्ण भारतात साजरा केला जातो.भारत देशात संसदीय लोकशाही अस्तित्वात आहे. दर पाच वर्षांनी मतदान करून सरकारची निवड केल्या जाते. लोकशाहीत मतदार हाच राजा असतो. एखाद्याला संसदेत वा विधिमंडळात पाठविण्याचा अधिकार मतदाराला आहे. २५ जानेवारी १९५० ला राष्ट्रीय निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली पण मतदानाची टक्केवारी वाढत नव्हती.**

मतदारांमध्ये असलेली उदासीनता व लोकशाहीची मूल्ये जतन होण्यासाठी राष्ट्रीय मतदार दिन साजरा करून उपक्रम घेण्याचे ठरविले. तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते 'राष्ट्रीय मतदार दिन' साजरा करण्याचा शुभारंभ झाला. दरवर्षी वेगवेगळी थीम घेऊन मतदाराला जागृत करण्यासाठी मतदार केंद्र व कॉलेजमध्ये प्रचार केला जातो. वयाची १८ वर्ष पूर्ण करणाऱ्या तरुण मंडळींना मतदान करण्याचा अधिकार संविधानाने दिलेला आहे. संविधान हेच लोकशाहीची मूल्ये जपण्यासाठी आवश्यक गुरुकिल्ली आहे. स्वातंत्र्य,समता, बंधुता व न्याय या मूल्याची जडणघडण होण्यासाठी मतदान करणे अत्यावश्यक आहे. आपल्या मताची किंमत कळायला हवी. आपल्या एका व्यक्तीच्या मताने कधी विजय तर कधी पराजयाला सामोरे जावे लागते.लोकशाहीची पाळेमुळे खोलवर ग्रामीण भागात देखील रुजवणूक व्हावी यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था ते संसद (खासदार) सदस्य निवडीसाठी मतदान करणे अत्यावश्यक आहे. प्रत्येक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी. आपले मत अमूल्य आहे याची जाणीव व्हावी. भारतात बहुपक्षीय पद्धत रूढ आहे.योग्य उमेदवार निवडून बहुसंख्य मताने निवडून येणाऱ्याला प्रथम प्राधान्य दिले जाते. मागासवर्गीय,महिला राखीव मतदारसंघ देखील त्या त्या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व मिळावे हे देखील लोकशाहीत नमूद केलेले आहे. भारतात बहुसंख्येने तरुण-तरुणींची संख्या अधिक असल्याने त्यांच्यात जागरूकता निर्माण होऊन मतदान करण्यासाठी सामोरे यायला हवे याच उद्देशाने २५ जानेवारीला विविध उपक्रम दरवर्षी घेतल्या जातात.शाळास्तरावर निवडणुकीची जाणीव विद्यार्थ्यांना व्हावी यासाठी शालेय मंत्रिमंडळ स्थापन केले जातात आणि कामाचे, खात्याचे वाटप करून मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ ठरविल्या जाते त्याचपद्धतीने राज्यात मुख्यमंत्री नि देशात पंतप्रधान वास्तविक प्रमुख म्हणून कार्य करतात पण घटनात्मक प्रमुख राज्यात राज्यपाल तर देशात राष्ट्रपतींच्या नावाने कार्यभार चालत असतो.

राष्ट्रीय निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० साली करण्यात आली. देशात व राज्यात निवडणुका घेण्याचे काम राष्ट्रीय निवडणूक आयोग दर पाच वर्षांनी करीत असतो.लोकांनी,



लोकांचे व लोकांसाठी चालविलेले शासन म्हणजे लोकशाही होय. लोकशाहीत प्रत्येक नागरिकाला मतदान करण्याचा अधिकार, हक्क आहे. ज्यांना १८ वर्ष पूर्ण झालेले आहेत त्यांनी मतदानाचा अधिकार बजवायला हवा. मतदान करण्यासोबत निवडणुकीला उभे राहण्याचा अधिकार देखील संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिलेले आहे."एक व्यक्ती, एक मत, एक मूल्य" याप्रमाणे प्रत्येक निवडणुकीत मतदान करायला हवे. जनतेची सेवा करण्यासाठी व मतदारसंघाचा विकास करण्यासाठी योग्य उमेदवारांची निवड करण्याचा अधिकार मतदाराला आहे त्यामुळे राष्ट्रीय मतदार दिनी करण्याचे आवाहन तरुणांना केल्या जाते आणि लोकशाहीची मूल्ये बळकट करण्यासाठी मतदाराने उत्साहाने प्रत्येक निवडणुकीत मतदान करायला हवे.

मतदान करतांना कोणत्याही आमिषाला बळी न पडता यथायोग्य उमेदवारांची निवड करण्याची संधी मतदाराला मिळते. निवडून दिलेला उमेदवार मतदारांच्या समस्या सोडविण्यास असमर्थ असेल तर पुढील होणाऱ्या निवडणुकीत घरी बसविण्याचा अधिकार मतदाराला असतो त्यामुळे मतदार हाच लोकशाहीत मुख्य आधारस्तंभ आहे. २०११ पासून तर आजतागायत २५ जानेवारी हा निवडणूक आयोगाच्या स्थापना दिनाचे औचित्य साधून १२ वा राष्ट्रीय मतदार दिन मोठ्या उत्साहात भारत देशात साजरा होईल. येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत मतदाराने न विसरता मतदान करून लोकशाही बळकट करावी.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# तिरंग्याचा सन्मान हाच शहिदांचा मान



सागर ननावरे
(लेखक 'मनाचा अँटीव्हायरस' बेस्ट सेलर बुक)

आधुनिक केसरी

**२६ जानेवारी देशाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारा एक राष्ट्रीय दिन. आज देशभरात अतिशय उत्साहात आणि जल्लोषात हा दिन साजरा केला जात आहे. या दिनाला देशाच्या इतिहासात एक अनन्यसाधारण असे महत्व आहे. आजच्या दिनी 'प्रजासत्ताक दिन चिरायू हो', 'भारत माता की जय', 'वंदे मातरम' इ घोषणांनी सारा प्रदेश दुमदुमून जातो. रस्त्यारस्त्यांवर देशभक्तीची मोठ्या आवाजात लागलेली गाणी या राष्ट्राभिमानी उत्सवाची जाणीव करून देतात. एक वेगळीच वातावरणनिर्मिती या दिवशी पाहायला मिळते. वेगवेगळ्या धाटणीचे झेंडे आपले लक्ष वेधून घेत असतात. जागोजागी अभिमानाने फडकाविले जाणारे हे राष्ट्रध्वज मनामनात एक स्फूर्ती निर्माण करीत असतात.**

झेंडे आणि राष्ट्रीय दिनांचा उत्साह हे एक समीकरणच म्हणावे लागेल. आज प्रजासत्ताक दिनी झेंडे फडकविण्यासाठी उंचावलेले हात गगनाएवढा आनंद निर्माण करीत असतात.

परंतु उद्या या आनंदावर विरजण पडलेले दिसेल काय ? आज उंचावलेले राष्ट्रध्वज, झेंडे उद्या कुठे कोणत्या अवस्थेत असतील बरं ? रस्त्यावर, कचऱ्यात, फाटून- अस्ताव्यस्त होऊन कुठेतरी खितपत पडलेले तर नसतील ना ? या विचारानेच नकोसे होते. परंतु हे वास्तव आहे आणि हे आपल्याला अजिबात नाकारता येणार नाही. आज प्रजासत्ताक दिनी तिरंग्याची देखभाल करणे, तो नियमाधीन राहून फडकवणे अशी कामे हे आदराने केली जातात. कारण एक दिवसापुरती देशभक्ती ही आपल्याला काही नवीन नाही. परंतु उद्या म्हणजेच दुसऱ्या दिवशी कागदाचे तिरंगे रस्त्यावर अनेक ठिकाणी विखुरलेले आपल्याला दिसतात. झेंडा कसा फडकवावा हे सांगावे लागत नाही मात्र दुसऱ्या दिवशी त्याची काळजी कशी घ्यावी हे सांगूनही कळत नाही ही मोठी शोकांतिका आहे.

आजपासून हेच आपल्याला समजून घ्यायचे आहे. उद्याच्या ज्या पिढीच्या हाती आपण राष्ट्राभिमान जागृत करण्यासाठी तिरंगा सोपवितो, त्या हातांना त्याची देखभाल कशी करावी हेही सांगावे लागणार आहे. त्यांच्यात त्याच्याप्रती कायमस्वरूपी आदराची भावना जागृत करावी लागणार आहे. तिरंग्याचे महत्व अबाधित राखून देशाप्रतीची आपली बांधिलकी जपावी लागणार आहे. याबाबत कायद्यात अनेक तरतुदीही करण्यात आलेल्या आहेत. राष्ट्रध्वजाचा अपमान होऊ नये



म्हणून पूर्वी राष्ट्रीय प्रतिकं आणि नावं कायदा १९५० आणि 'द प्रिव्हेन्शन ऑफ इन्सल्टस टू नॅशनल ऑनर ऍक्ट १९७१ ' नुसार नियम घालून देण्यात आले होते. नंतर २६ जानेवारी २००२ मध्ये स्वतंत्र ध्वजसंहिता अस्तित्वात आली, यामध्ये सर्व नियमावली देण्यात आली. या नियमावलीनुसार आपल्या देशाचा राष्ट्रध्वज कुठेही फेकणे हा गुन्हा आहे. तसेच आपला राष्ट्रध्वज खराब झाला असेल, फाटलेला असेल तर तो निकामी करणे म्हणजे त्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे यासाठीही नियम आहेत. आपल्या देशाच्या भारतीय ध्वज संहिता २००२ नुसार, राष्ट्रध्वज खराब झाल्यानंतर त्याची योग्य विल्हेवाट लावण्याचे दोन मार्ग सांगितले गेले आहेत पहिला मार्ग म्हणजे ध्वजाला दफन करणे किंवा जाळणे. या दोन्हीपैकी कोणतीही प्रक्रिया निवडताना कठोर नियमांचे पालन हे प्रत्येक देशवासियांना करावे लागते. राष्ट्रध्वज खराब किंवा त्याची स्थिती चांगली नसेल तरच त्याची आपण अशाप्रकारे विल्हेवाट लावू शकतो. झेंडे कागदाचे असतील तर ते जमिनीवरही टाकता येत नाहीत, म्हणून त्यांचीही खासगी पद्धतीनेच विल्हेवाट लावली जाऊ शकते.

आपल्यालाही आज ही गोष्ट समजून घेऊन राष्ट्रध्वजाचा सन्मान राखायचा आहे. घरी असणारे कापडी ध्वज उद्या व्यवस्थित गुंडाळून ठेवून पुढील राष्ट्रीय सणासाठी त्याला उपयोगात आणायचे आहे. कागदी झेंडे असल्यास त्याची वर सांगितल्याप्रमाणे योग्यरीत्या विल्हेवाट लावायची आहे. आपल्या हातून कोणत्याही प्रकारे राष्ट्रध्वजाचा अपमान होणार नाही याची खबरदारी आपल्याला घ्यायची आहे. तसेच सभोवताली असे ध्वज आढळल्यास आपण स्वतः उचलून एकत्र करावेत. हे एकत्र केलेले ध्वज याबाबत काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांकडे सुपूर्द करावेत. 'भारत फ्लॅग फाउंडेशन', 'कामयाब फाउंडेशन', 'नाग स्वराज फाउंडेशन',खुशिया-बॉक्सवूड यासारख्या अनेक स्वयंसेवी संस्था, संघटना यात कार्यरत आहेत. तरुणाईने पुढाकार घेतल्यास त्या स्वतंत्ररित्या ही अशा मोहिमा राबवून या कार्यात हातभार लावू शकतात. लक्षात ठेवा ज्या तिरंगा ध्वजाच्या सन्मानासाठी आणि सुरक्षिततेसाठी अनेक स्वातंत्र्य सैनिक आणि जवानांनी बलिदान दिले आहे त्याची आठवण आपल्याला ठेवायची आहे. आणि हा वारसा पुढील पिढीकडेही असाच सुपूर्द करायचा आहे. तुम्हा सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या मनपूर्वक शुभेच्छा!

# संविधान, गणराज्य आणि बदलती आव्हाने



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**प्रदीर्घ संघर्षानंतर आणि अनेक देशभक्तांच्या बलीदानानंतर १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश ब्रिटीशांच्या जोखडातून मुक्त झाला. ई.स.१४९८ ला व्यापाराच्या उद्देशाने वास्को-द-गामा हा केप-ऑफ-द-गुड-होप बंदराला वळसा घालून कालिकत बंदरात उतरला आणि तेथूनच ब्रिटिशांनी खऱ्या अर्थाने भारताला विळखा घालायला प्रारंभ केला. त्यानंतरचा सर्वच इतिहास एखाद्या चित्रपटासारखा सर्रकन डोळ्यासमोर जातो. जवळपास चारशेहून जास्त वर्षाचा इंग्रजी सत्तेचा अंमल आणि त्यात भारतीय लोकांची दैना हा विचार डोळ्यांच्या कडा ओल्या करतो!**

निष्पाप भारतीय जनतेवरील अन्याय-अत्याचार-पिळवणूक-शोषण वाचले की हृद्य पिळवटून येते! जालियानवाला बाग हत्याकांड, भगत सिंग, राजगुरू, सुखदेव आणि अन्य भारतमातेच्या या सुपुत्रांची आठवण झाली की आजसुद्धा अंगावर रोमांच उभे राहतात! काटा टोचला तर आपण जीवाचा आकांत करतो आणि तिथे या सुपुत्रांनी हसत हसत स्वातंत्र्यासाठी आपल्या अनमोल जीवाचे बलिदान दिले! स्वतःला संपूर्ण समर्पित करून देशाचे स्वातंत्र्य पुनीत केले! देश स्वतंत्र झाला! भारत माता ब्रिटीशांच्या जोखडातून मुक्त झाली! त्यानंतर लगेच ४ नोव्हेंबर १९४७ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय संविधान समितीची स्थापना झाली आणि सुरु झाला भारतीय देश आणि राज्यघटनेचा दैदिप्यमान इतिहास!

मसुदा समितीच्या एकूण १६६ बैठका संपन्न झाल्या. या दरम्यान मोठे दिव्य कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी खांद्यावर घेत सर्वसमावेशक, देशातील सर्वात शेवटचा घटक कोणत्याही सुविधेपासून वंचित राहणार नाही याची पुरेपूर काळजी घेऊन, अथक परिश्रमाने, जगातील सर्व राज्यघटना, भारतातील सर्व प्रांत, धर्म, पथ, परंपरा आदींचा सखोल अभ्यास करून २ वर्षे ११ महिने १८ दिवसांत प्रचंड, अहोरात्र मेहनतीने भारतीय राज्यघटना लिहिली! हे फार मोठे जिकरीचे, जबाबदारीचे महत्कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मोठ्या कष्टाने, निष्ठेने करून प्रचंड देशप्रेम आणि अतीव राष्ट्रभक्तीने ओतप्रोत कार्य देशाला बहाल केले. यात संसंद म्हणजेच लोकसभा हे कायदे बनवण्याचे सर्वोच्च सभागृह लोकांच्या मतदानातून देशभरातून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी चालवायचे आहे. इथे प्रत्येकाने देशाचा प्रथम विचार करून जात-धर्म-पंथ-लिंग-राज्य-भाषा भेद न करता इमाने-इतबारे हा देश चालवायचा आहे. याची नोंद घटनेत करून ठेवली आणि २४ जानेवारी १९४७ रोजी ३०८ खासदारांच्या सह्यानिशी हिंदी आणि इंग्रजी भाषेत भारताचे हे अनमोल संविधान (राज्यघटना) दोन दिवसांनी दिनांक २६ जानेवारी १९५० रोजी देशात लागू झाले! खऱ्या अर्थाने आज रोजी जगात भारताला देश म्हणून मान्यता मिळाली! या अगोदर भारत देश नसून छोट्या छोट्या संस्थानिकांचा एक समूह होता, मात्र स्वातंत्र्य आणि राज्यघटनेने देश एकसंध गणराज्य झाला! जगात भारत देशाला स्वतःचे अस्तित्व आणि त्याच्या नावावर शिक्कामोर्तब झाले!

तत्कालीन संसदेने अत्यंत निष्ठेने देश चालवत असतांना अनेक खडतर आव्हानांचा सामना मोठ्या हिमतीने केला. पहिले पंतप्रधान श्री पंडित नेहरू, राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद आणि मंत्रिमंडळातील सर्वच व्यक्ती नवीन होते; मात्र या सर्वांच्या हृदयात राष्ट्रप्रेम आणि निष्ठा ठासून भरली होती. त्यात सर्व मंत्रिमंडळाने देशातील सर्व संस्थाने सामावून घेतली. निजामासारखा एखादा संस्थानिक का कु करत असेल त्याला पोलीस एक्शन नावाखाली मिलिटरीच्या बळावर देशात सामील करून घेतले. यात संरक्षण मंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांचे धाडस आणि कायदामंत्री डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या बुद्धीचातुर्याचा कस लागला! कठीण परिस्थितीत लोकांपर्यंत सोयी-सुविधा पोहोचविण्याचे कार्य तत्कालीन सरकारने मोठ्या अभिमानाने केले. देशात नौकरभर्ती करून देशाची घडी बसवण्याचे मुलभूत कार्य देशाच्या पहिल्या सरकारने केले.

आज पहाता पहाता भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झालीत! देश स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करतो आहे, ही मोठी गौरवाची आणि अभिमानाची बाब आहे! असे असले तरी देशासमोरील आव्हाने संपली नाहीत. दुर्दैवाने २०२३ मध्ये नुकताच भारत देश लोकसंखेच्या बाबतीत प्रथम क्रमांकावर पोहोचला आहे! लोकसंख्या हे देशासमोरील फार मोठे आव्हान आहे. जात-धर्म-पंथ बाजूला ठेवून केंद्र आणि राज्य सरकारांना लोकसंख्या नियंत्रण संदर्भात काहीतरी ठोस उपाययोजना अवलंबण्याची वेळ येऊन ठेपली आहे. याच अनुषंगाने द वाशिंग्टन पोस्ट या जागतिक इंग्रजी दैनिकाने "भारत आता तरुणांचा देश राहिला नसून तो वृद्धत्वाकडे झुकत आहे!" या शीर्षकाखाली आपल्याला सावध केले आहे. दुसरीकडे महागाई गगनाला भिडली असून सामान्य लोकांचे दैनंदिन जीवन महागाईने ग्रासून टाकले आहे! त्यापुढे जाऊन वाढती बेरोजगारी ही सुद्धा देशासमोरील मोठी समस्या बनली आहे! एकीकडे जगात भारत देश तरुणांचा देश म्हणून ओळखला जात असतांना जर इथल्या तरुण हातांना रोजगार अथवा काही कामच दिले नाही तर हे तरुण आपला देश यशोशिखरावर कसे घेऊन जातील? हा मूलगामी प्रश्न देशासमोर आ वासून उभा आहे! याच संदर्भाने तरुणांनी सुद्धा जागे होण्याची वेळ आली आहे.

"तरुणानो उठा, चालायला लागा. जोपर्यंत तुमचे ध्येय्य साध्य होत नाही तो पर्यंत थांबू नका!" स्वामी विवेकानंदांनी तरुणांना केलेलं आव्हान आजसुद्धा तेव्हढेच गरजेचे आहे. कोणत्याही देशाचे उत्थान किंवा अधःपतन हे त्या देशाच्या तरुणांच्या आणि त्या देशातील सत्ताधीश लोकांच्या हाती असते. आज तरुणांनी देश आपल्या हाती घ्यायची वेळ आली आहे! यासाठी छत्रपती शिवराय, महात्मा ज्योतीराव फुले, स्वामी विवेकानंद, नेताजी सुभाषचंद्र बोस, भगत सिंग, राजगुरू, सुखदेव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम हे आपले खरे नायक (हिरो) असून इतर गोष्टींचे वेड लागण्यापेक्षा यांच्या विचार आणि कार्याचे वेड आणि वेध लागण्याची नितांत गरज आहे! केंद्र आणि राज्य सरकारांनी याकडे वेळीच लक्ष देणे अगत्याचे आहे! देश जर धर्म, जातीयता याविषयी भावनिक आव्हाने आणि कट्टरता प्रसारित करून चालवला गेल्यास उद्या देश अधोगतीला गेल्याशिवाय राहणार नाही. मंदिरांऐवजी देशातील प्रत्येक जिल्हा आणि तालुक्यात शासकीय आयटी हब, तंत्रज्ञान महाविद्यालये, विविध विषयवार संशोधन संस्था उभारण्याची नितांत आवश्यकता आहे. आज शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळत नाही. जगाचा पोशिंदा आज खर्च आणि उत्पन्न याचा मेळ बसवतांना मेटाकुटीला आला आहे. शेतकरी आत्महत्या थांबत नाहीत! गरीब-श्रीमंत दरी वाढत आहे. हे चित्र मोठे भयावह आहे! मस्तवाल राजकारणी आणि भ्रष्ट अधिकारी यांच्याविषयी सर्वसामान्य लोकांच्या मनात प्रचंड चीड आहे! पिढ्यानपिढ्या त्याच त्याच लोकांच्या हाती सत्ता असल्यामुळे लोकशाही या लोकांची आणि घराण्यांची बटिक झाली आहे की काय? असा अनाहूत प्रश्न उपस्थित झाला आहे.

तेंव्हा चला, भारतीयांनो, आपण सर्वजण मिळून वरील सर्वच प्रश्नांकडे अत्यंत काळजीपूर्वक पाहून त्या अनुषंगाने आपल्या भोवताल जागृती करूया! हे करत असतांना सर्वांनीच दिवसातील काही तास आपल्या हातातील मोबाईल बाजूला ठेवून वाचन-लेखन करावे लागेल. आज हे कार्य शिक्षक-प्राध्यापकांनी हाती घ्यावे लागेल. असे झाल्यास अमृतमहोत्सव साजरा करणारी आजची लोकशाही मोठ्या आनंदाने उद्याचा शतक महोत्सव साजरा करेल! जय हिंद! जय भारत! जय संविधान!

# देश बलशाली होईल !



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन हे आपले दोन राष्ट्रीय सण आहेत. हे दोन्ही सण संपूर्ण भारतात मोठया उत्साहात साजरे केले जातात. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वच जण या दिवशी तिरंग्यांला मानवंदना देऊन देशाप्रती कृतज्ञता व्यक्त करीत असतात ; पण दुर्दैवाने अनेक लोकांना स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिन यातील फरक सांगता येत नाही. भारताला ब्रिटिश राजवटीपासून १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले. देश स्वातंत्र्य झाला तेंव्हा आपल्या देशाला स्वतःचे संविधान नव्हते भारताचे कायदे हे भारतीय राज्य शासनाच्या १९३५ सालच्या कायद्यावर ( कलमावर ) आधारित होते.**

स्वतंत्र देशाला स्वतःचे संविधान असावे. त्या संविधानात देशाचा कारभार कसा चालवायचा या संबंधी नियम आणि कायदे असावेत तसेच नागरिकांचे हक्क आणि कर्तव्याचा देखील त्यात समावेश असावा असे सर्वांचे मत होते. हे संविधान तयार करण्याचे शिवधनुष्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारख्या विद्वानाने पेलावे असे असे आव्हान करण्यात आले. तेंव्हा ते संविधान तयार करण्याचे आव्हान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वीकारले. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र भारताचे संविधान तयार करण्यासाठी मसुदा समिती स्थापन करण्यात समिती नेमण्यात आली. या समितीने संविधानाचा मसुदा तयार करून तो सभेपुढे ४ नोव्हेंबर १९४७ रोजी सादर केला. या सभेने सार्वजनिक चर्चेसाठी सभागृहात हा प्रस्ताव १६६ दिवस खुला केला. डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या नेतृत्वाखालील या समितीने दोन वर्ष अकरा महिने अठरा दिवसात संविधानाचा मसुदा तयार केला. बरेचसे विमर्श आणि सुधारणा केल्यानंतर २४ जानेवारी १९५० रोजी विधानसभेच्या ३०८ सदस्यांनी हा मसुदा मान्य केला. संविधानाच्या दोन हस्तलिखित प्रति तयार करण्यात आल्या. इंग्रजी व हिंदी भाषेत या प्रति होत्या. दोन दिवसांनी म्हणजे २६ जानेवारी १९५० पासून या संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली आणि भारत प्रजासत्ताक राष्ट्र बनले. संविधानेने आपल्याला मूलभूत हक्कांसोबत मूलभूत कर्तव्ये देखील दिली आहेत. हक्क आणि कर्तव्ये एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आपण जितके हक्कांबाबत जागरूक असतो तितके आपण आपल्या कर्तव्याबाबत जागरूक नसतो. जर प्रत्येक नागरिकाने आपल्या संवैधानिक हक्कांसोबत संवैधानिक कर्तव्ये देखील प्रामाणिकपणे बजावली तरच भारत बलशाली होईल.

# प्रजासत्ताक दिन : स्वतंत्र भारताची नियमावली



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**26 जानेवारी संविधानाचा व नियमांचा आधारस्तंभ आहे.15 ऑगस्ट 1947 ला भारत स्वतंत्र झाला.परंतु स्वातंत्र्यानंतर संविधान, देशाची नियमावली असने गरजेचे असते.कारण कोणत्याही कार्याकरीता पुढे पाऊल टाकण्यास कायद्याच बंधन असने गरजेचे आहे.26 जानेवारी1950 रोजी देशाची राज्यघटना लागु झाली. त्यानिमित्याने भारतातील प्रत्येक नागरिक मोठ्या उत्साहाने प्रजासत्ताक दिन साजरा करीत असतो.**

कारण प्रजासत्ताक म्हणजे लोकांव्दारे लोकांसाठी शासन. भारतात जात,धर्म,पंथ,वंश,गरीब-श्रीमंत, व्देष या संपूर्ण गोष्टी बाजूला ठेवून गुन्या-गोविंदाने प्रजासत्ताक दिवस वेगवेगळ्या संस्कृतीच्या माध्यमातून मोठ्या उत्साहाने साजरा करतात. 26 जानेवारी1950 रोजी डॉ राजेंद्र प्रसाद यांची लॉर्ड माउंट बॅटन( गव्हर्नर जनरल ) यांच्या जागी भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून निवड झाली.26 जानेवारीच्या निमित्ताने दरवर्षी राष्ट्रपतींच्या हस्ते दिल्लीतील राजपथावर राष्ट्रध्वज फडकवला जातो.आपण 73 वा प्रजासत्ताक दिन साजरा करीत आहोत.मुख्यत्वे करून 26 जानेवारीला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली राज्यघटना लागु करण्यात आली.त्यामुळे स्वतंत्र भारतासाठी हा मोठा आणि गौरवाचा दिवस मानल्या जातो.भारताला स्वतंत्र होऊन 76 वर्षे झाली असली तरीही आजही देशात आपल्याला गुन्हेगारी, भ्रष्टाचार, बॅंक घोटाळे,झुंड बळी, जातीयवाद, हिंसाचार, यांच्याशी आजही आपण लढतोय ही स्वतंत्र भारतासाठी शोकांतिकाच म्हणावी लागेल.अशा गुन्ह्या विरूद्ध सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी एकत्र येण्याची नितांत गरज आहे. कारण देश स्वतंत्र करण्यासाठी महात्मा गांधी, भगतसिंग, राजगुरू, सुभाषचंद्र बोस, झाशीची राणी, लाला लजपतराय, इत्यादीसह लाखो स्वतंत्र शुरविरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली.तेव्हाच 15 ऑगस्ट 1947 हा दिवस उदयास आला.भारताच्या थोर महात्म्यांना भारत स्वतंत्र करण्यासाठी दोन नद्यांचा उगम झाला एक मवाळवादी तर दुसरी जहालवालवादी यांच्या संगमानेच भारतीय स्वातंत्र्यलढा उभा झाला. याकरिता आपल्याला 15 ऑगस्ट1947 उजाडण्यासाठी तब्बल 150 वर्षे लागली.150 वर्षांच्या काळातील स्वतंत्र विरांचे



बलीदान व्यर्थ जावु नये व त्यांचा सन्मान व्हावा या उद्देशाने 26 जानेवारी 1950 रोजी राज्यघटना अस्तित्वात आणली. यात मुख्यत्वेकरून डॉ बाबासाहेब आंबेडकर, डॉ राजेंद्र प्रसाद, सरदार वल्लभभाई पटेल,पंडित जवाहरलाल नेहरूसह अनेक थोर महात्म्यांचा सिंहाचा वाटा आहे.परंतु दुःखाची गोष्ट म्हणजे गेल्या 30 वर्षांपासून देशात भ्रष्टाचार,करोडोचे घोटाळे, बलात्कार, निवडणुकांमध्ये जातीयवाद, गुंडाराज, बाहुबली, माफीया राज याला मोठ्या प्रमाणात उत आल्याचे पहायला मिळते.ही शहिद विरांच्याप्रती अत्यंत दुःखद व चिंताजनक बाब आहे. आपल्या पुर्वजांनी व देशाच्या स्वतंत्र संग्राम सेनानींनी आणि बहादुर विरांनी घर-दार, परीवार या संपूर्ण गोष्टी बाजूला सारून व त्याग करून स्वातंत्र्याच्या अग्नी कुंडात उडी घेतली व लाखोंच्या संख्येने बलीदान दिले. परंतु आपली शोकांतिकाच म्हणावी लागेल की आपण भारत स्वतंत्र होऊन 76 व्या वर्षीत पदार्पण करीत आहोत तरीही भारतातील भ्रष्टाचार थांबलेला नाही.आज भारतातील राजकीय पुढाऱ्यांजवळ,पुंजीपतीं,वॉलीउडक्षेत्र व भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्यांजवळ वाममार्गाने कमवीलेली करोडोंची संपत्ती आजही आहे. ही संपत्ती एकत्र केली तर भारताला तब्बल 10 वर्षे कोणाही जवळुन कर्ज घ्यावे लागणार नाही व गरीबी संपुष्टात येवु शकते आणि देश सुजलाम सुफलाम होण्यास मोठी मदत मिळेल.याकरिता भ्रष्ट अधिकारी व भ्रष्ट राजकीय पुढारी ही देशाला लागलेली कीड आहे ही कीड जळामुळासकट नष्ट व्हायला हवी व यावर आळा बसायला हवा.आज मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी करोडो रुपयांची चल-अचल संपत्ती दाबुन ठेवल्याने व चलनात नसल्याने देशातील गरीब वर्ग गरीबांच्या खाईत जात आहे तर श्रीमंत वर्ग श्रीमंत होत आहे व देशाच्या विकासामध्ये मोठा अडथळा निर्माण होत आहे.यामुळेच देशात महागाई व बेरोजगारी मोठ्या प्रमाणात दिसून येते.भारताचे प्रजासत्ताक दिनाचे 73 व्या वर्षाचे औचित्य साधून देशातील संपूर्ण भ्रष्टाचाऱ्यावर कठोर कारवाई करून त्यांनी वाममार्गाने कमवीलेला पैसा सरकारने आपल्या तिजोरीत जमा करावा.यामुळे देशाचा विकास, बेरोजगारीची समस्या, महागाई यावर आळा घालण्यासाठी मोठी मदत होईल व देश भरभराटीला येईल.याचे स्वागत आपले पुर्वज,शहीद व स्वतंत्र सेनानी अवश्य करेल व त्यांच्या स्वतंत्र लढ्याला दिलासा अवश्य मिळेल हीच प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शहिदांना आदरांजली ठरेल.देशात वाढते प्रदूषण व ग्लोबल वार्मिंगचा धोका पहाता.प्रजासत्तक दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला हवी.याकरीता शाळा, कॉलेज, संपूर्ण सरकारी क्षेत्र, राजकीय पुढारी, सामाजिक संघटना यांनी पुढाकार घ्यायला हवा.यामुळे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होईल व प्रदूषणावर मात करण्यासाठी मोठी मदत मिळेल.भारतीय शहिदांची व शुरविरांची गाथा अबाध्य आहे.त्यांच्या आशीर्वादानेच आपण आज मोकळा श्वास घेत आहोत.

# प्रजासत्ताक दिनाचे ऐतिहासिक महत्त्व



डॉ. ज्योती रा. रामोड
संपर्क क्र. 9673774269

आधुनिक केसरी

**भारतमातेला कोटी कोटी वंदन करू भारताला जगातील सर्व संपन्न राष्ट्र बनविण्यासाठी कटिबद्ध होवू... सर्व भारतीयांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा २६ जानेवारी या दिवसाचे ऐतिहासिक महत्त्व भारतीयांसाठी अन्यनसाधारण आहे. भारताला स्वातंत्र्य १५ ऑगस्ट १९४७ साली मिळाले. त्यावेळी भारताचे स्वतंत्र्य असे संविधान नव्हते. विविध चळवळी, संघर्ष, आंदोलने, सत्याग्रह या सर्वातून मार्ग काढत भारताला स्वातंत्र्य मिळाले. याची माहिती आजच्या तरुणांना असणे खूप गरजेचे आहे. या स्वातंत्र्यात अनेक थोर सैनिकांचे योगदान महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी आहे.**

भारताचे संविधान हे संविधान समितीने २६ नोव्हेंबर, इ.स. १९४९ रोजी स्वीकारले व २६ जानेवारी इ.स. १९५० रोजी पासून भारतीय संविधान अंमलात आले. त्यापूर्वी भारताचे कायदे हे भारतीय राज्यशासनाच्या १९३५ सालच्या कायद्यावर आधारित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र भारताचे संविधान तयार करण्यासाठी मसूदा समितीची स्थापना २९ ऑगस्ट १९४७ रोजी करण्यात आली. या समितीने संविधानाचा मसुदा तयार करून तो सभेपुढे ४ नोव्हेंबर १९४७ रोजी सादर केला. या सभेने सार्वजनिक चर्चेसाठी सभागृहात हा प्रस्ताव १६६ दिवसांसाठी खुला केला. २ वर्ष, ११ महिने आणि १८ दिवसाच्या कालावधीनंतर समितीने हा मसुदा अंतिम केला. बरेचसे विचार चर्चा आणि सुधारणा केल्यानंतर समितीच्या ३०८ सद्स्यांनी दोन हस्तलिखित प्रती हिंदी आणि इंग्रजी भाषेतील २४ जानेवारी १९५० रोजी स्वाक्षरांकित केल्या. दोन दिवसानंतर हे भारताचे संविधान संपूर्ण राष्ट्रासाठी लागू करण्यात आले. भारताच्या संविधानाच्या निमित्ताने भारताचा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात येतो. यावर्षी आपण सर्वजण आपला ७४ वा प्रजासत्ताक दिन साजरा करणार आहोत.

दर वर्षी २६ जानेवारी रोजी भारताच्या राजधानीत, म्हणजे नवी दिल्ली येथे, एक मोठे संचलन आयोजित केले जाते. हे संचलन रायसीना हिलपासून राष्ट्रपती भवनापर्यंत राजपथ मार्गाद्वारे जाते. संचलनाच्या अगोदर अनाम सैनिकांसाठी बनवले गेलेले स्मारक, अमर जवान ज्योती, येथे भारताचे पंतप्रधान पुष्पचक्र अर्पण करतात. भारतासाठी आपले प्राण अर्पण करणाऱ्या वीर सैनिकांना श्रद्धांजली वाहण्यात येते आणि मग ध्वजारोहण केले जाते. यानंतर देशासाठी शौर्य गाजवणाऱ्या सैनिकांना अशोक चक्र, कीर्ती चक्र प्रदान करुण त्याचा गौरव करण्यात येतो. भारतीय सैन्याचे वेगवेगळे दल म्हणजेच घोडदळ, पायदळ, तोफखाना संचलन करतात. हा दिवस साजरा करण्यासाठी मागचा विशेष उद्देश म्हणजे लोकशाहीतील एका नव्या पर्वाची सुरुवात होय.



अभिमानाची बाब म्हणजे या वर्षीच्या प्रजासत्ताकदिनी दिल्ली राजपथावर महाराष्ट्राच्या चित्ररथात नांदेड जिल्ह्यातील माहूर रेणुकामातेचा समावेश असणार आहे. यासोबतच कोल्हापूर, तुळजापूर, आणि वणी या साडेतीन शक्तीपीठांचा देखावा सादर केला जाणार आहे. त्या समोर देवीचे गोंधळी, आणि चित्ररथावर पोतराज म्हणजेच साडेतीन शक्तीपीठांच्या रूपात नारी शक्तीचा गौरव ही थीम निश्चितच आनंददायी आणि स्त्री सबलीकरणाच्या दृष्टिकोनातून प्रेरणादायी आहे.

भारताचे सुजाण व जागृत नागरिक म्हणून प्रत्येकाने आपल्या देशाच्या कार्यकर्तृत्वाचा ठसा आपल्या कृती व विचारातून प्रतिबिंबित केला पाहिजे. व्यक्तीचा विकास म्हणजे समाजाचा विकास, समाजातून राज्याचा विकास, राज्यातून राष्ट्राचा विकास साधण्यासाठी संविधानातील मार्गदर्शक तत्वे, मूल्ये याचे तंतोतंत पालन करणे गरजेचे आहे. संविधान आपल्या देशाचा आरसा आहे जशी आपली कृती आणि वृत्ती असेल तसेच प्रतिबिंब समाजात उमटेल. ज्याप्रमाणे आपण स्वतःच्या अस्तित्वाचा सन्मान करतो त्याचप्रमाणे देशाच्या संविधानाचा सन्मान करणे महत्वाचे आहे. भविष्यात संविधान उत्तमपणे राबवण्याची जबाबदारी तरुण वर्गावरच आहे.

त्यामुळे संविधानाला योग्यपणे समजून घेणे आणि आपल्या कृतीत आणि विचारातुन समाजासाठी आमंलात आणणे हीच खऱ्या अर्थाने विकसित राष्ट्राची यशस्वी वाटचाल आहे.

संविधानातील वेगवेगळे कायदे, नियम, कलमे समाजातील प्रत्येकांसाठी समान आहेत. त्यामुळे एकता,समता, अखंडता, आदर, सहकार्य, सहानुभूती, विश्वकल्याण, विश्वबंधुत्व, मूलभूत हक्क, कर्तव्य या सर्व गोष्टी व्यवस्थित समजून घेऊन समाजात कार्यान्वित करणारा मोठा वर्ग तरुणांचा आहे. त्यामुळे प्रत्येकानेच आपली जबाबदारी आणि कर्तव्य ओळखून समाजात जीवन जगणे आणि आपल्या वर्तनामुळे इतरांच्या अधिकारावर मर्यादा येणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे. हाच खऱ्या अर्थाने संविधान दिन साजरा करणे होय.


**"उत्सव तीन रंगांचा आज साजला**
**नतमस्तक मी त्या सर्वांचा**
**ज्यांनी भारत देश घडविला "**

# चीनचा ईशान्येकडे कृत्रिम पुराचा डाव ...!

आधुनिक केसरी

अरुणाचल लगत आपल्या हद्दीत केवळ ३० किलोमीटर एवढया अंतरावर चीन सर्वात मोठा प्रकल्प बांधत आहे. ब्रह्मपुत्र नदीला मनमानी पद्धतीने बांध घालून चीन कृत्रिम पूर आणण्याचे प्रयत्न गेली सुमारे ११ वर्षे करीत आहे. अरुणाचल प्रदेशातील चीनचा प्रस्तावित प्रकल्प चीनच्या सर्वात मोठ्या जार्ज धरणाहून मोठा आहे .अरुणाचल मधील चीनच्या प्रकल्पाची उंची १८१ मीटर तर रुंदी अडीच किलो मीटर नियोजित आहे. याची क्षमता ६० हजार मेगावॅट एवढी प्रचंड असणार आहे. चीनने गेल्या ११ वर्षात ११ विधुत प्रकल्प उभारले आहेत ब्रह्मपुत्र नदीचे पाणी अडवून व त्याचा मोठा विसर्ग करून भारतामध्ये प्रसंगी कृत्रिम पुर आणण्याच्या या चीन कटावर भारताने पण आपली चाल खेळली आहे. भारताने या भागात एकूण तीन जलविद्युत प्रकल्पाची उभारणी त्वरेने सुरु केली आहे. उपनदी सुबनसिरी जलविद्युत प्रकल्पातून चालू वर्षात २ हजार मेगावॅट वीजनिमिती होणार आहे. कामेंगमध्ये ८० किलो मीटर क्षेत्रात ८२०० हजार कोटीचे दोन जलविद्युत प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. याशिवाय दिव्यांग येथे सुद्धा प्रकल्प सुरु होणार आहे. एकूणच चीनची चाल भारताने यशस्वी पणे रोखण्याचा प्रयत्न केला आहे पण भविष्यात सुद्धा भारताने सावध राहिले पाहिजे.

**- शांताराम वाघ, पुणे**



# सुख आणि दु:ख

आधुनिक केसरी

वेळ कधी एकाच जागी थांबून रहात नाही. त्याप्रमाणे सुख आणि दुःख सुद्धा आपल्याला चिकटून रहात नाही. जे आज आहे ते उद्या असेलच असे नाही. उद्या काय होणार हे जर आपल्याला माहीतीच नसेल तर त्यासाठी आपला 'आज' का खराब करताय..? येणारा उद्याचा दिवस चांगलाच असणार आहे असेच ठरवून टाका... आणि समोर येणारा प्रत्येक क्षण मनमुराद एन्जॉय करा... वेळ ही अशी गोष्ट आहे जी प्रत्येक जखमेवर मलम लावते. ज्याने वेळेचे महत्व जाणले त्याने सुखी जीवनाचे रहस्य जाणले. सुख आणि दुःख तर माणसाच्या आयुष्यातला अविभाज्य भाग आहे. तो कोणीच दुर करू शकत नाही. सुखी होण्यासाठी माणसाची अविरत धडपड चालू असते. तरी सुद्धा दुःख अचानक समोर आवासून उभे रहातं. मित्रांनो सुखाचे स्वागत करा पण दुःखाला कुरवाळत मात्र बसू नका.



जयेश अर्जुन माधव
संपर्क 9167710614

# सायकलचा वापर करायलाच हवा.!

आधुनिक केसरी



संतोष दत्तू शिंदे
संपर्क क्र. ७७२१०४५८४५

आजच्या आधुनिक काळात सायकलचा वापर करण्याची गरज निर्माण झाली आहे.संपुर्ण देशात प्रदुषणा सारखी महाभयानक समस्या उद्‌भवत चालली आहे.दैंनदीन जीवनात सर्वत्र तीन चाकी , चारचाकी, दुचाकी वाहनांचा सर्रासपणे वापर होताना दिसत आहे. सायकलकडे कोणी फिरकताना दिसत नाही.ही शोकांतिका आहे. स्वयंचलीत वाहनांमुळे दिवसेंदिवस प्रदुषणात भर पडत चालली आहे . करोडो रुपयांचे पेट्रोल जाळुन आपण अनेक आजारांना आपण प्रदुषणाद्वारे एक प्रकारे निमंत्रणच देत आहेत. अशा स्वयंचलीत वाहनांमुळे माणसे दिवसेंदिवस आळशी बनत चालली आहेत. त्यामुळे माणसांचे शरीर रोगांचे माहेरघर बनत चालले आहे.



वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे अपघातात भर पडुन देशाची प्राणहानी तसेच वित्तहानी देखिल होत आहे. ऐक काळी सायकल सर्वसामान्यांचे वाहन मानले जात होते. सायकल चालवणे हे भूषणावह मानले जायचे. परंतु आज सायकल चालवयाचे म्हटले की कंटाळा येतो. लोकांना कमी श्रमात पटकन जायचे असते . त्यामुळे सायकल न वापरता दुचाकीचा वापर वाढला आहे. लांबचा प्रवास असल्यास दुचाकी ठिक आहे. पण गावातल्या गावात सायकल वापरलीच पाहिजे. सायकल चालवल्याने हवेचे प्रदुषण होणार नाही. त्याचबरोबर पेट्रोलचा खर्च वाचेल. सायकल चालवल्याने व्यायाम होईल. माणसाचे आरोग्य देखील चांगले तंदुरुस्त राहील. अपघाताच्या प्रमाणात घट होण्यास एकप्रकारे मदतच होईल. सायकल हे प्रदुषावरील उत्तम पर्याय ठरू शकतो. खर्चीक वाहनांपेक्षा सायकलवर होणारा देखरेख खर्च कमी येतो. त्यासाठी जास्तीत जास्त सायकलींचा वापर करण्याची गरज आहे. राष्ट्रहिताचा विचार करून सायकलचा वापर करायलाच हवा.

# नेताजी-क्रांतिकारकांचे प्रेरणास्थान

आधुनिक केसरी

*(मागील अंकावरून)*

युद्धासंबंधीचे सुभाषबाबूंचे आराखडे ठरलेले होते.



भारत बल्हाळ
संपर्क क्र. 7588819471

युद्धाचा फायदा घेऊन ब्रिटिशांना भारतातून कायमचे पाठविण्याचे आंदोलन अधिक प्रखर करण्याची भाषा सुभाषबाबू करीत होते. सुभाषबाबूंनी पत्रके काढून स्वतःच्या अटकेचा विरोध केला. “माझ्या मातृभूमीच्या मुक्ततेसाठी कार्य करता येत नसेल तर मी जगून काय करणार आहे. माझी मुक्तता केली नाही तर मी अन्नत्याग करून प्राणार्पण करीन,” असे त्यांनी जाहीर केले. सुभाषबाबूंची लोकप्रियता ब्रिटिश शासनाला माहीत होती. जनक्षोभाला सामोरे जाणे त्यांना शक्य नव्हते. सरकारने सुभाषबाबूंना 5 डिसेंबर, 1940 रोजी मुक्त केले आणि कलकत्ता येथील त्यांच्या राहत्या घरातच नजरकैदेत ठेवले. हा क्रांतिसूर्य शांतपणे स्थानबद्ध कसा होऊ शकेल? एका कवीने म्हटलेच आहे – बंदिस्त राहतो का नरसिंह नित्य मुक्त क्रांतीच जन्म त्याचा, क्रांतीच एक सत्य अलौकिक पराक्रम स्थानबद्ध असताना सुभाषबाबूंनी भविष्यातील योजनांची आखणी करायला सुरुवात केली. आपण आता ज्ञानसाधना करीत आहोत, त्यामुळे कोणालाही भेटणार नाही, अशी बातमी त्यांनी सर्वत्र प्रसारित केली. किरकोळ पत्रव्यवहार आणि काही महत्त्वाच्या लोकांच्या भेटीगाठी चालू आहेत असे भासविण्यात आले. 19 जानेवारी 1941 रोजी पठाणाचा पोशाख करून झियाउद्दीन हे नाव धारण करून सुभाषबाबू स्वतःच्या घरातून अदृश्य झाले. सोबत भगतराम तलवार हा एक मित्र तेवढा होता.

26 जानेवारी 1941 रोजी ही बातमी सर्वत्र झळकली. छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या पद्धतीने स्वतःची आग्र्याहून सुटका करून घेतली होती त्याच पद्धतीने सुभाषबाबू नजरकैदेतून निसटले. सुभाषबाबू कुठे गेले याबद्दल तर्कवितर्क लढविले गेले. प्रत्यक्षात मात्र सुभाषबाबू एका खाजगी मोटारीने चाळीस मैल अंतरावरील एका छोट्याशा स्टेशनवरून फ्रांटियर मेलमध्ये बसले.

17 जानेवारीला ते पेशावरला पोहोचले. तिथून जमरूदपर्यंत मोटारीने आणि पुढे पायी चालत जाऊन त्यांनी काबूल शहर गाठले. काबूल शहरात लालचंद उत्तमचंद या व्यापाऱ्याने त्यांच्या निवासाची व्यवस्था केली. हा दोन ते तीन महिन्यांचा कालावधी सुभाषबाबूंसाठी एक अग्निदिव्यच मानावा लागेल. त्यांचे बुद्धिकौशल्य, साहस, जिद्द, निर्धार, ध्येयनिष्ठ या सर्वच गुणांचे भव्यदिव्य स्वरूप या काळातील त्यांच्या संकटमय प्रवासात दिसून आले. त्यांच्या अत्यंत रोमांचकारी जीवनाला आता सुरुवात झाली होती. काबूलमधून खरे तर सुभाषबाबूंना रशियाला जायचे होते आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्यासाठी रशियाची मदत घ्यायची होती; पण रशियन वकिलातीने ते सुभाषचंद्र बोस आहेत हे त्यांचे म्हणणे स्वीकारले नाही. अधिक वेळ वाया जाऊ नये म्हणून सुभाषबाबूंनी जर्मनीतच प्रत्यक्ष कार्य सुरु केले. जर्मनीतील हिंदी लोकांना त्यांनी संघटित करून ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढण्यासाठी प्रवृत्त केले. ब्रिटिश शासनाविरुद्ध सशस्त्र लढा देण्याचे आता सुभाषबाबूंनी निश्चित केले होते. बर्लिन आकाशवाणीवरून भारतीय जनतेने त्यांच्या आवाजातील ‘वंदे मातरम्’ आणि ‘इन्कलाब झिंदाबाद’च्या घोषणा ऐकल्या. सर्वत्र आनंदाला आणि उत्साहाला उधाण आले. बर्लिन रेडिओवरून सुभाषबाबू भारतातील आणि भारताबाहेरील सर्व भारतीयांना संघटित करून ब्रिटिश शासनाविरुद्ध लढण्याचे आवाहन करीत होते. सुभाषबाबूंनी हिटलर आणि मुसोलिनी दोघांचीही भेट घेतली; पण अपेक्षित मदत मिळाली नाही.

आझाद हिंद सेनेचा साहसपूर्ण लढा

खरोखरच लंडनला गदगदा हलवून सोडणारा सामर्थ्यशाली स्वातंत्र्यलढा सुभाषबाबूंनी उभारला. जर्मनीकडून पराभूत झालेल्या ब्रिटिशांच्या फौजेतील भारतीय सैनिकांना भारतीय स्वातंत्र्यासाठी लढण्याचे आवाहन त्यांनी केले. त्या शिपायांना घेऊन सुभाषबाबूंची पहिली आझाद हिंद फौज जर्मनमधील ड्रेस्टन येथे उभी राहिली. तो शुभ दिन होता 26 जानेवारी, 1942. आपला सध्याचा प्रजासत्ताक दिन! या फौजेचे नेतृत्व करण्यासाठी स्वतः सुभाषबाबूंनी एक वर्षभर लष्करी शिक्षण घेतले. सुभाषचंद्र बोस यांच्या उदात्त हेतूवर संशय घेणाऱ्यांनी एक गोष्ट आवर्जून लक्षात ठेवावी की, स्वतः हिटलरने सुभाषचंद्र बोस यांचा उल्लेख ‘स्वतंत्र हिंदुस्थानचे अध्यक्ष हिज एक्सलन्स सुभाष’ अशा शब्दांत केला होता. या सशस्त्र लढ्यामागील नेताजींचा उद्देश स्पष्ट व्हावा म्हणून त्यांनी जून 1942 मध्ये बर्लिन आकाशवाणीवरून केलेल्या भाषणातील छोटासा अंश इथे देत आहे.

नेताजी म्हणाले होते, “बहादूर सैनिकांनो, शेवटच्या श्वासापर्यंत शत्रूशी लढण्याची शपथ तुम्ही आज तिरंगी झेंड्याच्या साक्षीने घेतली आहे. तुम्ही स्वतः होऊन आपल्या चाळीस कोटी देशबांधवांची जबाबदारी शिरावर घेतली आहे मातृभूमीच्या चरणी सेवा रुजू करण्याची दैवदुर्लभ संधीही तुम्हाला लाभली आहे जरी आपण परकीय भूमीवर असलो तरी आपली मने आणि हृदये भारतभूमीवर आहेत एक दिवस असा उगवेल की, याच तिरंगी झेंड्याला दिल्लीच्या ऐतिहासिक लाल किल्ल्यावर तुम्ही गर्वाने मानवंदना द्याल.”

नेताजी सुभाष जरी जर्मनीत असले तरी भारतातील प्रत्येक घटनेवर त्यांचे संपूर्ण लक्ष होते. 1942 च्या ‘चले जाव’ चळवळीच्या वेळी नेताजी सुभाष यांची भाषणे सुरुवातीला बर्लिन नभोवाणीवरून व नंतर पूर्वतील नभोवाणीवरून सतत चालू होती. त्या भाषणापासून भारतातील हजारो स्वातंत्र्यसैनिकांनी प्रेरणा घेतली होती. तिकडे जपानमध्ये रासबिहारी बोस यांनी ‘आझाद हिंद’ सेनेची स्थापना केली होती. त्यात प्रामुख्याने जपानला शरण गेलेल्या ब्रिटिशांच्या फौजेतील भारतीय शिपाई होते. नेताजी सुभाषचंद्र बोस हेच या आझाद हिंद सेनेला योग्य नेतृत्व देऊ शकतील याची खात्री असल्यामुळेच रासबिहारी बोस यांनी नेताजींना जपानमध्ये येण्याची विनंती केली.

बँकॉक येथे जून 1942 मध्ये भरलेल्या पूर्व आशियायी भारतीयांच्या परिषदेत ही विनंती नेताजींना करण्यात आली. दक्षिण आफ्रिकेपर्यंत जर्मन ‘यू’ बोटीने आणि त्यानंतर जपानमधील पेगैंगपर्यंत जपानी पानबुडीने साहसपूर्ण प्रवास करून नेताजी जपानला आले. पेनँग ते टोकिओ हा प्रवास विमानाने करून नेताजी 16 मे, 1943 रोजी जपानमधील आझाद हिंद फौजेसमोर दाखल झाले. आझाद हिंद फौजेत प्रचंड उत्साहाला उधाण आले. आझाद हिंद सेनेच्या जवानांसह सुभाषबाबूंनी ब्रिटिशांविरुद्ध दिलेला लढा हा अनेक साहसांनी, प्रचंड पराक्रमाच्या अनेक गाथांनी, कारुण्यमय घटनांनी भरलेला असा लढा आहे. जाज्वल्य देशभक्तीचा प्रत्यय आणून देणारे असंख्य प्रसंग, निर्धार आणि निष्ठा यांचा साक्षात्कार घडविणाऱ्या अनेक प्रसंगांनी हा रोमांचकारी लढा भरलेला आहे. तो एक स्वतंत्र कादंबरीचा विषय आहे. काही मोजक्या घटना मी इथे देत आहे. 1943 ते 1945 या कालावधीत नेताजी सुभाष यांनी स्वातंत्र्यलढ्याची दुसरी आघाडी उघडली. सनदशीर मार्गाने स्वदेशात त्यांनी जो स्वातंत्र्यलढा उभारला होता त्या लढ्याने ब्रिटिश शासन खिळखिळे झाले होते. या दुसऱ्या सशस्त्र लढ्यामुळे ते हादरून गेले. भारतमाता स्वतंत्र होईल असा आत्मविश्वास नेताजी त्यांच्या प्रत्येक भाषणातून व्यक्त करीत होते. नेताजींच्या आवेशपूर्ण भावनांनी प्रभावित होऊन हजारो युवक-युवती आझाद हिंद सेनेत भरती झाले. कु. लक्ष्मी स्वामिनाथन, जानकी दावर यासारख्या अनेक युवतींनी स्वयंस्फूर्तीने आझाद हिंद सेनेत प्रवेश मिळविला. पूर्वेकडील देशात राहणाऱ्या हजारो भारतीयांनी आपले तनमनधन नेताजींच्या आझाद हिंद सेनेला अर्पण केले. एका पारड्यात नेताजींना बसवून दुसऱ्या पारड्यात स्वतःचे सौभाग्य अलंकार टाकून, त्याची तुला करून त्यांनी आझाद हिंद फौजेला अर्पण केली. गरीब, श्रीमंत, म्हातारे, तरुण, स्त्री-पुरुष सर्व आपले सर्वस्व अर्पण करायला सिद्ध झाले. स्वातंत्र्ययुद्धाची पहिली महिला सेना कॅ. लक्ष्मी स्वामिनाथन यांच्या नेतृत्वाखाली नेताजींनी उभारली. जात, धर्म, पंथ, भाषा हे सर्व भेद विसरून जाऊन ‘वंदे मातरम्’, ‘चलो दिल्ली’ या घोषणा देत पुढे जाणारी देशभक्तीने भारावलेली ती फौज होती. देशाच्या स्वातंत्र्यासाठी जीवनाच्या शेवटच्या सापर्यंत लढण्याचा निर्धार प्रत्येकाने व्यक्त केलेला.

या फौजांची विजयी आगेकूच चालू होती. 21 ऑक्टोबर, 1943 रोजी सिंगापूर येथे आझाद हिंद सरकार’ ची स्थापना करण्यात आली. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली अस्तित्वात आलेल्या या हंगामी शासनाला जपान, जर्मनी, ब्रह्मदेश, इटलीसह एकूण अकरा देशांनी मान्यता दिली. याप्रसंगी नेताजींनी केलेल्या भावपूर्ण भाषणातील फक्त एकच वाक्य इथे उद्धृत करीत आहे. नेताजी म्हणाले, “शस्त्रबद्ध आणि कटिबद्ध होऊन आम्ही व आमचे बहादूर सहकारी भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठी, तिच्या सौख्यासाठी आणि जगामध्ये तिची मान उंचावण्यासाठी आत्मसमर्पणाची शपथ घेत आहोत.” या आझाद सरकारचे आझाद मंत्रिमंडळही होते. या सरकारने इंग्लंडविरुद्ध स्वातंत्र्ययुद्धाची घोषणा केली. स्वतःची तिकिटे आणि नोटाही काढल्या. जपानने जिंकलेली अंदमान आणि निकोबार ही दोन बेटे नेताजींच्या ‘आझाद हिंद सरकार’ला बहाल केली. नेताजींनी त्या बेटांचे नामकरण अनुक्रमे ‘शहीद बेट’ आणि ‘स्वराज्य बेट’ असे केले.

ब्रह्मदेशातून आझाद हिंद सेनेने भारताच्या दिशेने आगेकूच केले. ‘चलो दिल्ली’, ‘दिल्ली अब दूर नहीं’, ‘तुम मुझे खून दो मैं तुम्हे आझादी दूंगा’ या नेताजींच्या घोषणा सर्वत्र निनादत होत्या. भारताच्या भूमीवर पाऊल ठेवताच ‘आझाद हिंद सेने’तील सैनिक आनंदाने नाचायला लागले. यांनी भारताचा ‘तिरंगी झेंडा’ उंच फडकावला. ‘चलो दिल्ली’च्या घोषणेने आसमंत दणाणून गेले.

18 मार्च, 1944 हा तो शुभदिन होता. आपल्या सर्व शूर शिपायांसोबत नेताजी प्रत्यक्ष युद्धाच्या आघाडीवर असायचे. ब्रिटिशांनी आझाद हिंद सेनेच्या पराभवासाठी आपले सर्वस्व पणाला लावलेले होते. आझाद हिंद सेनेला प्रचंड प्रतिकूल परिस्थितीचा सामना करावा लागत होता. अन्नपाण्याचा, शस्त्रास्त्रांचा तुटवडा, शत्रूंचे प्रचंड सैन्यबळ अशा अनेक समस्या समोर होत्या; परंतु स्वातंत्र्याची दुर्दम्य इच्छाशक्ती मनाशी बाळगून प्रत्येक शिपाई लढत होता. कंदमुळं खाऊन शिपाई लढत होते. नेताजींचे स्फूर्तिदायक शब्द त्यांना प्रेरणा देत होते. त्याच वेळी नेताजी रंगून आकाशवाणीवरून भारतीय जनतेला स्वातंत्र्यलढा नेटाने चालू ठेवण्याचे आणि कुठल्याही परिस्थितीत फाळणी न स्वीकारण्याचे आवाहन करीत होते.

भारतातून मिळविलेल्या आर्थिक आणि लष्करी मदतीच्या बळावर असंख्य अंदाज! कित्येक वर्षांपर्यंत भारतीय जनतेच्या मनाचे पाखरू आशेच्या आकाशात घिरट्या घालीत होते; पण ते वास्तव शेवटी देशाला पचवावे लागले. सर्व चौकशी समित्यांनी नेताजी विमान अपघातात गेले असल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला. एक महान आत्म्याचे महानिर्वाण-महाबलिदान! नेताजी सुभाष यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यासाठी जपानी मदत घेतली म्हणून त्यांच्या कार्याचे मोल कमी करण्याचा केविलवाणा प्रयत्न केवळ दुर्दैवीच मानावा लागेल. नेताजी सुभाषचंद्र बोस हे काही एखादे अविचारी लष्करप्रमुख नव्हते. आय.सी.एस.च्या परीक्षेत सबंध इंग्लंडमध्ये गुणानुक्रमे चौथा क्रमांक सहज मिळविणारे व त्याचा त्याग करणारे एक अत्यंत प्रखर बुद्धिमत्ता लाभलेले विद्वान! स्वातंत्र्य, समता, बंधुता या महान तत्त्वांचा पुरस्कार करणारे एक महान लोकनेता! निःधर्मी, सुधारणावादी, विज्ञाननिष्ठ, बलदंड, सुसंस्कृत, साम्यवादी, लोकशाहीप्रधान, श्रेष्ठ भारताच्या निर्मितीसाठी धडपडणारे द्रष्टे राजकारणी! स्वतःच्या प्राणापेक्षाही मातृभूमीवर नितांत प्रेम करणारे देशभक्त! अशी त्यांची प्रतिमा होती. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यासाठीच ते जगले आणि त्या प्रयत्नातच त्यांचा अंत झाला. उपोषणे, आंदोलने, निदर्शने यापासून ते ते सशस्त्र क्रांतीपर्यंतच्या सर्व मार्गांचा त्यांनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी अवलंब केला. गांधीजींपासून हिटलरपर्यंत सर्वांचेच सहकार्य घेतले. भारताचे स्वातंत्र्य हे एकच उदात्त ध्येय त्यांनी ठरविले होते.

**संशोधक विद्यार्थी:-**
**मराठी-पी.एच. डी. अपियर) रिसर्च सेंटर:-**
**अंकुशराव टोपे कॉलेज जालना**





# साप हा शेतकऱ्यांचा मित्र

आधुनिक केसरी

माझ्या जवळ असलेल्या जडीबुटीने याला लगेच बरा करतो” या व्यक्तीस कसल्याच उपचाराची गरज नसते पण अज्ञाना मुळे ही गोष्ट आपल्याला माहिती नसते आणि या मांत्रिकामूळेच आपल्या माणसाचे प्राण वाचले असे समजतो आणि मुह मांगी किमत या मांत्रिकाला अदा करतो.( मग काय झाला ना मांत्रिकाचा धंदा जोरात. ) हे झालं बिनविषारी सर्पदंशाच पण समजा एखाद्याला विषारी सापाने दंश केला असेल आणि त्या व्यातीस विषबाधा झाली असेल तर मांत्रिकाच्या हे लक्षात येते कि हा सर्पदंश विषारी आहे. पण तो असे कधीच म्हणत नाही की याचे उपचार मला येत नाही. उलट तुमच्याच चुका तो काढायला लागतो, देवाचा कोप आहे, तुमच्या कर्माचे फळ आहे, तुम्ही याला माझ्याकडे आणायला उशीर केलात वगैरे वगैरे काही मांत्रिक तर मंत्र तंत्र करत सर्पदंश झालेल्या व्यक्तीस ताटकळत ठेवतात आणि त्यातच त्याचा जीव जातो. आणि मग देवालाच हे मान्य नव्हते त्याला मी तर काय करणार असे म्हणून तो आपली बाजू 'सेफ' करतो. तर सर्पदंश झाल्यास दवाखान्यात जाणे हा एकमेव उपाय आहे आणि तांत्रिक मांत्रिक हे सगळं थोथांड आहे हे आपणास आता लक्षात आले असेल.



सागर सोनवणे
संपर्क 7757847104

साप ही राष्ट्रीय संपत्ती असून तिचे रक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.पूर्वी गारुडी सापांचा खेळ करत व सापांबद्दल भीती आणि अंधश्रद्धा पसरवत. त्यात फिल्म इंडस्ट्री तर कशी मागे पडेल म्हणा. त्यांनीही साप या प्राण्याला नकारार्थी दृष्टीकोनातून जगासमोर मांडले.साप पुंगीच्या तालावर नाचतो काय, दुध काय पितो,जोडीदाराची हत्या झाल्यास बदला काय घेतो अश्या एक ना अनेक चुकीचा गोष्टी सापांबद्दल दाखवून गारुड्यांच्या खांद्याला खांदा लावल्याचे दिसते. या गोष्टी आजही मनात खोलवर रुजल्या असून साप हा आपला 'शत्रूच' आहे असा एक चुकीचा समज आपण करून घेतला आहे. **सापाचे खाद्य :** सापाच्या उत्क्रांतीमध्ये त्याचे खाद्य हा एक महत्वाचा घटक आहे.सापाचे आवडते खाद्य उंदीर असल्याचे आपण ऐकले आहे, कदाचीत उंदीरही बिळात राहत असल्याने त्याचे ते आवडते खाद्य बनले असावे आणि त्याचबरोबर बिळात व आसपास सापडणारे पाल,सरडे,बेडूक, किडे, गांडुळा इत्यादी साप खाऊ लागला. काही सापांना काहीच खाद्य मिळाले नसल्याने त्यांनी इतर साप खाणे पसंत केले. मोठे साप आपलं वर्चस्व कायम ठेवण्यासाठी लहान सापांना मारून खाऊ लागले. साप मांसाहारी प्राणी असून तो स्वतः जिवंत शिकार कारून खातो. प्रत्येक सापाचे अन्न त्याच्या आकारा वरून ठरले आहे. लहान साप छोटे कीटक व त्यांची अंडी खातात, मध्यम आकाराचे साप उंदीर, घूस, पाल, सरडे, पक्षी, पक्षांची अंडी खातात तर आकाराने मोठे व अवाढव्य साप मांजर, शेळी, हरीण, गायीचे पिल्लू इत्यादी खातात. अंडीखाऊ साप फक्त पक्षांची अंडी खाऊन जगतात. हा साप खराब झालेले व भृणाची वाढ झालेले अंडी खात नाही. त्याला ताज्या व सडलेल्या अंड्यातील फरक समजतो. सापाचा जबडा माणसाच्या जबड्या प्रमाणे जोडलेला नसतो त्यामुळे साप आपलं तोंड 150 पर्यंत उघडतो आणि म्हणूनच साप आपल्या आकारा पेक्षा मोठा प्राणी गिळू शकतो.

**विना खवल्यांचा साप :** सापाचे खवले जमीन,दगड,काटे इत्यादी टोकदार गोष्टींशी होणाऱ्या घर्षणा पासून त्वचेचे रक्षण करतात. म्हणूनच साप कसल्याही अडगळ व अडचणीतून मार्ग काढू शकतो.पण निसर्गात काही साप विना खवल्याचे जन्मतात. त्यांच्या शरीरावर खवल्यांचा थरच नसतो किंवा अगदी कमी प्रमाणात असतो. पण सापाच्या शरीराच्या खालच्या बाजूस हा थर कमी अधिक प्रमाणा असतो. हा त्वचा रोग नसून बाह्य त्वचेवरील ( EPIDERMIS ) आवरणाची कमतरता असते ज्याच्या पासून खवल्यांची निर्मिती होते. सापाच्या शरीरावर खवले नसण्याचे प्रमुख कारण म्हणजे बिटा-केराटीन ( B-KERATIN )ची कमतरता होय. हे एक प्रकारचे प्रथिने आहे. हि कमतरता जन्मतः असते किंवा काही कालांतराने होते. जर नर आणि मादी दोघेही विना खवल्याचे असतील तर त्यांची पिल्लेही पूर्ण विना खवल्याची जन्मतात. नर किंवा मादी पैकी एक विना खवल्याचा असेल तर त्याची पिल्ले काही प्रमाणात विना खवल्याची जन्मतात. या सापांना निसर्गात जगण्यासाठी खूप संघर्ष करावा लागतो. खवल्यांच्या कमतरते मुळे ते मंद गतीने हालचाल करतात. अश्या परिस्थितीत यांना लपणे अवघड होते आणि यामुळे सहज शत्रूच्या नजरेस पडतात. हे साप जास्त वेगाने हालचाल केल्यास त्वचेचे जास्त घर्षण होऊन इजा होऊ शकते. खवल्यांच्या कमतरते मुळे अतिनील ( ULTRAVIOLET ) व अवरक्त ( INFRARED ) किरणांचा या सापांवर अतिशय परिणाम होतो. हि किरणे जास्त काळ थेट त्वचेवर पडल्याने अन्य त्वचारोगही होण्याची दाट शक्यता असते. अंगावर खवले नसले तरी हे साप कात टाकतात. शरीराच्या वरील भागावर खवले नसले तरी पोटाकडील बाजूस खवले असतात. इतर सापाच्या तूलनेत या सापांची कात जास्त पातळ असते. हे साप दिसायला नकली रबराच्या सापासारखे वाटतात. अंगावर खवले नसल्याने त्यांची त्वचा जळाल्याप्रमाणे दिसते. या सापांना जगण्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षामुळे हे साप जास्त दिवस जगू शकत नाहीत आणि म्हणूनच हे अतिशय दुर्मिळ असतात.

# देशाची शान, भारतीय संविधान



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**जगातील सर्वात जास्त विविधता असलेला भारत हा एकमेव देश आहे. भारतामध्ये रंग, रुप, उंची, जात, धर्म, पंथ,वर्ण, खान पाण राहणीमान, बोलीभाषा, संस्कृती, उपासना प्रत्येक बाबींमध्ये विविधता आढळते. या विविधतेला एकत्रीत करून आदर्श देशाची निर्मीती भारतीय संविधानाने केलेली आहे. भारतीय संविधान व भारतीय लोकशाही ला जगामध्ये एक आदराचे स्थान निर्माण झालेले आहे. सर्वात मोठे लिखित संविधान आणि जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेले एकमेव राष्ट्र म्हणजे भारत आहे. भारतीय संविधान तयार करणे हे अत्यंत कठीण व बौद्धिक मेहनतीचे काम होते. बौद्धिक मेहनत घेणारा, देशाप्रती प्रामाणिक व माणसाप्रती इमानदार असलेला विद्वानच हे निर्माण करू शकत होता.**

म्हणून अनेक उच्च वर्णीय धर्माच्या ठेकेदारांनी, विषमतेच्या पालकांनी एक गोष्ट ठरवून घेतली होती ती म्हणजे घटना समीती मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना येऊच द्यायचे नाही. ते का येऊ द्यायचे नाही तर याचे उत्तर धर्मग्रंथात दडलेले होते. डॉ बाबासाहेब आंबेडकर अतिशुद्र वर्णातील अस्पृश्य समाजातील, आणि मनुस्मृती सांगते शुद्रवर्णातील कितीही विद्वान व्यक्ती असेल तर तो पूजनीय, वंदनीय नाही. शुद्रांनी फक्त वरच्या तिन वर्णाची सेवा करायची , त्यांना शिकवायचे नाही कारण शिकवण्याचा अधिकार एका वर्णाने स्वतः कडे ठेवून हजारो वर्षांपासून त्यावर मक्तेदारी निर्माण केली. म्हणून अस्पृश्य समाजातील डॉ बाबासाहेब आंबेडकर जर घटना समीतीमध्ये आले तर त्यांच्या सोबत बसावे उठावे लागेल, त्यांचे किमान ऐकुन घ्यावे लागेल आणि हे सर्व करताना धर्म बुडेल. धर्म वाचवण्यासाठी का होईना पण डॉ बाबासाहेब आंबेडकर हे घटना समितीमध्ये येऊ नये म्हणून अनेक कटकारस्थान केले गेले. परंतु भारत देशात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या एवढा प्रामाणिक, देशाप्रती व मानसाप्रती इमानदार, आणि विशेष म्हणजे कायद्याचा विद्वान, आणि जबाबदार व्यक्ती यांना शोधूनही सापडेना म्हणून एकमेव पर्याय म्हणजे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची विद्वता, प्रामाणिक पणा, आणि देशाविषयी असलेली निष्ठा यावर शत्रुला देखील शंका नव्हती म्हणून फक्त घटना समितीमध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना घेतले नाही तर देशाच्या घटनेचा अर्थात संविधानाचा मसुदा बनवण्याची अंत्यत महत्वाची जबाबदारी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना द्यावी लागली ती केवळ आणि केवळ त्यांची विद्वता, प्रामाणिक पणा व देशनिष्ठा बघुनच. देशामध्ये वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, आणि विषमता एवढी माजली होती की मानुसकी ला काळीमा फासणाऱ्या गोष्टी देशात जाहीर होत होत्या त्या आजही थांबल्या असे नाही पण आज संविधानीक संरक्षण आहे हेच सर्वात मोठे परिवर्तन आहे. अस्पृश्यतेमुळे, जातीय द्वेषामुळे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना वर्गात बसण्याची मुभा नव्हती, शाळेतील पाणी पिण्यास मनाई होती, अशा प्रकारे अनेक मनाला चटके लावणाऱ्या गोष्टी होत्या ज्यामुळे माणूस असुन माणसे माणुसकीने वागत नव्हते. त्याचे चटके सहन केलेल्या विद्वानालाच त्या देशाचे संविधान लिहण्याची जबाबदारी मिळाली ही विषमतेवर, वर्णव्यवस्थेवर आणि विसमतेच्या पालकावर खूप मोठा घनाघात होता. ज्या व्यवस्थेने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या वर अन्याय केले, विकासाचे द्वारे बंद केले होते त्याच व्यवस्थेला न्याय, व त्यांच्या ही विकासाची द्वारे उघडून देशाला मानुसकी आणि मानवतेची देन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिली. आणि हे जगातील एकमेव आदर्श उदाहरण आहे. स्वतः विषमतेचे चटके सहन करणाऱ्या महामानवाने देशात समता प्रस्थापित केली आहे येथील दबलेल्या, पिळलेल्या, उपेक्षित, दूर्लक्षीत घटकांना समोर येण्याची संधी निर्माण झाली. आणि याच संधिचा फायदा घेऊन शेती करणारा शेतकरी देशाच्या संसदेत गेला, गावाबाहेर भटकंती करणाऱ्यांचे मुल कलेक्टर, कमीशनर झाले, अस्पृश्य समाजातील लोक देशाचे नियोजन करू लागले. आणि ज्यांना दरवाज्याची चौकट ओलांडता येत नव्हती, पुरुषांच्या दबावाखाली राहून फक्त घरच सांभाळावे लागत होते अशा महिला राष्ट्रपती बनून देश सांभळत आहेत हे फक्त आणि फक्त डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेल्या देशाच्या मानवतावादी संविधानामुळेच. आणि म्हणून देशाचा मान भारतीय संविधान आहे. संविधानाच्या अगोदर स्त्रियांची परिस्थिती बघितली तर स्त्रिला गुलामच नाही तर पशु सारखे जिवन जगावे लागत होते. स्त्रियांवर येथील समाजाने अमानुष अत्याचार केले आणि स्त्रिला कधी माणूस म्हणून वागवलेच नाही. सावित्रीमाई फुले यांनी स्त्रियांसाठी जेव्हा पहीली शाळा सुरू तेव्हा स्त्र शिकली म्हणजे धर्म बुडतो म्हणून सावित्रीमाई फुले यांना महिलांना शिक्षण देऊ नये, त्यासाठी अडथळा निर्माण व्हावा म्हणून सावित्रीमाई फुले यांच्या अंगावर शेण माती, घरातील खरकटे पाणी टाकून अवमानीत केले जायचे. जी महिला महिलांना शैक्षणिक प्रवाहात आणुन महिलांचे जिवन प्रकाशमय करण्यासाठी समोर येते त्या महिलेच्या अंगावर शेणमाती फेकणे हा कोणता, धर्म आणि हि कोणती संस्कृती होती. आणि विषेश म्हणजे महात्मा जोतिबा फुले हे मोठे उद्योजक होते, सुशिक्षित होते. महात्मा फुलेंकडे पैशाची अडचण नव्हती. अशा सुशिक्षित व उद्योगपतीच्या पत्नीला म्हणजे सावित्रीमाई फुले यांच्यावर येथील धर्म व्यवस्थेने शेण फेकले परंतु संविधान लागु झाले आणि महिलांना शिकवणाऱ्या सावित्रीमाई फुले यांच्या फोटोवर फुले वाहून सन्मान झाला आणि सावित्रीमाई फुले यांच्या शैक्षणिक मार्गाने जाणाऱ्या महिलांचा आदर सत्कार हा फुलांनी केला जातो हि देन डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि संविधानाची आहे. घरामध्ये स्त्रियांना नेहमी दुय्यम वागणूक दिली जायची. राहणीमानापासुन तर खामपान पर्यंत महिलांना दुय्यम आणि हिन वागणूक मिळत होती. घरातील पुरुषांना चेहरा ही दाखवण्याचे स्वातंत्र्य नव्हते. घरातील पुरुष व्यक्ती जेवल्यानंतरच महिलांना उरलेले वा शिळे अन्न खावे लागे, परंतु आज महीला पुरुषांप्रमाणे पोशाख, पुरुषांबरोबर आहार, घराबाहेर स्वतंत्र व संरक्षित विहार करू शकतात ते फक्त आणि फक्त भारतीय संविधाने. एवढेच नव्हे तर ज्या महिलांना घरातील व्यवहारात लक्ष देऊ आपले मत मांडता येत नव्हते आता महिला देशाच्या अर्थ मंत्री होतात. घरातच नव्हे देशात काय करायला पाहिजे आणि काय करू नये यावर परखड, निर्भिड मत मांडतात, कोणत्याही ठिकाणी शासकीय पातळीवर नोकरी करत असताना पुरुषांएवढाच पगार महिलांना मिळतो हा अधिकार बहाल केला भारतीय संविधानाने. कोणत्याही क्षेत्रात महिला कार्यरत असेल. मातृत्व हे निसर्गाची देण आहे म्हणून तिच्या मातृत्वाचा तिच्या आर्थिक आणि वैयक्तीक जिवनावर कोणताही परिणाम होऊ नाही म्हणून पगारासह प्रसुती रजा देऊन महिलांच्या मातृत्वांचा देखील सन्मान भारतीय संविधान करते हीच सर्वात मोठे संरक्षण स्त्रियांना मिळाले आहे.




गावकुसाबाहेर राहणारा असो मोठ्या शहरात मोठ्या इमारतीमध्ये राहणारा असो, कार्यालयातील प्रथमवर्ग अधिकारी असो वा चतुर्थ श्रेणी कर्मचारी असो, शिक्षीत असो वा अडाणी असो, महिला असो वा पुरूष असो प्रत्येकाच्या मताला एकच किंमत देऊन प्रत्येक नागरिकांना स्वाभिमान, सन्मान बहाल करणारे भारतीय संविधान जागतिक अभ्यासाचा विषय आहे. ज्यांना व्यवस्थेने गावाच्या बाहेर ठेवले अशाही समुहाला भारतीय संविधानाने गावात तर आणले, त्यांचे गावात घरे झाली, मुले शिकले, प्रवाहामध्ये आली, ज्यांना गावात येता येत नव्हते त्यांना विधान सभा लोकसभा मध्ये जाण्याची आणि गावकुसाबाहेर राहणाऱ्या लोकांच्या हिताचे कामे करण्याची संधी निर्माण करून दिली आणि त्यांच्या सन्मानही केला. भारताच्या संविधानाचा आपण सखोल अभ्यास केला आणि इतिहास वाचला तर प्रत्येक नागरिकांना ज्यांच्या मध्ये प्रामाणिकता आहे त्यांना संविधान स्वतः च्या विकासाचा सर्वात मोठा मार्ग आहे याची जाणीव होईल. भारताचे संविधान जरी दोन वर्षे अकरा महिने, अठरा दिवसात तयार झाले असले तरी हे तयार होताना दोन हजार वर्षांपासुन चालत आलेल्या अन्याय, अत्याचार, विषमतावादी व्यवस्थेला सुरुंग तर लावलाच. परंतु देशात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकांना आपापल्या धर्माचे पालन करण्याचा, त्या नुसार उपासना करण्याचा अधिकार प्रत्येक धर्माला दिला. परंतु देशात कोणत्याही धर्माला महत्त्व न देता माणसाला महत्व देऊन प्रत्येकाची ओळख भारतीय असेल. म्हणून देशात जरी अनेक धर्म असतील तरीही आमची ओळख फक्त भारतीय आहे. अशा प्रकारे विविधते मध्ये एकता प्रस्थापित करून मानसाला माणुसकी सोबत विकासाच्या सर्वोच्च शिखरावर पोहचवणारे भारतीय संविधान आहे. आणि तेच खऱ्या अर्थाने देशाची शान आहे.

# नव्या तंत्रज्ञानाने मंगळ मोहिमांना येणार गती



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली


आधुनिक केसरी

**मंगळ ग्रहावर जीवनासाठी पोषक वातावरण निर्माण करून तेथे मानवी वस्ती स्थापण्याच्या महत्त्वाकांक्षी योजनेवर अनेक देशांनी काम सुरू केले आहे. यात अमेरिकेची नासा आघाडीवर आहे. पाठोपाठ चीन,रशिया यांचेही जोरदार काम चालू आहे. काही वर्षांपूर्वी स्टिफन हॉकिंग्ज यांनी 'या पृथ्वीवर मानवजातीला आता वास्तव्यासाठी फार काळ राहिलेला नाही.जेमतेम शंभर वर्षं.त्यानंतर काय. याची तजवीज आताच करावी लागेल,' असं एक विधान केलं होतं. ते बरंच गाजलंही. त्यावर उलटसुलट चर्चाही झाल्या.**

त्यातला वायूप्रदूषणाचा, जागतिक तापमानवाढीचा आणि त्यामुळं होणाऱ्या संभाव्य पर्यावरण ऱ्हासाबाबत गांभीर्याने बोलले जात आहे. काही वर्षांत होणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या आणि शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याच्या दुर्भिक्ष्याला माणूस कारणीभूत असणार आहेच. बदलत्या हवामानातून तसं सूचित होत आहेच, त्यामुळे अन्य ग्रहावर वसाहत करून राहण्याची मानवाला घाई झाली आहे.

२०३३ पर्यंत मंगळावर मानव पोहोचवणे असा नासाचा उद्देश आहे. यासंबंधी येणाऱ्या प्रत्येक आव्हानाचा मुकाबला करण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून सुरू आहे. मंगळावर प्राणवायू तयार करणे हेदेखील त्या आव्हानांपैकीच आहे. कारण खूप मोठ्या प्रमाणात ऑक्सिजन सोबत घेऊन जाणे व्यवहार्य ठरत नाही. म्हणूनच मंगळावर प्राणवायू तयार करणे गरजेचे आहे. आता यातच नव्या तंत्रज्ञानामुळे मंगळावर पोहचण्यासाठी जो लागणारा कालावधी आहे, तो खूपच कमी होणार आहे. यामुळे मंगळ मोहिमा जास्तीतजास्त आखता येणार आहेत.

पृथ्वीपासून मंगळापर्यंतचा प्रवास ७ महिन्यांचा असतो. मंगळावर आतापर्यंत गेलेल्या सर्व रॉकेट्सना इतकाच कालावधी लागला आहे, परंतु आता एका नव्या तंत्रज्ञानाच्या मदतीने हा प्रवास केवळ ४५ दिवसांचा राहणार आहे. या नव्या तंत्रज्ञानाचे नाव 'न्युक्लियर थर्मल अँड न्युक्लियर इलेक्ट्रिक प्रॉपलशन' आहे. नासा मंगळासाठीच्या मानवी मोहिमेकरता आण्विक इंधनाचा वापर करता येईल अशाप्रकारच्या रॉकेटची निर्मिती करणार आहे. वैज्ञानिकांनी रॉकेटचा पहिला टप्पा विकसित करण्यास सुरुवात केली आहे. रॉकेट निर्मितीसाठी दोन तंत्रज्ञानाचा वापर होणार आहे. न्यूक्लियर थर्मल प्रॉपल्शनमध्ये न्युक्लियर रिअँक्टर असेल, जो लिक्विड हायड्रोजन प्रोपेलेंट तप्त करणार आहे. यातून प्लाझ्मा तयार होणार असून तो रॉकेटच्या नॉजलमधून बाहेर पडेल, यामुळे रॉकेटला पुढे जाण्यास मोठा वेग मिळणार आहे. न्युक्लियर इलेक्टिक प्रोपल्शन या दुसऱ्या तंत्रज्ञानात न्युक्लियर रिॲक्टर आयन इंजिनला इलेक्ट्रिसिटी पुरविणार आहे, यामुळे इलेक्ट्रोमॅग्नेटिक फील्ड तयार होईल. हे क्षेत्र जेनॉनसारख्या वायूंना वेग प्रदान करते, यामुळे रॉकेटला पुढे जाण्यासाठी वेग मिळतो. नव्या तंत्रज्ञानादारे वैज्ञानिक रॉकेटच्या कामगिरीला जवळपास दुप्पट करू शकतील. रॉकेट निर्मितीची ही संकल्पना प्लोरिडा युनिव्हर्सिटीतील हायपरसोनिक्स प्रोग्राम एरिया लीड श्रोफेसर रेयान गोसे यांनी मांडली. सद्यकाळात वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानादारे अंतराळयान पृथ्वीहून मंगळावर जाण्यासाठी ७-९ महिन्यांचा कालावधी लागतो. याच वेगाने मानवी मोहीम राबविली गेल्यास दर २६ महिन्यांमध्ये एक अंतराळयान मंगळाच्या दिशेने झेपावणार आहे. परंतु नव्या तंत्रज्ञानादारे मंगळावर जाण्याचा मार्ग सोपा होणार आहे. पृथ्वीपासून



मंगळापर्यंतचा प्रवास केवळ ४५ दिवसांचा ठरणार आहे. यामुळे मोहिमेचा खर्च कमी होणार आहे. तसेच अंतराळातील शून्य गुरुत्वाकर्षणामुळे मानवी प्रकृतीशी निगडित धोक्यांची तीव्रताही कमी होणार आहे.

यापुढचा टप्पा हा मंगळावर मानववस्ती करण्यासाठीचा आहे. पृथ्वीपासून कोट्यवधी किलोमीटर अंतरावर असलेल्या मंगळ ग्रहावर सजीवांना जगण्यासाठी उपयुक्त ठरणारा ऑक्सिजन अर्थात प्राणवायू असल्याचे पुरावे तर आढळले आहेतच. अमेरिकेच्या नासा या संस्थेने पाठवलेल्या पर्सिव्हरन्स रोव्हरने मंगळ ग्रहावरील कार्बन डायऑक्साइडने भरलेल्या वातावरणातून ५.३७ ग्रॅम ऑक्सिजन संकलित केला. रोव्हरमधील टोस्टरच्या आकाराच्या यंत्राने ही कामगिरी केली असून या यंत्राचे पूर्ण नाव मार्स ऑक्सिजन इन-सीटू रिसोर्स युटिलायझेशन एक्सपेरिमेंट (मॉक्सी) असे आहे. त्यामुळे मंगळावर वसाहत करून राहण्याचे स्वप्न दृष्टिक्षेपात असल्याचं मानलं जात आहे.


नासाने मंगळ ग्रहावर इंजिन्युटी हेलिकॉप्टर उडवले आणि त्याच्या पोटातून बाहेर आलेल्या मॉक्सीने मंगळाच्या वातावरणातून ऑक्सिजनचे संकलन केले. मंगळ ग्रहावर ऑक्सिजन असल्याचे निष्पन्न झाल्याने त्या ठिकाणी मानवी वस्ती करणे शक्य आहे. या ऑक्सिजनचा वापर तिकडून पृथ्वीवर परत येणाऱ्या यानात इंधनाच्या रूपाने केला जाऊ शकतो. अंतराळवीरांना मंगळाच्या वातावरणातून किमान श्वास घेता येऊ शकेल एवढा ऑक्सिजन संकलित करता येऊ शकेल. मानववस्तीसाठी अजून फार मोठा पल्ला गाठायचा असला तरी मात्र यामुळे फार मोठी आशा निर्माण झाली आहे.

नासाच्या स्पेस टेक्नॉलॉजी मिशन डायरोक्टेरेटचे प्रशासक जिम रियूटर यांच्या मते मंगळ ग्रहावरील वायूमंडळ अतिशय हलके आणि पातळ आहे. कार्बन डायऑक्साइडने भरलेल्या वातावरणातून ऑक्सिजन संकलित करणे अतिशय गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. परंतु मॉक्सीने ही कामगिरी केली.अंतराळवीरांना हा ऑक्सिजन दिला तर ते किमान १० मिनिटे तग धरू शकतात, एवढा प्रभावी हा ऑक्सिजन आहे. अंतराळवीरांना जर एक वर्ष मंगळ ग्रहावर रहायचे असेल तर त्यांना १००० किलोग्रॅम एवढा ऑक्सिजन लागेल. हे खरे आहे की, आण्विक उर्जेच्या माध्यमातून पुरेशी उष्णता आणि विद्युत ऊर्जा उपलब्ध होऊ शकल्यास मंगळ हा पृथ्वीसारखाच मानवी वस्तीसाठी राहण्यायोग्य ग्रह ठरू शकतो. मात्र, हे तंत्रज्ञान अजून विकसित होणे आवश्यक आहे. प्रचंड प्रमाणात असणारा कार्बन डाय ऑक्साईड आणि अतिशय कमी तापमान आणि दाब या गोष्टी मंगळावरील मानवी वसाहतीसाठी आव्हान ठरतील. त्यांवर नवनव्या तंत्रज्ञानाच्या संशोधनातून मार्ग काढता येईल. दुसरे म्हणजे, मंगळावरील माती ही कार्बनच्या अतीव प्रमाणामुळे विषारी आणि पीक घेण्यास अयोग्य आहे. त्या मातीस कोळशाच्या मदतीने पीक घेण्यास योग्य बनविणे गरजेचे ठरेल. अर्थात मंगळावर मानव वस्ती हे अनेकांचे स्वप्न आहे. त्यादृष्टीने जोरदार प्रयत्न चालू आहेत. मोठमोठ्या कंपन्याही याकडे लक्ष देऊन आहेत. स्वप्न टप्प्यात असल्यास या कंपन्या यात मोठी गुंतवणूक करण्यास तयार आहेत. त्यामुळे कदाचित उद्या मंगळावर मानवी वस्ती शक्य होऊ शकेल, मात्र यासाठी बऱ्याच वर्षांचा कालावधी जावा लागणार आहे.

# अखंड हरिनाम सप्ताह; एक वेगळी अनुभूती

आधुनिक केसरी

कसे असते या सप्ताहाचे नियोजन काकड आरती, ज्ञानेश्वरी,



विश्वास सोहोनी
मो. 9850995652

पारायण,महिला भजन, प्रवचन, हरिपाठ, हरि कीर्तन नंतर महा प्रसाद व रात्री हरिजागर असे दैनदिन कार्यक्रम या सप्ताहात चालतात.
गणेश जयंतीच्या दिवशी गणेश याग,गणेश जन्मोत्सव व महाप्रसाद देऊन या सप्ताहाची सांगता होत असते..
व्यासपीठ चालक,हरिपाठ नेतृत्व,गायकवृंद, मृदुंग साथ,हार्मोनियम वादन,रात्रीचे हरिजागर या उपक्रमांना या सप्ताहात विशेष महत्त्व असते. या कार्यक्रमाचे नियोजन इतके काटेकोर असते की एकही कार्यक्रम चुकत नाही. मी काय अनुभवले या सप्ताहात!
नियोजन, बजेट संयोजन, सदस्यांना प्रोत्साहन देणे, लिडरशिप, व्यवस्थापन, टाईम मनेजमेंट, योग्य सहका-यांची निवड, टिम वर्क, शांतपणे निर्णय घेणे, विचार करुन कृती करणे सदस्यांना आत्मविश्वास देणे, सहकार्याची भावना, मित्रांनो, वरील बाराखडी शिकण्यासाठी आज लाखो रुपये बाहेर खर्च करावे लागतात परंतु अखंड हरिनाम सप्ताहात हे शिकण्यासाठी एक पैसा ही लागत नाही फक्त पाहिजे आवड! या सप्ताहाचे विशेष म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज प्रततिष्ठानचे टीम लिडर शिवाभाऊ चौगुले म्हणजे साधी रहाणी, विनम्र स्वभाव, अफाट लोकसंपर्क असणारे व सर्वांना सामावून घेणारे कुशल संघटक प्रतिष्ठानला लाभल्यामुळे अखंड हरिनाम सप्ताहाने एक वेगळी उंची गाठली आहे. सोशल मिडीयाच्या प्रभावी वापर हे या सप्ताहाचे महत्त्वाचे अंग आहे. त्यामुळे रोजचे फोटो व इतिवृत्त अतिशय मोजक्या शब्दांत भाविकांना मिळत असते. धन्यवाद शिवाभाऊ!
सर्वात महत्त्वाचे म्हणजे अखंड हरिनाम सप्ताहात वेळोवेळी उस्फुर्थ मदत करणारे अनेक मान्यवर दाते या सप्ताहात जोडले गेले आहेत हे या सप्ताहाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य मानता येईल...
मित्रांनो, रात्रं दिवस काम करणारे कार्यकर्ते या सप्ताहाची ताकद आहे. शिवाभाऊ चौगुले सह यशवंतभाऊ कन्हेरे, सुनील गाडे,बाबा देसाई, दत्तात्रय इंगळे, तुकाराम म्हेत्रे,जगन्नाथ भोसले, मुरलीधर जंगाले, दीपक गुंजाळ,महेश अमृतकर, प्रकाश कांबळे, गुंडू खन्नुकर, योगेश टोरपे, अशोक उमककर, मनीषाताई गटकळ, सुनंदाताई मुंढे, उमककर यांचे सहकार्य सतत मिळत असते. या सात दिवसात महात्मा फुलेनगर म्हणजे सर्व जण एकत्र कुटुंबातील सदस्य आहेत अशी भावना या मंडळींमधे निर्माण झालेली असते. लहान मुलांपासून ते जेष्ठ नागरिकांपर्यंत सर्व महिला व पुरुष या सप्ताहात सहभागी होत असतात व भक्ती रसाचा आनंद घेत असतात. पडद्यामागे राहूनही अनेक कार्यकर्ते सेवा देत असतात त्यात तुकाराम म्हेत्रे सारख्या कष्टाळू सेवेकरीची सेवा उल्लेखनीय असते. संगीत या सप्ताहाचा आत्मा आहे भरत महाराज चेडे अर्जुन महाराज दौंड व मृदुंगमणी आसाराम सांगळे यांच्या गायन वादनाने भक्तांचे कान तृप्त होतात.
तसेच महाराष्ट्रातील नामंकीत किर्तनकार या सप्ताहात आपली सेवा देत असतात या किर्तनात हरिभक्त चिंब रमून जातात ही बाब खूप वैशिष्ट्यपूर्ण आहे या किर्तनातून सामाजिक, धार्मिक,आध्यात्मिक संदेश भाविकांना मिळत असतो.

**बोलावा विठ्ठल पहावा विठ्ठल!**
**करावा विठ्ठल जीवभाव!**

याची प्रचिती या किर्तनातून भाविकांना सतत येत असते. सर्व किर्तनकारांचे अभिनंदन व आभार! सातही दिवस पंचक्रोशीभधील महिला भजनी मंडळ आपल्या भजन सेवेमुळे या सप्ताहाची शोभा वाढवत असतात. तसेच ज्ञानेश्वरी पारायणामुळे हा सप्ताहाचे आध्यात्मिक वातावरण तयार होते हे विशेष. सर्व भजनी मंडळांचेचे अभिनंदन. मित्रांनो, लोक सहभाग या सप्ताहाचा केन्द्र बिंदू आहे. बाबा देसाईचा सुंदर मांडव व श्रवणिय साऊंड सिस्टीम या सप्ताहात जिवंतपणा आणत असते. सुंदर आवाजाची व्यवस्था ही बाबाची खासियत आहे. तसेच सकाळच्या नाष्ट्यापासून दुपारचे जेवण रात्रीचा महाप्रसाद यासाठी अनेक मान्यवर आपले




योगदान देत असतात. तुम्हाला सांगतो, सप्ताहातील एक दिवस एक महाप्रसाद काही कारणाने अचानक रद्द झाला. काय करावे हे संयोजकांना समजेना! परंतु एका फोनवर एक भाविक तयार झाले व महाप्रसाद मार्गी लागला याला म्हणतात अखंड हरिनाम सप्ताहाचा महिमा. या सात दिवसात काहीच कमी पडत नाही भाविक मंडळी यथाशक्ती भरभरुन सहकार्य करीत असतात...
सप्ताहात तयार होणारा महाप्रसाद हा आमटी भात शीरा असतो या प्रसादाची चव अप्रतिम असते सर्व जण हा प्रसाद आवडीने सेवन करतात हे बघून खूप समाधान मिळते. हा प्रसाद सेवन केल्यावर भाविक तृप्त होत असतात. रोजची हरी भक्ती या प्रसादात उतरत असते त्यामुळे हा प्रसाद चविष्ठ असतो. म्हणून अखंड हरिनाम सप्ताहात अन्नदान हे सर्वश्रेष्ठ मानले आहे. या निमित्ताने महा प्रसाद तयार करणाऱ्या आचाऱ्यांचे मनापासून अभिनंदन! सामाजिक,उद्योजक,दुकानदार,नोकरदार, सर्वसामान्य नागरिक या क्षेत्रातील मान्यवर जमेल तसा सहभाग या सप्ताहात देत असतात जिजामाता पार्क व शिवाजी पार्क या कालनीमधील भाविकांचा सहभाग सुद्धा उल्लेखनीय असतो...
म्हणून लोकांनी लोकांसाठी आयोजित केलेला हा कार्यक्रम म्हणजे महात्मा फुलेनगरमधील अखंड हरिनाम सप्ताह
मित्रांनो, अखंड हरिनाम सप्ताह दरम्यान संत गाडगेबाबा जागृती मंच,ओम शांती गंगा जेष्ठ नागरिक संघ व जनवाणी संस्थेच्या सहकार्याने शुन्य कचरा मोहिम राबवली जाते.
व्सासपीठ व सप्ताह मंदिर परिसर या काळात स्वच्छ व सुंदर ठेवला जातो. महत्त्वाचे म्हणजे अन्नाचे महत्त्व व अन्न वाया घालू नका हा संदेश किर्तनातून सतत दिला जातो
कन्हेरेभाऊ तर स्वच्छता व ताट सफाईची पूर्ण जबाबदारी घेऊन सात दिवस आपली सेवा देत असतात. या ताटसफाई अभियानामुळे उष्टे अन्न टाकण्याची लोकांची सवय १००% कमी झाली आहे हे मी माझ्या निरीक्षणातून सांगू शकतो.. धन्यवाद कन्हेरे भाऊ!
संगीत, किर्तन व भजन या त्रिसुत्री मुळे हा अखंड हरिनाम सप्ताह चिंचवडच्या पंचक्रोशीमधे प्रसिद्ध आहे.
समाजात सामाजिक सलोखा वाढावा,लोकांचे प्रबोधन व्हावे,चांगल्या कार्यक्रमांना चालना मिळावी वारकरी संप्रदायाचा प्रसार व्हावा या उद्देशाने लोक सहभागातून हा सप्ताह आयोजित केला जातो. विशेष म्हणजे सप्ताहादरम्यान नेत्र तपासणी व उपचार शिबिर आयोजित केले जाते यांचा लाभ अनेक गरजू घेत असतात या शिबिरातून ३५ मोती बिंदू शस्त्रक्रिया माफक दरात आयोजित केल्या आहेत.
धन्यवाद डाक्टर चाकणे सर! काय मिळते भाविकांना या सप्ताहातून आनंद, आत्मविश्वास, आत्म शांती, बंन्धुभाव, समाजसेवेची गोडी, जिवाभावाचे मित्र, कष्ट करण्यासाठी उर्मी, स्वप्न बघायला शिकवणे, जीवन जगण्याचा मार्ग, लोकांना जसे आहे तसे स्विकारण्याची कला. घेण्यापेक्षा देण्यावर जास्त भर. त्यागाची भावना. आत्मिक सुख व निरपेक्ष भावना
असा हा सर्वांग सुंदर अखंड हारिनाम सप्ताह भविष्यकाळात असाच अखंडपणे चालत रहावा हीच गणरायाकडे प्रार्थना

**खरा तोच एकची धर्म! जगाला प्रेम अर्पावे!**

अशा या जगाला प्रेम देणाऱ्या या अप्रतिम अखंड हरिनाम सप्ताहास मनोमन शुभेच्छा!



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

# विसावा...

आधुनिक केसरी

**कधीतरी केंव्हातरी मैत्रीच्या प्रेमाने भारावलेली अन् मैत्रीची साक्ष देणारी निर्माल्यतली ती पाकळी अजून तिथेच असेल का? नवे रूप घेऊन बहरलेल्या त्या झाडांच्या कळीच्या रूपात हिरव्यागार पानांच्या आड्डून डोकावताना दिसेल का? किंवा मग फुलाच्या त्या पाकळ्या पाकळ्या तून पुन्हा नव्याने भेटण्यासाठी आसुसलेली असेल का? माहित नसते कोण कोणासाठी, चुकून पडतात ऋणानुबंधाच्या गाठी. कित्येक दिवसांनी नव्हे नव्हे कित्येक वर्षांनी काल सहज फोनची रिंग वाजली.**

आणि ..जीवनाच्या वाटेवर कित्येक गोष्टी मागे टाकून आपण किती पुढे निघून गेलेलो असतो,हे आपले आपल्यालाही कळत नाही. काल त्याची प्रकर्षाने जाणीव झाली.

नव्वदच्या दशकाचा तो काळ,सावित्रीबाई फुले महिला कॉलेजला होते. NH4 हा आमचा येण्याजाण्याचा मार्ग, आणि त्या रस्त्याला अजूनही गावे आणि त्या गावातून ही येणाऱ्या आमच्या मैत्रिणी, त्यातलीच ही एक....!
आज कित्येक दिवसानी त्या गुलमोहराची आठवण आली नि.. उगाचच डोळ्याच्या कडा ओल्या करुन गेली. गुलमोहराची ती लाल पिवळी फुले आणि झाडाखाली पडलेला त्याचा सडा, जी त्या विसाव्याची साक्ष होती.

मध्यम बांधा, सडपातळ, गहूवर्णीय अगदी लाघवी सहज कोणालाही आपलसं करणारी ती . मार्च एप्रिल ची ती रणरणती दुपार S.Y.B.A.चा वर्षातल्या त्या शेवटी शेवटी परीक्षा जवळ आल्या होत्या बहुदा , "नाही नाही आज तुम्ही, सगळ्यानी माझ्या घरी यायचे आहे ."परीक्षा झाल्यानंतर उन्हाळी सुट्टीनंतर काय माहित केव्हा भेट होणार आणि आपण केव्हा भेटणार. "त्यामुळे अगदी सगळ्यानी माझ्याबरोबर बसमधून उतरायचे म्हणजे उतरायचेच."

म्हणजे तसे दडपण ही होते. कारण तेव्हाची परीस्थिती तशी सोपी नव्हती, कारण वडीलधाऱ्यांचा धाक असायचा .पण तरीही धाडस करुन आम्ही तिच्या घरी गेलो. अगदी साधं दगडमातीच कौलारु दोनपाकी घर, तीन चौकटी आणि बाहेरच्या बाजूला पडवी.त्या पडवीत बसूनच आम्ही सगळ्यानी जेवन केल. भाजी नी भाकरी. थोडा वेळ गप्पा मारल्या .तिच्या आईची नातेवाईकांची भेट घेतली, आणि घरी जाण्यासाठी साहजिकच बसची वाट पाहण्यासाठी आम्ही स्टॉपवर आलो. सूर्य नारायणाची ही घरी जाण्याची तयारी सुरू झाली होती.बोलता बोलता स्टॉप वरील त्या गुलमोहराच्या झाडाखाली बस ची वाट बघत आम्ही सगळ्याजणी येऊन बसलो. तशी तर ती गुलमोहराची झाडे म्हणजे बसमधून येता जातानाचे दररोजचे सोबती होती. अगदी बहरलेली नसतानाही त्याची पाने न् ती झाडे, प्रवासाचा जीवनाचा एक भाग बनली होती. म्हणजे प्रत्येकाच्या असे काही नाही. पण मला ती माझ्या जवळची वाटायची.काहीतरी नातं असल्यासारखी . माहीत नाही का? पण थोडा वेळ थांबाव, त्या फुलांवरुन हात फिरवावा



क्षणभर तिथे विश्रांती घ्यावी. असे नेहमी वाटायचे.

आणि त्यादिवशी ती इच्छा पूर्ण झाली. त्या दिवशी त्या सायंकाळाच्या उगवतीच्या दिशेला विसावलेल्या त्या सावल्या, ती उन्हे आजही अस्पष्ट अशी डोळ्यापुढे येतात. आणि एकावर एक हात ठेवून पुन्हा भेटूच ची साक्ष देणाऱ्या त्या दूरवर पसलेल्या सावल्या म्हणजे उन सावल्या मला खूप आवडतात म्हणून असेल कदाचित, आणि हाताचे ते पालव हरवलेल्या स्मृतीच्या धुक्यात कधी धूसर होत गेल्या,आणि एका क्षणाला गायब होऊन काय माहित कुठे विसवल्या. पण एक एक क्षण मागे टाकत,वेळ निघून जाते. मनपटलावरच्या काही खुणा धूसर होत जातात.आणि मग केव्हातरी....

माहीत नाही असे का होते.जी झाडे आयुष्याचा भाग होती .त्या झाडांविषयीचा एक लेख काही दिवसांपूर्वी 'गुलमोहर डे' च्या निमित्ताने वाचनात आला .तेच शब्द ,तीच ओढ अगदी आपणच लिहतोय असं वाटल. नि मग तेच दिवस पुन्हा एकदा अनुभवायला मिळाले. जास्त नाही अगदी एक दोन वर्षाचीच आमची नी त्या झाडांची मैत्री.गुलमोहरच्या झाडाखाली घेतलेला तो विसावा, एकावर एक हात ठेवून पुन्हा भेटू च असे म्हणून आठ दिशेला वळलेली आम्हा मैत्रिणींची पावले काळाच्या ओघात,निसर्गाच्या उलाढालीत केव्हा धूसर झाली कळलेच नाही. म्हणजे (रस्त्याच्या चौपदीकरणात ती झाडे तोडली गेली असावीत.) ऋणानुबंधाच्या गाठींची साक्ष देणारी ती झाडे कधीतरी रस्त्यावरून प्रवास करत असताना अवचित.... विसावलेल्या वळणवरची ती त्या उन्हाच्या काहिली तून ही टवटवीत वाटणारी ती तांबडी पिवळी फुले त्या विसावलेल्या सावल्या एका क्षणाला थांबून त्या काळया डांबरा खाली आहेत असे वाटते! आणि मग पावले आपोआप तिकडे वळतात, नि काही क्षणासाठी का होईना, पण थोड्या वेळासाठी तिथे विसावतात. माहित नाही कोण कोठे? कोण कोठे? आहे कधीतरी काळ वेळ नियती निसर्ग आणि या साऱ्या निसर्गाच्या कालचक्रात अडकलेले आपण ... आजही कधीतरी असे वाटते की मैत्रीची साक्ष देणारी निर्माल्यातली ती पाकळी
अजून तिथेच असेल का?
पुन्हा नव्याने भेटण्यासाठी आसुसलेली असेल का? आणि मग...
काही नाती, काही खुणा ही धूसर होत जातात.आणि मग काळाच्या पडद्याआड विसावतात. अवचित आठवणीच्या रुपात येऊन मन ओलेचिंब करून जातात.

# जीवन हे कधीच व्यर्थ नसतं, आपली जगण्याची पद्धत व्यर्थ असते

आधुनिक केसरी

निसर्गाने निर्माण केलेली पृथ्वीवरील कोणतीही गोष्ट व्यर्थ



गणेश खाडे
संपर्क 9011634301

नाही. आपण वापर अयोग्य करतो आणि दोष देऊन मोकळे होतो. मर्यादित वापर हाच सुयोग्य परिणामांचा मुख्यआधार स्तंभ असतो. वापराची मर्यादा उलटता कामा नये. पण आपण हि मर्यादा जाणीवपूर्वक ओलंडतो आणि मग शेवटी बोलतो . जीवन व्यर्थ आहे हे व्यवहारीक नाही. जगात कोणतीही गोष्ट बाब व्यर्थ नाही हे त्रिकाल सत्य असुन आपण वापर कसा कारतोय त्यानुसार त्या बाबीची व्यवहार्यता ठरत असते . प्रमाण आणि मात्र समजली तर व्यर्थ कही ठरत नाही .पण प्रमाण आणि मात्र चुकली कि मग मात्र सगळी गडबड झाली म्हणून समजा . जीवनात कधीचं चुकुन सुद्धा प्रमाण आणि मात्रा चुकु देऊ नका मग पाहा आपलं जीवन हे आपल्याला कधीच व्यर्थ वाटणार नाही फक्त जगण्याची पद्धत चुकली तर मग मात्र जीवनच गणित बिघडल्याशिवाय राहणार नाही. गणित बिघडल कि हिशोब चुकतो. हिशोब चुकला कि मुल्यमापन व दोषारोपण चालू होतं. आपल्या चुकीचे खापर कोणावर तरी फोडून मनात थोडी उसंत घेऊन बरं वाटतं पण हे बरं खरच खरं असतं का असं जर मला कोणी विचारलं तर मी चक्क हे खोटं आहे असंच सांगेल. जीवनाला अगोदर समजुन घ्या. योग्य मार्ग निवडा सकारात्मक मार्गक्रमण करा सत्याची कास धार,मोह माया, स्वार्थ याला फार थारा देऊ नका आध्यत्मिक सात्विक वृत्ती जोपासा, निर्व्यसनी व्हा मग पाहा जीवन कधीचं व्यर्थ वाटणार नाही. जीवनाचा मार्ग आपण चुकतो व दोष दुसर्याला देतो . मार्ग चुकण हा आपला दोष आहे हे सत्य नाकरण म्हणजे सुर्याच अस्तित्व नाकारल्या सारखं आहे. आपला दोष आपण तो मान्य करणं गरजेचं असतं पण दोष मान्य करणं हा मानवी स्वभाव नसल्याने तो मान्य करत नाही. त्यामुळे आपल्या सुधारणांचे मार्ग बंद पडतात व आपण सुधारण्या ऐवजी अधिकच बिघडतो.एखादी बाब चुकली मान्य केली समजली दुरूस्त केली तर आपण योग्य ठिकाणी पोहचतो.पण आपण खरंच असं करतो का तर नाही करत.

आपण सत्य स्वीकारण्या ऐवजी दोष देण्यावर जास्त भर देतो. सार्थकता आणि व्यर्थता हे शब्द परस्पर विरोधी असले तरी याचे परिणाम पण तसेच परस्पर विरोधी आहेत.जर आपलं कार्य सार्थकी असेल किंवा आपल्या जीवनात सार्थकता असेलतर मग निरर्थक असं काहीच नसतं . जीवन जगण्याची पद्धत जीवनातील परिणाम निश्चित करत असते . जशी पद्धत तसे परिणाम निश्चित होत असतात . म्हणून जीवन जाण्याची पद्धत जर आपली योग्य असेल तर आपल्याला सुयोग्य परिणाम मिळतील.आणि जर पद्धत चुकली किंवा चुकीची असली तर मग मात्र परिणाम हे अयोग्य प्राप्त होतील. जीवना विषयी असणारा प्रत्येकाचा दृष्टीकोन हा एक सारखा असु शकत नाही . .जीवन जगण्याची पद्धत व्यर्थ असते . चुकीच्या पद्धती मुळे आपल्याला जीवन निरर्थक वाटू शकतं. हे स्वाभाविक आहे. पण मुळात जीवन हे कधीच व्यर्थ निरर्थक नसतं. आपला जीवना विषयीचा समज हा कसा आणि काय हा आपल्या जगण्याच्या पद्धतीवर अंवलबुन आहे.

आपल्या सवयी आपल्या आवडी निवडी ह्या जपत असताना आपण कोणत्या बाबींचा प्रभाव आपल्या आयुष्यात करून घेतो त्यानुसार मग त्याची फेड परतफेड करताना नाकी दम येतो मुळात कोणती बाब कशासाठी करायची आहे त्याचे दिर्घ कालिन परिणाम काय हे समजलं तर मग बहुतांश चुका टळतात आणि आपण योग्य दिशेने मार्गक्रमण करतो आणि आपण जेव्हा योग्य मार्गावर असु तेव्हा आपल्याला जीवन पण योग्य वाटणार हे मात्र निश्चित.

# ...बाकी सगळं आलबेल आहे !

## || मंथनाचे पैलू ||





डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414

लेखांक : २

भारतीय माणसाला सोहळे प्रिय आहेत... तो नेहमीच महापुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी (स्मृतीदिन) त्याच बरोबर नवस, कंदुरी, भंडारे, वाढदिवस आणि वर्षभरात येणारे सगळेच पारंपरिक सण साजरे करतो.. तेही अगदी आनंदाने....! परंतु ह्या सगळ्याच सोहळ्यांचं तो स्वतःला कधीच आऊटपुट मागत नाही...!

अलिकडे सोहळ्यांना चांगले दिवस आले आहेत. आम्हां सगळ्यांना सोहळे प्रिय वाटू लागले आहेत. आम्ही सोहळ्यांना अतिरिक्त महत्व देऊ लागलो आहोत....परंतु सोहळा का करायचा ? कशासाठी करायचा ? की,केवळ भूतकालीन इतिहासाचा जागर करायचा..! की, नुसत्या भूतकालीन स्मृती जागृत ठेवायच्या..? की, भूतकालीन घटनांना नुसता उजाळा द्यायचा..? की, या कार्यक्रमातून, सोहळ्यातून काही आदर्श घ्यायचा, ? की काही प्रेरणा घ्यायची ? की, यातून काटेकोरपणे काही आचरण करायला शिकायचे.? याबाबत आमच्याकडे काहीच उद्देश नसतो. म्हणजे "वाळूत मुतलं फेस ना पाणी" सारं निर्रथक.

मला वाटतं या सर्व घटना, कार्यक्रम, उपक्रम, शाळेतील प्रतिज्ञा, प्रार्थना किंवा समाजात चाललेले कीर्तन, प्रवचन, सप्ताह किंवा शासनाद्वारे निघणारे उपक्रमाचे आदेश.. हे नुसते सोहळे होऊ लागले आहेत ते केवळ सोहळे न होता त्यांचे काटेकोरपणे पालन आणि आचरण व्हावे..!

शालेय विद्यार्थ्यांकडून गेल्या सत्तर वर्षापासून दररोज राष्ट्रगीत, प्रार्थना व प्रतिज्ञा म्हणवून घेतली जाते....लहानपणी शाळेत दररोज आमच्याकडूनही राष्ट्रगीताचा दर्जा असलेलं एक प्रसिद्ध गीत वदवून घेत असत...'सारे जहाँसे अच्छा हिंदोस्ता हमारा " कवी पुढे लिहितो "मजहब नहीं सिखाता आपस में बैर रखना" लाहोरचे कवी मुहम्मद इकबाल यांनी हे गीत १९०५ साली लिहिलं होतं. तत्कालीन इंग्रज राज्यकर्त्यांना भारतातील अनेक जातीजातीत, धर्माधर्मात सलोखा,भाईचारा आहे, हे दाखवण्यासाठी हे गीत लिहिलं होतं...एक मुस्लीम शायर म्हणतो," मजहब नहीं सिखाता आपस में बैर रखना" आणि आम्ही सत्तेसाठी हिंदुमुस्लीम दंगली घडवून आणतो... जातीजातीत भांडणे लावतो.... निवडून येण्यासाठी भावाभावात भांडणे लावतो आणि आमची पोरं पोरी दररोज प्रतिज्ञेत म्हणतात, " सारे भारतीय माझे बांधव आहेत. किती कमालीचा विरोधाभास आहे हा. म्हणजे प्रतिज्ञा केवळ तोंडपाठ करण्यापूरतीच असते का ? की तिचे आचरणही करायला पाहिजे. प्रियजनहो तुम्हीच ठरवा... आम्ही एकमेकांना भाऊ का समजत नाहीत..? आम्ही जातीचा धर्माचा, प्रतिष्ठेचा अहंकार घेऊन का भांडत राहतो..? अलिकडे तर जातीयवाद बोकाळला आहे तो स्पृश्य - अस्पृश्य असा नसून रुपांतरीत झाल्याचे दिसून येत आहे...महाराष्ट्रातील अनेक संतांनी जातीभेदांवर, अंधश्रद्धेवर लोकांच्या खोटारडेपणावर, अभंग व भारुडे रचली आहेत.. ती आम्हाला तोंडपाठसुद्धा आहेत; परंतु आम्ही त्यातील तत्वज्ञान आचरणात आणत नाही. इथे प्रत्येक समाज आपापल्या धर्माचे सोहळे करत आहे; मात्र ते फक्त सोहळेच होताहेत...आचरण मात्र शून्य आहे... दरवर्षी 'मराठी भाषा दिन' व 'मराठी भाषा पंधरवाडा' साजरा केला जातो; कार्यक्रमाला दहाबारा लोक उपस्थित असतात. माझ्यासारख्या मानधन न घेणाऱ्या गावातल्याच प्रमुख वक्त्याला बोलावून एक हार आणि त्याचं पंधरा मिनिटाचं भाषण असतं.. मी सांगत असतो, "लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी खरेच धन्य जाहलो ऐकतो मराठी पुढे मी सांगत असतो," मराठी लँग्वेज ही आपली मदरटंग आहे. मराठी लँग्वेजवर अनेक लँग्वेजने आपल्या मराठी लँग्वेजवर आक्रमण केलेलं आहे, आपल्याला ते हाणून पाडावे लागेल..! (टाळ्या ) माझ्या पंधरा मिनिटाच्या भाषणात हिंदी, इंग्रजीचे पाचपन्नास शब्द आलेले असतात यावर कुणीच काही बोलत नाही; कारण मी असतो गावातलाच विनामानधन



वक्ता...म्हणून तेही काही बोलत नाहीत...शेवटी चहापाण्यावर कार्यक्रमाची सांगता होते....बस्स. झाला मराठी भाषा दिन साजरा... अर्थात ही सुद्धा एक प्रासंगिक औपचारिकताच असते.. परंतु मराठी भाषेविषयी चिंतनशील चिकित्सक अशी चर्चा होत नाही...चर्चा होते ती शहरांची नावे बदलण्यावर....तो असतो सत्ताकारणाचा भाग, सत्ता टिकवून ठेवण्याचा प्रयत्न... चर्चेत राहण्याचा..मुद्दा..!

देशातले राज्यकर्तेसुद्धा श्रेय घेण्यासाठी अनेक कार्यक्रमाची उद्घाटने करतात; काम मात्र करत नाहीत...एक सत्य उदाहरण असे की, आम्ही गेल्या एप्रिलमध्ये एका आमदारांना वाचनालयाच्या उद्घाटनासाठी बोलावले त्यांनी तिथेच त्याप्रसंगी वाचनालयाला सहालाख रुपये देतो म्हणून जाहीर केले.. आज वर्ष होत आहे...अजून कृती नाही... दुसऱ्या एका प्रसिद्ध व्यक्तीने पंचवीस वर्षापूर्वी अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यासाठी अकरा हजार रुपये देतो म्हणून भरसभेत जाहीर केले होते. तो बिचारा कोरोनामधी मरण पावला; परंतु त्याचे आश्वासन आम्ही विसरलो नाही... आम्हाला मिळालेलं स्वातंत्र्य सुद्धा असंच आहे ह्यांच्या आश्वासनासारखं.....प्रत्येकाच्या खात्यात पंधरा लाख येऊन पडल्यासारखं...!

पंधरा ऑगस्ट व सव्वीस जानेवारीला आम्हाला फक्त सगळीकडे स्वातंत्र्यदिनाचे भरगच्च कार्यक्रम दिसतात, ज्याची महिन्याभरापासून ,वाजवण्याची पीटीची, कवायतीची रंगीत तालीम सुरु असते... अनेक राज्यकर्तेही लिहून दिलेल्या आपापल्या सकारात्मक भाषणाचा सराव करत असतात .....आणि स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी ऐकू येतात सगळीकडे स्वातंत्र्याचे गाणे, शहीदांची करुणरसातली कवने, भाषणांची रेलचेल, सगळीकडे तिरंगा फडफडतांना...! जल्लोष होताना..! जयजयकार होताना...! सर्वांत मोठी लोकशाही असलेल्या धर्मनिरपेक्षतावादी आमच्या देशात लोकशाही स्वातंत्र्याचा जयघोष करतो आहोत, सोहळे करतो आहोत..मात्र लोकशाही अजून भारतातील दुर्बलांच्या, कष्टकऱ्यांच्या गोरगरिबांच्या झोपडीत शिरलेली नाही, की..शिरू दिली नाही.. यावर आपण खुशाल चिंतन करू शकता..! लोकशाहीच्या समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय ह्या मूल्यांचा फक्त भास होतोय..! जाहिरातींचे बळी ठरलेल्या भारतीय माणसाला फक्त राज्यकर्त्यांच्या विरोधात बोलण्याचं स्वातंत्र्य नाही...बाकी सगळं अलबेल आहे.

**लेखक- सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक चळवळीचे अभ्यासक आहेत.**

# प्रजासत्ताक नैतिक मूल्यांचा प्रसार व्हायला हवा...!



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**26 जानेवारी 1950 पासून आपल्या देशाने प्रजासत्ताक शासन पद्धतीचा स्वीकार केला आहे. भारतीय संविधानाने एकंदरीत सर्व नागरिकांना मूलभूत हक्क प्रदान केले आहेत. भारतीय संविधान म्हणजे जगातील समग्र मानव कल्याणकारी मूल्यांचा अर्क आहे. आजही आम्ही सविधाना कडे केवळ फक्त कायद्याचाच ग्रंथ आहे अशा मर्यादित अर्थाने पाहतो. खरेतर संविधान हा आपला उदात्त असा सामाजिक व सांस्कृतिक दस्तावेज आहे.**

मानवाला मानवी कल्याण साधायचे असेल तर प्रत्येकाने आपल्या जीवनामध्ये संविधानिक नैतिक मूल्यांची जोपासना करणे ही काळाची गरज आहे. मानवी जीवनामध्ये काही प्रजासत्ताक नैतिक मूल्यांची जोपासना करून जीवन जगले पाहिजे आणि इतरांनाही जगू दिले पाहिजे. मूल्य दोन प्रकारचे असतात एक चिरंतन मुल्य व दुसरे तात्कालिक मूल्य.तात्कालिक मूल्यामध्ये ईश्वरनिष्ठा, स्वामीनिष्ठा, आरत्या, धर्म, अंधश्रद्धा,जातीयता अशा प्रकारची मूल्य येतात. आपण भारतीय संविधानाचा स्वीकार केलेला आहे.त्यामुळे आपल्याकडे लोकशाही मूल्ये अस्तित्वात आहेत. लोकशाही मूल्यामध्ये राष्ट्रनिष्ठा, बुद्धिप्रामाण्यवाद, विवेकनिष्ठा,स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही मूल्य येतात. लोकशाहीतील मूल्य ही चिरंतन मूल्ये आहेत.पण जे तात्कालिक मूल्य आहेत, जे टिकणारे नाहीत, ज्यामुळे मानवी कल्याण साधता येणार नाही अशा मूल्यांची पेरणी करण्याचा आणि आचरणात आणण्याचा प्रयत्न आजचा माणूस करताना दिसतो आहे.
हल्ली सरकारी कार्यक्रमामधूनही तात्कालीक मूल्य पेरण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ यामधूनही याच मूल्याची पेरणी केली जात आहे. ते संविधानाला अपेक्षित नाही. भरतीय संविधान एक संस्कार ग्रंथ आहे. त्यातील मूल्याची जपणूक प्रत्येकाने केली पाहिजे.त्याप्रमाणे वागले पाहिजे. त्याप्रमाणे शासन व्यवस्था चालली पाहिजे तरच खऱ्या अर्थाने समाजामध्ये अमुलाग्र बदल झाल्याशिवाय राहणार नाही. भारतातील प्रजासत्ताक मूल्यांमध्ये स्वातंत्र्य हे मुल्य फार महत्त्वाचे आहे. हे मुल्य समाज जीवनातील आणि मानवी जीवनातील अत्यंत मूलभूत आणि चिरंतन असे मानवी मूल्य आहे. पण या मूल्याचा काहीजण अधिकाधिक वापर करून बलशाली होण्याचा प्रयत्न करून इतरांना दुबळे करण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत.' प्रत्येक व्यक्तीला स्वतःचा संपूर्ण विकास करून घेण्याची समान संधी म्हणजे स्वातंत्र्य होय'.असे असतानाही सामाजिक स्वातंत्र्य,धार्मिक स्वातंत्र्य,राजकीय स्वातंत्र्य व आर्थिक स्वातंत्र्य यामध्ये काहींचे वर्चस्व आहे. गरीब गरीब होत चालला आहे. श्रीमंत श्रीमंत होत चालला आहे. त्यामुळे स्वातंत्र्याचा अर्थ मर्यादितच राहिला आहे तो सर्वसामान्यांपर्यंत पोहोचला नाही, पोहोचविला नाही आणि पोहोचूही दिला जात नाही. त्यामुळे शासनस्तरावरून त्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. आपल्या देशात वर्णव्यवस्था ,जातीव्यवस्था आणि अस्पृश्यतेच्या माध्यमातून असंख्य लोकांचे आजही सामाजिक स्वातंत्र्य हिरावून घेतलेले दिसते. त्यामुळे भारत देशाचे खूप पुढे नुकसान झाले आहे. आजही या गोष्टी समाजव्यवस्थेमध्ये दिसून येतात. त्या हद्दपार करणे काळाची गरज आहे. माणसांनी निर्माण केलेल्या देवावर,धर्मग्रंथावर सर्वच माणसाला नैसर्गिक अधिकार असायला हवा. परंतु आपल्या देशामध्ये स्त्रियांना व शूद्रांना धर्मस्वातंत्र्य नाकारले होते. ज्ञान घेणे प्रत्येक माणसाचा नैसर्गिक हक्क जरी असला तरी स्त्रियांना -शूद्रांना वेद वाचण्याचे, ऐकण्याचे,बोलण्याचे स्वातंत्र्य नाकारले होते. धार्मिक स्वातंत्र्यावर बंधने लादल्यामुळे देशांत असंख्य माणसाना स्वतःचा विकास करून घेता आला नाही परूंतु भारतीय संविधानाने प्रत्येक व्यक्तीला ज्ञान मिळवण्याचे, धर्माची उपासना करण्याचे, धर्माचे ज्ञान मिळवण्याचे स्वातंत्र्य दिले आहे.
हुकूमशाही व राज्यशाही शासनव्यवस्थेत राज्यातील सर्वच व्यक्तींना राजकीय स्वातंत्र्य मिळत नाही. लोकशाही राज्यव्यवस्था मात्र प्रत्येक व्यक्तीला राजकीय स्वातंत्र्य देते.राजकीय स्वतंत्र्यामध्ये राज्यकर्ता निवडण्याचा अधिकार व्यक्तीला असतो. राज्य कारभारातही सहभागी होता येते. भारतीय संविधानामुळे विशिष्ट वर्ग,जात या वर्गातील व्यक्तीला दूर ठेवता येत नाही. मानवाला विकास करण्यासाठी आर्थिक स्वातंत्र्यही महत्त्वपूर्ण असते प्रत्येक नागरिकाला स्वतःच्या चरितार्थासाठी ,आर्थिक विकासासाठी स्वतःच्या कुवतीनुसार,निवडीनुसार उद्योग करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे पण पूर्वी जातिव्यवस्थेने हे स्वातंत्र्य नाकारले होते परंतु भारतीय संविधानाने मात्र ते स्वातंत्र्य प्रत्येक व्यक्तीला दिले आहे. त्याचा योग्य वापर करणे महत्त्वाचे आहे. समता हे श्रेष्ठ मानवी मूल्य म्हणून सर्वांनी स्वीकारले असले तरी आजही समता प्रस्थापित झालेली दिसत नाही. आजही अनेकांच्या मनामध्ये धर्म,जात,भाषा याची अडी दिसून यायला लागते. त्यामुळे आपल्या मनातील जातीय,धार्मिक,भाषिक अशा विविध स्वरूपाचा असलेला भेदभाव काढून टाकून प्रत्येकाने चांगले जगले पाहिजे, जगू दिले पाहिजे तरच प्रगती दिसून येईल. एका आईच्या पोटी जन्माला आलेली मुले एकमेकाशी अत्यंत प्रेमाने वागतात.अगदी त्याचप्रमाणे देशांमधील विविध जाती-धर्मांच्या माणसांनी एकत्र वागणे,राहणे, जगणे फार महत्वाचे आहे. परंतु तिरंगा झेंडा पाहिला की मातृभूमी बद्दलचा अभिमान आमच्यात भरून येतो. जागा होतो. हा दिवस सोडला तर आम्ही एकमेकांचे बांधव आहोत हे विसरून जातो धार्मिक,जातीय,भाषिक,प्रांतीय अस्मिता जागृत करतो हे वाईट आहे. त्यासाठी भारतीय राज्यघटनेतील समतावादी मुल्ये लोकमनावर खोलवर रुजविणे महत्त्वाचे आहे. भारतीय संविधानातील बंधुत्व हे मूल्य सांस्कृतिक उपक्रम व प्रसारमाध्यमाद्वारे जनमानसात रुजविणे फार महत्त्वाचे आहे. त्यासाठी शाळा,महाविद्यालयातून,अभ्यासक्रमातूनही भारतीय संविधानाचा परिचय करून देणेही महत्त्वाचे आहे.
न्याय हे मानवी जीवनातील अत्यंत महत्त्वाचे मूल्य आहे . अन्याय करणाऱ्या ज्या ज्या गोष्टी आहेत त्या त्या न्याय वाटत होत्या. उदाहरणार्थ बालविवाह,सती, विधवा पुनर्विवाह प्रथा. भारतीय संविधानाने मात्र त्यांना मूठमाती दिली. न्याय या मूल्यांना अनुसरून प्रत्येकाने वागलेच पाहिजे अशी भूमिका घेतलेली आहे. म्हणून न्याय प्रस्थापित करण्यासाठी प्रत्येकाने न्यायाने वागले पाहिजे. खरेतर प्रत्येक भारतीयांनी भारतीय संविधानाच्या चौकटीत वागण्याचा प्रयत्न केला, प्रजासत्ताक मूल्यांची पेरणी करण्याचा प्रयत्न केला तर देशाचा कायापालट झाल्याशिवाय राहणार नाही यात तिळमात्रही शंका नाही. आज संविधानाची अंमलबजावणी काटेकोरपणे केली जात नाही. संविधानाची शपथ ज्या लोकप्रतिनिधींनी घेतली आहे तेच लोकप्रतिनिधी संविधान विरोधी वागताना दिसत आहेत. संविधानाच्या कलमानुसार सर्वसामान्यांना न्यायही मिळताना दिसत नाही. हे असहिष्णू वातावरण सर्व देशभर पसरले आहे नव्हे पसरवत आहेत. संविधानाची काटेकोर अंमलबजावणी शासनाकडून होत नसल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण होताना दिसत आहेत. म्हणून प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने भारतीय संविधान,त्यातील नैतिक मूल्य प्रत्येकाने समजून घ्यायलाच हवीत.त्यांची अंमलबजावणी करायला हवी तरच देश प्रगतीपथावर जाईल.



# गौतम बुद्धांची एक कथा

आधुनिक केसरी

बुद्ध हे मनोविजयी होते हे सर्वज्ञात आहे. ते नेहमी शांत, सस्मित, आणि प्रसन्न असत. त्यांच्या सहवासात येणारया लोकांनाही या प्रसन्नतेचा लाभ होत असे. पण काही लोक असेही होते की त्यांना गौतमांना मिळणारा सन्मान सहन होत नसे. त्यांचा अगदी जळफळाट होत असे. असाच एक माणूस एकदा गौतमांना रागवावयास भाग पाडायचेच, त्यांचा अपमान करायचाच, फजिती करायचीच असे ठरवून त्यांच्या प्रवचनाच्या ठिकाणी आला. प्रचंड जनसमुदाय जमला होता. तथागत शांतपणे त्या समुदायाला मार्गदर्शन करत होते. तेंव्हा हा माणूस तेथे पोचला आणि सर्वांसमोर त्याने गौतमांना न भूतो न भविष्यति अश्या शिव्या दिल्या. जमलेले लोक अस्वस्थ झाले, संतापलेही. पण तथागत शान्त होते. त्यांच्या चेहरयावरील स्मित जरासुद्धा ढळले नव्हते. तो माणूस बराच वेळ अद्वातद्वा शिव्याशाप देत होता. बरयाच वेळाने तो थकून थांबला व डोळे तारवटून गौतमांकडे पहात राहिला. तथागतांनी स्मितहास्य केले व शान्त स्वरात ते बोलले, “मी तुला एक प्रश्न विचारू काय?” “विचारा” तो गुरगुरला. “जर तुला कोणी एखादी वस्तू भेट दिली आणि ती भेट स्वीकारण्यास तू नकार दिलास तर त्या भेटीवर मालकी कुणाची?” “मालकी?” “हां, ती भेटवस्तू कोणाकडे राहील?” “इतकही कळत नाही? सोपं आहे, ती वस्तू त्या देणारयाकडे राहील” तो माणूस म्हणाला. “अगदी बरोबर!” तथागत स्मित करीत म्हणाले, “मग जर मी तुझे हे शिव्याशाप स्वीकारण्यास नकार दिला तर ते कोणाकडे रहातील?” तो माणूस सुन्न झाला आणि तथागतांच्या चरणी लागला.

**तात्पर्य : जगात कोण आपल्याला काय बोलेल यावर आपण नियंत्रण ठेवू शकत नाही. पण त्यांच्या स्तुतिशापांचा स्वीकार करणे न करणे हे पुर्णपणे आपल्याच हाती असते. आपण स्वताचा अपमान करून घ्यायचा म्हटला तर तो घोर अपमान होऊ शकतो अन्यथा ते असतात केवळ शब्दांचे बुडबुडे!**

# लेझीम स्पर्धेत दिसले प्रजासत्ताक दिनाचे रंग

## १६ संघांच्या स्पर्धेत जिजामाता विद्यालयाचा संघ प्रथम

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** क्रीडा भारती व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समितीच्या वतीने श्री गुरुजी पुरस्कार निमित्ताने सोमवारी (ता. २३) आयोजित आंतरशालेय लेझीम स्पर्धेत प्रजासत्ताक दिनाचे रंग दिसले. या स्पर्धेचे जिजामाता विद्यालयाच्या संघाने प्रथम पारितोषिक पटकावले आहे.

१६ संघ आणि सुमारे पाचशे स्पर्धक सहभागी असलेल्या या स्पर्धेत बळीराम पाटील विद्यालयाच्या संघाने द्वितीय तर धर्मवीर संभाजी विद्यालयाच्या संघाने तृतीय क्रमांक मिळवला. त्यांना अनुक्रमे अकरा, सात व पाच हजारांचे रोख बक्षीस व चषक प्रदान करण्यात आला. द्वितीय सरसंघचालक गोळवलकर गुरुजी यांच्या जन्म दिनानिमित्त 'श्री गुरुजी पुरस्कार' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या पुरस्कार सोहळ्यानिमित्त आंतरशालेय लेझीम स्पर्धेचे आयोजन आज धर्मवीर संभाजी विद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले.

स्पर्धेचे उदघाटन जनकल्याण समितीचे देवगिरी विभागाचे कार्यवाह बाळकृष्ण खानविलकर, प्राचार्य डॉ सर्जेराव ठोंबरे, क्रीडा भारतीचे प्रांताध्यक्ष श्री पंकज भारसाखळे यांचे हस्ते करण्यात आले.

सर्व सहभागी संघांनाही याप्रसंगी क्रीडा भारतीच्या वतीने स्मृतिचिन्ह देण्यात आले. पारितोषिक वितरणासाठी प्रमुख पाहुणे म्हणून वसंतराव नाईक महाविद्यालयाचे सचिव श्री नितिन राठोड, जनकल्याण समितीचे जिल्हा कार्यवाह श्री प्रसन्नकुमार बोठे, दीनदयाळ संस्थेचे अध्यक्ष श्री शामराव नाईक, मुख्याद्यापक बाबुलगांवकर यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी नितीन राठोड, प्रसन्नकुमार बोठे यांनी आपले विचार मांडले.

लेझीम स्पर्धेचे परिक्षक म्हणून प्रा. डॉ. रंजन बडवणे व प्रा. डॉ. युसुफ पठाण यांनी काम पाहिले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी क्रीडा भारतीचे विनायक राऊत, श्री वाहुळे, प्रशांत जामदाडे तसेच सर्व सहभागी शाळांचे क्रीडा शिक्षक आदींनी परिश्रम घेतले.

क्रीडा भरतीच्या पुढाकाराने आयोजित या लेझीम स्पर्धेत औरंगाबाद शहरासह ग्रामीण भागातील अनेक संघ व खेळाडू सहभागी झाले होते. धशभतीपर गीते आणि वाद्यांच्या तालावर या खेळाडूंनी लेझीम खेळताना अनेक प्रात्यक्षिके पण दाखवली. तिरंगा,




अशोक चक्राच्या आकारात लेझीम खेळून सहभागी संघांनी उपस्थितांची मने जिंकली.



# सचिन मुळे यांचा औरंगाबाद जिल्हा खो-खो असोसिएशनच्या वतीने सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** येथील उद्योजक आणि औरंगाबाद जिल्हा क्रिकेट संघटना सचिव सचिन मुळे यांची महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या मध्य विभागातून अँपेक्स कौन्सिल कमिटीच्या मराठवाडा संघटकपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल औरंगाबाद जिल्हा खो-खो असोसिएशनच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. दि औरंगाबाद जिल्हा खो-खो असोसिएशन अध्यक्ष समीर मुळे, महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस गोविंद शर्मा, उपाध्यक्ष ऋषिकेश जैस्वाल यांच्या वतीने स्मृती चिन्ह, शाल व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. सचिन मुळे यांनी सांगितले की ग्रामीण भागातील क्रिकेट खेळाडूंना राज्य आणि देशपातळीवर संधी देणार असून प्रतिभावान खेळाडूंवर लक्ष केंद्रित करून मराठवाड्यातील गुणवान तसेच गरजूंना मदत करण्याचा मानस आहे. असोसिएशन अध्यक्ष समीर मुळे यांनी सांगितले की, मराठवाड्याला सचिन मुळे यांच्यासारखे दूरदृष्टीचे व उमदे नेतृत्व मिळाले आहे. त्याचा भविष्यात निश्चित फायदा उदयोन्मुख क्रिकेट तरुणांना होणार आहे. मराठवाड्याला भविष्यातही या सुविधा मोठ्या प्रमाणात मिळतील, अशी अपेक्षा समीर मुळे यांनी यावेळी व्यक्त केली. या सत्कार सोहळ्याला औरंगाबाद जिल्हा खो-खो असोसिएशनचे सहसचिव अभयकुमार नंदन, स्पर्श क्रीडा मंडळ उपाध्यक्ष सौरभ यादव, मोहन अहिरे, राहुल नाईकनवरे, राजपाल निकाळजे, वरद कचरे आणि शहरांतील अनेक खेळाडू उपस्थित होते.

# कवी जितेन सोनवणे यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**कोडीत :** ता.पुरंदर. येथील कवी जितेन सोनवणे यांची केशवसुतांना कवितेतून अभिवादन करण्यासाठी निवड झालेली आहे. नारायण सुर्वे साहित्य कला अकादमी कविवर्य केशवसुत स्मारक समिती तर्फे कविवर्य केशवसुत यांचे मुळगाव ता. मालगुड, जि. रत्नागिरी येथे दि. 29. जानेवारी रोजी कविता अभिवादन सोहळा आयोजित केला आहे. सोहळ्याचे उद्‌घाटन प्रा.डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते होणार आहे प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ कवी अरुण म्हात्रे यांची उपस्थिती लाभणार आहे.अरुण खोरे, गजानन पाटील, स्वागताध्यक्ष राजेंद्र वाघ, माधव



पवार, सरपंच श्वेता खेऊर. आदी उपस्थित राहणार आहे. संस्थापक मधु मंगेश कर्णिक, मुख्य आयोजक पुरुषोत्तम सदाफुले, सुदाम मोरे, बाजीराव सातपुते, मानसी चिटणीस, सुरेश कंक, दीपक चांदणे,संगीता झिंजुरके, जयवंत भोसले, वर्षा बालगोपाल, नमिता कीर, प्रदीप ढवळे, प्रकाश दळवी, विलास राणे, माधव अकलंगे, रेखा नार्वेकर, उपस्थित राहणार आहे.

# मराठवाड्यातील पहिले बॅरिस्टर उमर कमाल फारुकी यांचा वैजापुरात सत्कार

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** युनाईट फाऊंडेशनच्या वतीने मराठवाड्यातील पहिले बॅरिस्टर तथा भूमीपुत्र, औरंगाबाद जिल्ह्यातील बॅरिस्टर उमर कमाल फारुकी यांचा वैजापूर शहरातील कुरेशी मंगल कार्यालयात युनाइट फाऊंडेशनच्या वतीने सत्कार करण्यात आला, तसेच शिक्षक सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वैजापूर गंगापूर विधानसभा मतदार संघाचे आमदार रमेश पाटील बोरनारे, माजी आमदार भाऊसाहेब तात्या चिकटगावकर, माजी नगराध्यक्ष डॉ.दिनेश परदेशी उपनगराध्यक्ष साबेरखान, माजी उपनगराध्यक्ष अकील शेख, माजीद कुरेशी, वैजापूर मर्चंट बँकेचे अध्यक्ष मा विशाल संचेती, उद्योगपति हामिद कुरेशी ,माजी नगर सेवक मा. सुलतान कुरेशी, भाजप शहराध्यक्ष दिनेश राजपूत, नगरसेवक इम्रान कुरेशी, युवासेना जिल्हा समन्वयक अमीर अली, काझी हफिजुद्दीन, बिलाल सौदागर, एड. नुजत बाजी, साबेर अश्रफखान, झाकीर कुरेशी, वाजेद कुरेशी, काझीम सौदागर, युनाईट फाऊंडेशनचे सर्व सदस्य यांच्यासह सर्व पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.



# शरद जोशी विचार मंच शेतकरी संघटनातर्फे फुलंब्री तहसीलदार यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** सातबारा वरच्या आपल्या सर्वांचा पीक पेरा प्रत्यक्ष शेतकऱ्यांनी आपल्या मोबाईलद्वारे नोंद करावी करावा अशा शासनाच्या सूचना आहे परंतु बऱ्याचशा शेतकऱ्यांकडे अँड्रॉइड मोबाईल उपलब्ध नाही त्यामुळे शेतकरी तरस्ता आहे. पिक पेरा न झालेल्या शेतकऱ्यांची संबंधित तलाठ्यास ऑफलाइन पद्धतीने नोंदणी करण्याची सूचना कराव्यात आपल्या कार्यालयाकडून दिलेली 26 जानेवारी ची तारीख वाढवून देण्यात यावी तालुक्यातील सर्व तलाठी यांचे कार्यालय काय सजेवर करण्यात येऊन सजावर उपलब्ध राहण्यास सूचना करण्यात यावी जेणेकरून शेतकऱ्यांना येण्या जाण्याचा त्रास होणार नाही तरी वरील मागणीची लवकरात लवकर विचार करावा नसता आम्हास आंदोलन करावे लागेल असा इशारा काशिनाथ जाधव जिल्हा अध्यक्ष शरद जोशी विचार मंच शेतकरी संघटना औरंगाबाद यांनी केला.

# पीयूष राठोड महाराष्ट्राच्या संघात

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** पियुष राठोडची निवड चेन्नई येथे होणाऱ्या राष्ट्रीय हँडबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात करण्यात आलेली आहे. चेन्नई येथे २६ ते ३० जानेवारी दरम्यान या स्पर्धा भारतीय हँडबॉल महासंघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेले आहेत. नुकतेच नवी मुंबई येथील खारघर मध्ये महाराष्ट्र हँडबॉल संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेला जूनियर मुलांच्या



हँडबॉल स्पर्धेमधे औरंगाबादच्या पियुष राठोड ची चांगली कामगिरी पाहता त्याचा महाराष्ट्राच्या संघात समावेश करण्यात आलेला आहे. पियुष राठोड ला पुढील वाटचालीसाठी औरंगाबाद जिल्हा हँडबॉल संघटनेचे अध्यक्ष माजी आ.श्रीकांत जोशी, सचिव प्रभाकर भारसाखळे, कोषाध्यक्ष प्रा.डॉ.सत्यजित पगारे यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट

महावीर
घर संसार



सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद

# प्रवास भाडे द्या..अन् उभे राहून प्रवास करा..!

## नांदेड -आदिलाबाद रेल्वेमधील प्रकार : डब्यात घाणीचे साम्राज्य

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** प्रारंभी नांदेड ते आदिलाबाद रेल्वे मार्गावर मीटर गेज लोहमार्ग होता. आता लोहमार्गाचे रूंदिकरण करण्यात आले आहे. बऱ्यापैकी रेल्वे सेवा असून आणखी फे-या वाढविणे गरजेचे आहे. नुकतीच या मार्गावर एक लोकलची सुविधा करण्यात असून सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे. प्रवास भाडे देऊन चक्क उभे राहून प्रवास करावा लागतो आहे. सदरील रेल्वे सेवा ही प्रवाशांसाठी डोके दुखी ठरते आहे. संबंधित वरिष्ठांनी होणारी गैरसोय दूर करून प्रवाशांना दिलासा द्यावा अशी त्रस्त झालेल्या प्रवाशांची मागणी आहे. निजाम राजवटिपासून नांदेड ते तेलंगणातील आदिलाबादपर्यंत मीटर गेज रेल्वे सेवा सूरू झाली आहे. दिवसेंदिवस प्रवाशांची संख्या वाढत असल्याने या मार्गावर लोहमार्ग रूंदीकरण करण्यात यावे अशी वाढती मागणी होती. याची दखल घेऊन ऊशिरा का होईना रूंदीकरण करण्यात आले. परिणामी प्रवाशांची व व्यापाऱ्यांची थोडीफार होणारी गैरसोय दूर झाली. या मार्गावर मूदखेड, भोकर, हिमायतनगर, इस्लापूर, किनवट असे पाच तालूके जोडल्या गेले आहेत. परिसरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता सोयीच्या रेल्वे फेऱ्या नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे. साप्ताहिक रेल्वे सेवा असली तरी नियमित जाणाऱ्या रेल्वे फारच कमी आहेत. केवळ नंदिग्राम ही एकच जलद रेल्वे सूरू आहे. पूर्वी ती मुंबई ते नागपूर अशी जात होती.आता मात्र आदिलाबाद मूंबई अशी करण्यात आली आहे. तपोवन एक्स्प्रेस निजामबाद ऐवजी ती आदिलाबाद सेवा सूरू करावी अशी मागणी केली पण रेल्वे विभाग याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे. दक्षिणमध्ये रेल्वे विभाग केवळ त्यांच्याच भागातील रेल्वे सेवेकडे लक्ष देतात त्यामुळे मराठवाड्यातील रेल्वे प्रश्नांकडे जाणीव पूर्वक कानाडोळा केला जातो आहे.



**पैसा देऊन मनस्ताप :** नांदेड ते आदिलाबाद रेल्वे मार्गावर पूर्वीपासून सकाळी आणि सायंकाळी पॅसीजंरची सेवा सुरू होती . आता नव्याने पॅसीजंर रेल्वे बंद करून त्याऐवजी सहा डब्याची "लोकल" सेवा मागील महिन्याभरापासून सूरू केली आहे .डब्याची संख्या कमी असल्याने प्रवाशांना चक्क उभे राहून प्रवास करावा लागतो आहे . आसनव्यवस्था कमी आहे .शोचालयात पाण्याची व्यवस्था नाही . सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले असून प्रवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे .डब्याची संख्या वाढविण्यात यावी अशी प्रवाशांची मागणी आहे .पैसा देऊन प्रवास करताना मनस्ताप सोसावा लागतो आहे .

## 'ना कुछ छोडा ना कुछ जोडा' का सुंदर उदाहरण है हिंदी में अनूदित 'तारी ...' : डॉ. दामोदर खडसे




आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** आपण मायावी अवस्थेत इतके फसलो आहोत की या मायावी अवस्थेची जाणीवच आपणास नसते. 'तारी...' मधील कविता ही स्त्री देह जाणीवांची, वेदनांची, मनाच्या संवेदनांची मन-वैज्ञानिकासारखी कविता आहे. हिंदीत अनुवादन करताना 'ना कुछ छोडा ना कुछ जोडा ' असे काम अनुवादिका प्रा.उमा केवळराम-देशमुख यांनी केले आहे, असे गौरवोद्गार ज्येष्ठ हिंदी साहित्यिक डॉ. दामोदर खडसे यांनी केले. डॉ. वृषाली किन्हाळकर यांच्या तारी या हिंदी अनुवादित कवितासंग्रहाच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. चंद्रदेव कवडे आहे. व्यासपीठावर डॉ. राणी गीतेश काटे, अनुवादिका उमा केवळराम-देशमुख, डॉ. वृषाली किन्हाळकर यांची उपस्थिती होती. डॉ. खडसे पुढे म्हणाले, किन्हाळकरांच्या कवितेत जागोजागी शब्दांची जादुगरी पेरलेली आहे. आपली अंतःस्थ वेदना आणि अनुभूती या संग्रहातून व्यक्त झाली आहे. ती कुणा एकट्याची नाही तर जीवन जगणाऱ्या प्रत्येकाची आहे. ही कविता वाचकांना आपली अनुभूती वाटते आणि असं वाटणं हे त्या कवितेचे खरे यश आहे. प्रारंभी मान्यवरांचा सत्कार प्रकाशक आनंद तिवारी यांनी करून प्रास्ताविक केले. समारंभाचे अध्यक्ष डॉ. चंद्रदेव कवडे यांनी तारी संग्रहातील 'असहनीय दर्द' या कवितेचे निरूपण करत, ही कविता मुक्ती देणारी कविता आहे असे सांगून, मी ही कविता वाचताना मुक्त होत जातो. वेदन, अनुवेदन, संवेदन, भाव, विभाव, अनुभव यातून निर्माण होणाऱ्या रसाचा मी आनंद घेत असतो. कवयित्री डॉ. वृषाली किन्हाळकर म्हणाल्या, आजच्या जगात सगळं मिळतं, फक्त प्रेमच सापडत नाही. 'मैने पीडा को रूप दिया, जग समझा मैने कविता की' या हरिवंशराय बच्चन यांच्या ओळी सांगून, मी रोज कागदांवर काही बाही औषधे लिहीत असते आणि हे लिहीत असताना त्यासोबतच दुसरे काहीतरी लिहिते आणि तेच कविता होऊन जाते. वेदन म्हणजे सांगणं, व्यक्त होणं. हा शब्द मराठी शब्दकोशात नाही. तो जैन शब्दकोशातला आहे हे कविवर्य तांबोळी सरांनी मला सांगितले. तारी म्हणजे झोप आणि जाग यातील टप्पा आहे. माझ्याकडे येणाऱ्या बायकांचे दुःख मला जाणवतं, कोणाचं तरी दुःख समजून घेण्याची ही नशा मला येते. या प्रकाशन समारंभासाठी माजी आमदार गंगाधर पटणे, डॉ. माधव किन्हाळकर, डॉ. जगदीश कदम, एकनाथ मोरे, साहित्यिक, रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डोणगाव येथे बालिका दिन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**केनवड :** 24 जानेवारी 1966 रोजी भारताच्या पहिल्या महिला प्रधानमंत्री म्हणून इंदिरा गांधी यांनी शपथ घेतली होती. तेव्हापासून 24 जानेवारी हा दिवस राष्ट्रीय बालिका दिवस म्हणून साजरा केला जातो. आपल्या भारत देशात 2008 साली महिला कल्याण एवं बालविकास मंत्रालयातर्फे या उपक्रमास सुरुवात झाली होती. भारताच्या इतिहासात पहिल्यांदा देशाच्या उच्च प्रधानमंत्री पदावर एक महिला बसली होती. जे की महिला सशक्तिकरणाकडे देशाचे एक क्रांतिकारी पाऊल होते. दरवर्षी 24 जानेवारीला बालिका दिवस साजरा करण्याचे मोठे कारण भारताच्या पहिल्या प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांच्याशी जोडलेले आहे. ही भारतासाठी खुप अभिमानाची गोष्ट होती. भारताच्या इतिहासात महिलांच्या सशक्तीकरणासाठी 24 जानेवारी हा दिवस खुप महत्वाचा आहे. आपल्या शाळेमध्ये हा बालिका दिन मुलींना शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षिका सौ. स्वाती व्यवहारे, सौ.स्वाती सरकटे यांच्या हस्ते कुंकुम तिलक, अक्षदा लावून, चॉकलेट देऊन मुलीचे स्वागत करण्यात आले. शाळेतील शंभर मुलींना उभे करून त्यांचे औक्षण करण्यात आले. व स्वागत करण्यात आले.

विद्यार्थीनींना विद्यार्थ्यांच्या, शिक्षकांच्या, कर्मचाऱ्यांच्या वतीने बालिका दिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. हा दिवस साजरा करण्याचा मुख्य उद्देश मुलींना त्यांच्या अधिकाराविषयी जागृत करणे हा आहे. भारत सरकारने मुलींच्या शिक्षणासाठी मुले - मुली भेदभाव दूर करण्यासाठी, समानतेसाठी, "बेटी बचाव बेटी पढाव" अभियान, सुकन्या समृद्धी योजना' शिक्षण, नोकरीमध्ये आरक्षण दिले आहे. 24 जानेवारी हा दिवस राष्ट्रीय बालिका दिवस म्हणून मोठ्या आनंदाने साजरा केला. हा कार्यक्रम संस्थेचे सचिव शैलेशभाऊ सावजी यांच्या मार्गदर्शनात मुख्याध्यापक आत्माराम दांदडे, शिक्षक बंडू पांडव, संजीव भारते, गजानन भगत, गौतम सदावर्ते, अभिजित दिनोरे, शाम आखाडे यांनी मोठ्या उत्साहाने संपन्न केला.



## मुंबईचा भूषण तांबे ठरला राज्यस्तरीय वृत्तपत्र लेखन स्पर्धेचा मानकरी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** काही दिवसांपूर्वीचं अभिजीत राणे युथ फाऊंडेशनच्या वतीने विविध प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये राज्यस्तरीय वृत्तपत्र लेखन स्पर्धेत मुंबईच्या भूषण तांबे यांना विशेष प्राविण्य मिळविण्यास यश आले. याच स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ आज मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये आयोजित करण्यात आला होता. युथ फाऊंडेशनचे संस्थापक माननीय श्री.अभिजीत राणे यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले तसेच संपूर्ण कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी छान आयोजन केले. सर्व मान्यवरांना उत्तेजित करण्यासाठी आणि त्यांचे कौतुक करण्यासाठी माननीय अभिजीत राणे यांनी आपल्या मनोगतातून भावना व्यक्त केल्या. स्पर्धेतील विजेत्या मान्यवरांना या बक्षीस समारंभ कार्यक्रमात आमंत्रित करून प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र राज्यातून सर्व क्षेत्रातील कला, क्रीडा,





साहित्य, आणि पत्रकारितेत उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल साहित्यिक मान्यवरांचे कौतुक करण्यात आले आणि त्यांच्या पुढील वाटचालींसाठी शुभेच्छाही देण्यात आल्या. कवी, लेखक, व्यंगचित्रकार आणि पत्रकार अशी भूषण सहदेव तांबे यांची ओळख संपूर्ण महाराष्ट्रात आहे. महाराष्ट्रातील विविध वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके तसेच दिवाळी अंकांसाठी त्यांचे साहित्य आवर्जून प्रकाशित केले जाते. भूषण सहदेव तांबे यांचे साहित्य महाराष्ट्रातच मर्यादित राहिले नसून गोवा ते थेट अमेरिकेत प्रकाशित होत असलेल्या दिवाळी अंकांमध्ये देखील त्यांचे साहित्य आवर्जून प्रकाशित केले जाते. भूषण सहदेव तांबे यांना मिळालेला हा पुरस्कार नक्कीच त्यांना उत्तेजना देईल आणि त्यांचे पुढील साहित्य लोकार्पणासाठी लवकरात लवकर सज्ज होईल असे त्यांनी त्यांच्या मनोगतातून व्यक्त केले आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



# विविध मागण्यांसाठी आंदोलक उतरले रस्त्यावर

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** दिल्ली संयुक्त किसान मोर्चाच्या आदेशावरून अनेक मागण्यांसाठी लाखोच्या संख्येने संपूर्ण जिल्ह्यातून अनेक गाव तालुका येथून संसार उपयोगी वस्तू घेऊन या आंदोलनासाठी रवाना झाले. जोपर्यंत मागण्या पूर्ण होत नाही तोपर्यंत आंदोलन चालूच राहील हे आंदोलन पाण्यासाठी गर्दी लोटावत होती व पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ही लावण्यात आलेला आहे. त्यांच्या मागण्या पुढील प्रमाणे १ ) आदिवासी व इतर जंगल निवासी वनहक कायद्याची अंमलबजावणी करताना ग्रामस्तरीय समिती ग्रामसभा ठराव व नागरिकांचा जवाब ग्राहय धरून दावेदारांना पात्र घोषित करा. ह्या दावेदारांना कसलेल्या जमिनीचे ७/१२ दया . स्थळ पहाणी न करता दिलेल्या अपात्र नोटीसा रद्द करा . २ ) दुधासह सर्व शेतीमालाला उत्पादन खर्च + ५० टक्के नफा असा भाव देणारा एम . एस . पी गॅरंटी कायदा करा . ३ ) सर्व दावेदारांची जी.पी.एस. मशिनने मोजणी करा . ४ ) सर्व शेतकऱ्यांना पिकविमा दया . ५ ) गायरान व इतर पडीक जमिनीवरील कसणाऱ्याचा हक मान्य करा . ६ ) सर्व वनहक्क दावेदारांना शेतीसुधारणेसाठी शासकीय योजनांचा लाभ द्या . ७ ) शेतकऱ्यांची सरसकट संपूर्ण कर्जमुक्ती व दीजबिलमुक्ती झालीच पाहिजे . ८ ) शेतकरीविरोधी आयात निर्यात धोरण व गोवांशहत्या बंदी , सक्तीचे भूसंपादन इ . कायदे रद्द करा . ९ ) आदिवासी शेतकल्यांना मागील दोन योजनांर्तगत कर्जमाफी द्या . कर्जमाफी योजनांची अंमलबजावणी न करणाऱ्या बँकांवर कारवाई करा. थकित कर्जाबद्दल वनटाइम सेटलमेंट करा . सर्व शेतकऱ्यांना नवीन कर्जे दया. खाजगी सावकारांच्या कचाट्यातून मुक्त करा १० ) पेसा कायद्यातील आदिवासी विरोधी दुरुस्त्या थांबवून ग्रामसभा सक्षम करा. ११ ) धरणातील पाण्याचे समन्यायी वाटप करा. तापी नदीच्या पुराचे पाणी पांझरा कान इ. नद्यांमध्ये आणा . १२ ) वनहक्कदारांना बेदखल करणाऱ्या मेंढपाळ व इतर गुंडावर ॲट्रॉसिटीचे गुन्हे दाखल करा. १३) ऊसतोडणी मजुरांच्या वेतनाचा नवा करार करा . १४ ) रेशन थेट सबशिडी योजना मागे ध्या . १५ ) विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत महगाई निर्देशांकानुसार वाढ करा . वस्तीगृहात मेस चालू करा . डिबीटी पद्धत बंद करा . बार्टीप्रमाणे आदिवासी विद्याश्यांना संशोधन शिष्यवृत्ती द्या . १६ ) आदिवासी स्त्री - पुरुष समानतेसाठी नवा कायदा करा . १७ ) मनरेगा अंतर्गत मागेल त्याला गावाजवळ काम द्यावे . सरकारी नोकऱ्यामधील आदिवासींच्या रिक्त ७५००० जागा भरा . बोगस आदिवासी हटवा . १ ९ ) सर्वांना स्वच्छ , आरोग्यदायी , पुरेसे पेयजल उत्पलब्ध करा . २० ) नाचे अंतिम आदेश स्थगित करून फेरविचार करा अशा संपूर्ण मागण्यासाठी शेतकरी संघटना सत्यशोधक लालबावटे अचानक शहरात भिडले व संपूर्ण जेल रोड परिसर लालमय झाले.

## कृषी कार्यालयाला 'जनशक्ती'चे निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जनशक्ती शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अतुल खुपसे पाटील यांच्या आदेशानुसार औरंगाबाद जिल्ह्यात बोगस रासायनिक खते, कीटकनाशक औषधी कंपन्या विरोधात जिल्हा कृषि आधिकारी कार्यालय औरंगाबाद येथे दिनांक 26 जानेवारी 2023 रोजी प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी गांधी गिरी मार्गाने जिल्हा कृषि कार्याल्याला आग लाऊन आंदोलन करणार आसल्याचे जनशक्ती संघटनेकडून निवेदन देण्यात आले. औरंगाबाद जिल्ह्यात रासायनिक कंपन्या कृषि खतांचे दुकानदार कषी विभाग यांची साखळी आहे प्रत्येक जिल्ह्यात बोगस खतांची मोठ्या प्रमाणात विक्री चालु आहे यातुन शेतकर्यांची फसवणूक होऊन नुकसान होत आहे. पंचनामे करणारी कुषी यंत्रणाही रासायनिक कंपन्यांना पाठीशी घालत आहेत बोगस रासायनिक खतनिर्मिती करणार्यां कंपन्या व विक्रेते यांच्यावर ठोस कारवाई करण्याऐवजी फक्त काही दिवसांसाठी परवाने निलंबित करतात. या विरोधात



जनशक्ती शेतकरी संघटनेच्या वतीने दिनांक 26 जानेवारी 2023 रोजी कृषि आयुक्त कार्यालय पुणे येथे कार्यालय पेटविण्याचा इशारा दिनांक 18/1/2023 रोजी जनशक्ती शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अतुल खुपसे पाटील यांनी पत्रकार परिषदेत इशारा दिला होता. खते परवानगीशिवाय विक्री करणे खतांचा काळाबाजार व अधिक दराने विक्री खतांची विक्री करताना इतर खते घेण्याची शेतकऱ्यांना सक्ती कुषी गुण नियंत्रण विभागांचे नियंत्रण नाही दुकानदारांवर सौख्य कारवाई व 500 रुपये दंड केला जातो कृषि विभागांचे अधिकारी कागदपत्री भेटी देतात बाजारात अनेक खंत विक्रीला परवानगी नसताना शेतकऱ्यांच्या माथी मारतात यांचा फटका शेतकऱ्यांना बसतो यांची कुषी विभागाने चौकशी करावी लिंकिंगपध्दत बंद करावी बोगस खतविक्री करणार्या वर कारवाई करावी या बाबत आंदोलने केली निवेदन दिले. पण यांची दखल घेतली जात नाही यामुळे दिनांक 26 जानेवारी 2023 रोजी प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी कुषी आयुक्त कार्यालय पुणे येथे संघटनेच्या वतीने अनोखे आंदोलन करण्यात येईल.

## पलक, आयुष महाराष्ट्रातून ठरले अव्वल

आधुनिक केसरी न्यूज

**वाकोद, ता. जामनेर :** बोदवड येथील रहीवाशी विरेंद्रकुमार संतोकचंद रेदासनी यांची मुले पलक रेदासनी (वय-१३) आणि आयुष रेदासनी (वय-११) या दोघ बहीन भावंडानी यंदा घेण्यात आलेल्या आत्मलक्ष्यी, साध्वीरत्ना पू. श्री किरणप्रभाजी म.सा. यांच्या ९३ व्या जन्म जयंतीनिमित्त जैना स्तोक ऑनलाईन परीक्षा संबध महाराष्ट्र राज्यात विविध ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. या परिक्षेसाठी महाराष्ट्रातील शेकडो मुला, मुलीनी सहभाग घेतला होता यात बोदवड येथील पलक आणि आयुष रेदासनी या दोन्ही भावंडानी चमकदार कामगीरी करीत प्रथम क्रमांक पटकवीत प्रथम पुरस्काराचे मानकरी ठरलेआहे. या यशा बद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. पलक आणि आयुष हे दोघ भावंड शालेय अभ्यासात हुशार तर आहेच मात्र आज च्या युगात धार्मिकतेची ओढ निर्माण करीत समाजातील घेण्यात येणाऱ्या सर्व धार्मिक परीक्षेत हिरीरिणे सहभाग नोदंवून याचे अध्ययन करून परिक्षेला सामोरे जात आहे. त्यांनी मागील वर्षी घेण्यात आलेल्या १२ वर्षापेक्षा लहान बालकांसाठी आयोजीत प्रतिक्रमण राज्यस्तरीय पाठांतर स्पर्धेमध्ये राज्यभरातून उत्तीर्ण झालेल्या मुलां मध्ये पलक रेदासनी (प्रथम), तर आयुष रेदासनी



(द्वितीय) क्रमांकाने उत्तीर्ण झाले होते नगर येथे आचार्य साम्राट आनंदऋषीजी म. सा. यांची जन्मभूमी असलेल्या चिंचोडी येथे आनंदतीर्थ या पवित्र भुमीवर 'माँ हुलसा' पुरस्कार देवून आई, वडीलासह गौरविण्यात आले होते. तसेच बाल बोधिनी व जैन सिद्धांत परिचय परीक्षेत पलक प्रथम तर आयुष द्वितीय आले होते. जैन धर्मातील सर्वात कठीन आणि अवघड असलेल्या प्रतिक्रमण, भक्तांबर, पुच्छीसुनम तसेच पच्चीस बोल पूर्ण केले आहे, सद्या ६७ बोल चालू असून ही एक अभिमानस्पद बाब आहे लाहनश्या वयात शालेय अभ्यासा सोबत धार्मिक अभ्यासात सदैव अग्रेसर राहून हे दोघ भावंड रेदासनी परिवारा सह समाजाचे नाव रोशन करीत आहे.



## श्रीमंत राजे अमरसिंह जाधवराव यांची ऐतिहासिक देवगिरी किल्ल्यास भेट

आधुनिक केसरी न्यूज

**प्रकाश लकडे**

**दौलताबाद :** येथे माँसाहेब जिजाबाई (सिंदखेड राजा) यांचे वंशजातिल माळेगाव बू. ता.बारामती जि.पूणे येथिल श्रीमंत राजे अमरसिंह जाधवराव यांनी आज दि.२४ जानेवारी २०२३ रोजी पहिल्यांदाच दौलताबाद येथिल देवगिरी किल्ल्यास भेट देवून येथिल आपल्या वंशजाचा इतिहास समजून घेतला. यावेळी इतिहास अभ्यासक प्रा.शिवाजी गायकवाड यांनी त्यांना इतिहास व किल्ल्याबाबत सविस्तर माहीती दिली. दौलताबाद किल्ला संवर्धन संरक्षक सहा.विभागाचे आधीकारी कर्मचारी तथा दौलताबाद पो.स्टेचे सहा.पो.उ.नि कांबळे, हे.काँ.सोळूंके, एएसआयचे एसएस नीळ, सीताराम धनाइत, रवींद्र घाटे, संजय घूसळे यांनी त्यांचे पूष्पगूच्छ आणि शाल देवून सत्कार केला. दौलताबाद येथिल गावकरी कल्याण कांजूणे,बंडू सूरसे, शेख जावेद, अभय विखणकर, शिवाजी आस्वार, नीलेश आढाव आदिंसह नागरीकांची उपस्थिती होती. देवगिरीचे वैभव पाहून राजेंनी आपल्या पूर्वजांच्या आठवणी व इतिहासाचा आढावा घेत येथील भव्य वास्तूला नतमस्तक झाले. त्यानंतर दौलताबाद येथे असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाला भेट देवून छत्रपतींच्या पूतळ्याचे दर्शन घेवून अभिवादन केले.त्यावेळी नरेश बळी, बंडू पाटील, निलेश आढाव पाटील, विकास गोरे, शिवाजी झलके, प्रवीण घुले, सतीश मगर, गणेश बोडखे, योगेश गायकवाड, सुरज जाधव , योगेश पाडळे व जगदंब ग्रुपतर्फे स्वागत करण्यात आले.समस्त शीवप्रेमी व गावकरी यूवकांनी रांजेंचे स्वागत केले.



# सामाजिक विकास योजनेअंतर्गत ४ कोटी निधी मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**ज्योती खिलारे**

**पंढरपूर :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंतर्गत पंढरपूर व मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या पायाभूत व मूलभूत सोयी - सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी ४ कोटी रुपये निधी मंजूर झाल्याची माहिती आमदार समाधान आवताडे यांनी दिली आहे. सदर योजनेमध्ये अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या विकासासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींची स्थळे, तसेच सांस्कृतिक व ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाच्या असणाऱ्या स्थळांचा विकास करणे व त्यांची स्मारके उभा करणे आदी कामांचा समावेश असल्याची माहिती आ. आवताडे यांनी दिली आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या शिक्षण, आरोग्य, रस्ते पाणी या सुविधा समाजातील प्रत्येक घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी या महत्त्वकांक्षी योजनेमार्फत हा भरीव निधी मंजूर झाला आहे. मंजूर झालेल्या सदर निधीमुळे मतदार संघाच्या कार्यक्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी व धोरणात्मक विकासासाठी मोठी चालना मिळणार आहे.**सदर योजनेअंतर्गत पंढरपूर तालुक्यातील निधी मंजूर झालेली गावे व कामे :** १) मौजे कौठाळी येथे दलित वस्ती अंतर्गत मस्के वस्ती येथे पोहोच रस्ता बांधणे २) मौजे शिरढोण येथील नवबौद्ध घटकांच्या वस्तीमध्ये व्यायामशाळा बांधणे ३) मौजे वाखरी येथे नवबौद्ध घटकांच्या ज्ञानेश्वर गायकवाड घरापर्यंत पोहोच रस्ता करणे ४) मौजे गादेगाव येथे नवबौद्ध घटकांच्या वस्तीमध्ये व्यायामशाळा बांधणे ५) मौजे कोर्टी येथे नवबौद्ध घटकांच्या वस्तीमध्ये वाचनालय बांधणे ६) मौजे लक्ष्मी टाकळी येथील नवबौद्ध घटकांच्या वस्तीमध्ये शिवपार्वती नगर व हद्दवाढ येथील रस्ता दुरुस्त आणि सुधारणा करणे ७) मौजे उंबरगाव येथील नवबौद्ध घटकांच्या वस्तीमध्ये उंबरगाव - गादेगाव रस्ता व प्रकाश चंदनशिवे घरापर्यंत रस्ता करणे ८) मौजे बोहाळी येथील नवबौद्ध घटकांच्या वस्तीमध्ये मेन रोड बोहाळी ते मातंग वस्ती रस्ता करणे ९) मोजे खर्डी येथे गावठाण दलितवस्ती मध्ये व्यायाम शाळा बांधणे १०) मोजे तपकिरी शेटफळ येथे मोरे बनसोडे वस्ती ते संतोष बनसोडे यांच्या घराजवळ पथदिवे बसविणे.

**सदर योजनेअंतर्गत मंगळा तालुक्यातील निधी मंजूर झालेली गावे व कामे :** १) मौजे दामाजीनगर येथे कृषी उत्पन्न बाजार समिती आवारामध्ये स्वच्छतागृह व अभ्यासिका बांधणे २)संत चोखामेळा नगर येथील मारापुर रोड येथे धनंजय खवतोडे यांच्या घराशेजारी व्यायाम शाळा बांधणे व पथदिवे बसविणे ३) संत चोखामेळा नगर अंतर्गत एकविरा माळ येथील प्रमोद कांबळे ते लाळे डेअरी पर्यंत रस्ता करणे व दोन्ही बाजूस पथदिवे बसविणे ४) संत दामाजी नगर येथील शिंदे घोडके वनखंडे वस्ती येथे अभ्यासिका बांधणे ५) मौजे माचनूर येथे संविधान भवन बांधणे ६) मौजे माचनूर येथील चांभार वस्ती येथे सभामंडळ बांधणे ७) मौजे घरनिकी येथील दलित वस्ती येथे आर.ओ सिस्टीम बसवणे ८) मौजे मानेवाडी येथे तूपसौवन वस्ती व गेजगी वस्ती येथे स्मशानभूमी बांधणे ९) मौजे हिवरगाव येथे दलित वस्ती अंतर्गत पेविंग ब्लॉक बसवणे १०) मौजी येळगी येथील शिंदे भोरकडे वस्ती येथे व्यायाम शाळा बांधणे ११) मौजे सोड्डी येथील दलित वस्ती अंतर्गत स्मशानभूमीपर्यंत रस्ता करणे १२) मौजे ढवळस येथे गावठाण जागेत मध्ये बौद्ध विहार बांधणे १३) मंगळवेढा शहर शहर साठे नगर येथे अभ्यासिका बांधणे १४) मंगळवेढा शहर साठे नगर येथे सार्वजनिक पुरुष व महिला शौचालय बांधणे १५) मंगळवेढा शहर साठे नगर येथे व्यायाम शाळा बांधणे १६) मौजे जित्ती येथे दलित वस्ती येथे व्यायाम शाळा बांधणे १७) मौजे डोणज येथील दलित वस्ती येथे गटार व व्यायामशाळा बांधणे.



समाजातील दलित व शोषित घटकांच्या चौफेर विकासासाठी आ . समाधान आवताडे यांनी एवढा मोठा निधी उपलब्ध करून सदर घटकांच्या सर्वांगीण प्रगतीची कवाडे मोठ्या व्यापकतेने आणि विस्तृतपणे खुली केली आहेत . मतदारसंघातील दलित घटकांच्या विकास साधनेसाठी एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रथमत :च निधी मंजूर झाल्याने संपूर्ण दलित समाज आ . आवताडे यांच्या कार्यपद्धतीवर जाम खुश झाला आहे .

**सागर माने, माजी सरपंच, ( चोखामेळानगर, मंगळवेढा )**

# स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये इंडक्शन प्रोग्राम

आधुनिक केसरी न्यूज



**पंढरपूर :** गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ फार्मसी मधील प्रथम वर्ष डी.फार्मसी, बी.फार्मसी तसेच एम. फार्मसी मधील विद्यार्थ्यांसाठी अभ्यासाचाच एक भाग म्हणून एक दिवसीय 'इंडक्शन प्रोग्राम' घेण्यात आला.

स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ.बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांच्या नेतृत्वाखाली या इंडक्शन प्रोग्रामचे उदघाटन थेमीस फार्मास्युटिकल्सचे व्यवस्थापक कुबेर तरकसबंद यांच्या हस्ते करण्यात आले. दीप प्रज्वलनानंतर प्रा. स्नेहा घुले यांनी प्रास्ताविकात एक दिवसीय इंडक्शन प्रोग्राम आयोजित करण्यामागचा हेतू स्पष्ट केला. प्रा. प्रदीप जाधव यांनी बी. फार्मसीच्या स्थापनेपासुनची आत्तापर्यंतची वाटचाल सांगितली. प्रमुख पाहुणे कुबेर तरकसबंद हे मार्गदर्शन करताना म्हणाले की, 'येणाऱ्या काळामध्ये विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असे ज्ञान घेण्यासाठी, तसेच भविष्यात स्वतःसाठी नोकरीच्या विविध संधी निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या क्षेत्रात अधिक मेहनत घेणे आवश्यक आहे.




# लँड जिहादच्या विरोधात हिंदूंचा आक्रोश मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** अनेक दिवसापांसून काही समाज कंटकांकडून होणारा मानसिक व शारीरिक त्रास यासाठी सर्व हिंदू भगिनी व बांधवांनी कॉलनी परिसरातून मोर्चा काढण्यात आला व आयुक्तांना निवेदन देण्यात आले.

शहरातील प्रकाश टॉकीज जवळील छत्रपती शिवाजी महाराजांच्या से जिल्हाधिकारी कार्यालयात हा मोर्चा मढण्यात आला. मोर्चादरम्यान जोरदार करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकाप्यांना विविध शहरातील नटराज टॉलेज परिसरात मोठ्या प्रमाणात लॅण्ड जिहाद फोफावला आहे . शिवाय या परिसरातील हिंदूबहुल भागात नागरिकांना जाणूनबुजून त्रास देण्याचे प्रकार होत असून यामुळे अनेकांना आपली घरेदी लागत आहेत तसेच महिलांची छेडछाड करणे , मारहाणीच्या घटना जोरात हॉर्न बजघेता अशा प्रकारामुळे परिसरातील पारावर झाले आहेत . त्यामुळे लॅन्ड जिहादला आळा घालून समाजकंटकांचा बंदोबस्त करावा , यासाठी आज भाजपलवस्तीचा नेतृत्व कार्यालयावर मोर्चा महाराजांच्या निवेदन देण्यात आले .

शहरातील नटराज टॉकीज शेजारील आरक्षित पोलीस स्टेशनच्या जागेवरील जे अतिक्रमण काढले होते त्या जागेवर पुन्हा मतिरहेनटान टॉकीज शेजारील प्रशासनाच्या हॉस्पिटल तथा प्रस्तुतीगृहाठी आरक्षित असलेल्या तथा प्रस्तुतीगृहसाठी आरक्षित असलेल्या जागेवर मनपाची कोणतीही परवानगी बजघेता जवळपास २० हजार चौ . फुट पारावर संरक्षक मित बांधण्यात आली आहे चंद्रशेखर आझादनगरमधील अभय कॉलेज परिसरात सुमारे २५ ते ३० हजार नागरिक वस्तीचा आहे . त्या भागात प्रवेश करण्यासाठी एकमेय असलेला नटराज टॉकीज शेजारील रस्ताही समाजकंटव काळखोरांनी व्यापलेला असतो , विनाकारण कुणाशीहुत घालणे , त्या ठिकाणी मुख्य प्रवेशद्वारावर जाणूनबुजून ओसामा का जन्म दिन , शाहरु का जन्म दिन असे फालतूचे मोठमोठे होडींग लावने असे प्रकार सर्वस सुरु असतात हिंदूबहुल भागात घरफोड करून पुन्हा दुसऱ्या दिवशी त्या भागात फिरणे , हिंदूबहुल भागात जाणूनबुजून ट्रीपल सीट मोटरसायकल चालवून जोरजोरात हॉर्न वाजविणे , कोणाला का लागल्यास अरेरागी करूनळ करणे , असे प्रकार केले जातात , १३ जानेवारी रोजी एका दुधवाल्याचे चारचाकी वाहन अडवून त्यास विनाकारण मारहाण करून त्याचे चाहन वीजेच्या पोलवर वारंवार आदळूल नुकसान केले अशा समाजकंटकांमूळे परिसरातील मंदिरांचे पावित्र्यही धोक्यात आले आहे तसेच चोरी दिवसाढवळ्या घरात घुसून मोबाईल चोरी असे प्रकार करून दहशतीचे वातावरण निर्माण केले जेणेकरून तेथील हिंदू लोक तो भाग सोहण्यास प्रवृत्त व्हावेत तरी या सर्व प्रकाराला प्रशासकीय स्तरावर नटराज टॉकीज शेजारील आरक्षीत जागेवरील अतिक्रमण काढून त्या ठिकाणी लवकरात पोलीस ठाणे उभारावे , अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे . या मोर्चात माजी आमदार राजवर्धन कदमबांडे माजी महापौर प्रदीपक कर्पे चंद्रकांत सोनार , जयश्रीताई अहिराव , भाजपा ओबीसी मौर्याचे जिल्हाध्यक्ष दिनेश बागुल , भिकन वराडे , महादेव परदेशी , मायादेवी परदेशी प्रतिभाताईचौधरी , विनोद खेमनर चौधरी , भैय्या चौधरी , लक्ष्मीलाई बागुल आदीसह मनमाड़ जीन बडगुजार प्लॉट जलाराम बाप्पा मंदिर परिसर , हमाल मापाडी प्लॉट , नाटेश्वर कॉलनी , मोहन नगर , राजेंद्रसूरी नगर , अलंकार सोसायटी विश्वकर्मा नगर , माणिक नगर , शांतीनगर , साईप्रसाद कॉलनी , शिव कॉलनी , श्री रामनगर , रामचंद्र नगर लक्ष्मी नगर स्वामीनारायण कॉलनी , पवन नगर तसेच संपूर्ण चंद्रशेखर नगर परिसरातील हिंदू समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते .



# पेन्शनर्स असोसिएशनची वार्षिक बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** येथील उर्दू हायस्कूल येथे पेन्शनर्स असोसिएशनची वार्षिक बैठक जिल्हा अध्यक्ष द.मा. रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली दि. 22 जानेवारी रोजी संपन्न झाली. या बैठकीस जिल्हा उपाध्यक्ष मीराखान साहब, जि.सचिव चंद्रकांतराव जटाळ, एस.एस. कुरुडे, शेख हुसेन चौधरी, डॉ. पुष्पा कोकीळ, महेमुदा सुलतानाखा, येथील एस.बी. आय. बँकेचे शाखाधिकारी बद्रीनाथ चाटे, संस्थेचे अध्यक्ष महंमद जावीद व विविध तालुक्याचे ता. अध्यक्ष उपस्थित होते.

या वार्षिक बैठकीत पेन्शनरची सभासद संख्या वाढविणे, वेळेवर पेन्शन मिळणे, केंद्राप्रमाणे पेन्शन व महागाई भत्ता मिळावा, काल्पनिक पेन्शन योजना लागू करावी, अशासकीय अनुदानित शाळेतील शिक्षकांच्या समस्या, अनेक बायका असल्याने पेन्शन समस्या, पेन्शनर्सला भारत दर्शन करण्याची सवलत मिळावी आदी समस्यावर जिल्हा उपाध्यक्ष मीराखानसाब यांनी सविस्तर चर्चा केली. या कार्यक्रमात महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन पुणे च्या वतीने देण्यात आलेला राज्यस्तरीय उत्कृष्ट निवृत्त सेवा पुरस्कार प्राप्त जी. बी. पांचाळ, शेख हुसेन चौधरी, गंगाराम चातरमल, विठ्ठलराव रटकलवार यांचा शाल पुष्पहार देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उर्दू हायस्कूलचे अध्यक्ष जावीद यांनी वडील पै.जब्बारउद्दीनसाहब (माजी जिल्हा उपशिक्षणाधिकारी) यांच्या नावे पेन्शनर्ससाठी हॉल बांधून देण्याचे घोषित केले.

पेन्शन धारकांसाठी धर्माबाद शहारा मध्ये एकूण पाच ग्राहक सेवा केंद्र चाले केले आहे . ग्राहक सेवा केंद्रमध्ये निशुल्क पैशाचं वेव्हार करता येथे व पासबुक प्रिंट करणाची सुविधा आहे .व प्रति महिना पेन्शन ग्राहकांसाठी स्वतंत्र एक कर्मचारी दिले जाईल .

**बद्रीनाथ चाटे**

**एस .बी .आय . बँक शाखा व्यवस्थापक**

उर्दू शाळेच्या जागेमध्ये येणाऱ्या काही महिन्यात पेन्शन धारकांसाठी व जेष्ठ नागरिकांसाठी एक रूम व त्याच्या मध्ये LED व बसण्याचे यासान या सह वेगवेगळे साहित्य देण्यात येईल .

**महमद जावीद, उर्दू हायस्कूलचे संचालक**

# ममुराबादमध्ये आजपासून हरिनाम सप्ताह

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील ममुराबाद येथे गुरुवार दिनांक 26 1 2023 पासून अखंड हरिनाम सप्ताह सुरू होत आहे. सकाळी 4 ते 6 काकडा भजन भजनी मंडळी व महिला मंडळ ममुराबाद 6 ते 7 विष्णू सहस्त्र नाम 7 ते 11 ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण ह. भ.प कैलास महाराज वडगाव ह.भ.प. लक्ष्मण महाराज काळे 6 ते 7 सर्व परिसरातील भजनी मंडळी व रात्री 9 ते 11 किर्तन होईल. 11 ते 4 भाविकांचा हरीजागर होईल.

दि. 26/01/2023 गुरुवार ह.भ.प.नवनाथ महाराज जाधव आळंदी दी.27/01/2023 शुक्रवार ह. भ.प हेमलता ताई पिंगळे येवला दी.28/01/2023 शनिवार ह.भ.प एकनाथ महाराज जाधव संभाजीनगर
दि. 29/01/2023 रविवार ह.भ.प अर्जुन महाराज डोंगरगाव दि. 30/01/2023 सोमवार ह.भ.प कल्याण महाराज भुजंग संभाजीनगर दी.31/01/2023 मंगळवार ह.भ.प कृष्णा महाराज सरनाईक दि. 01/02/2023 बुधवार ह.भ.प मुरारी महाराज आनंदे दौलताबाद
दि. 02/02/2023 गुरुवार रोजी ह.भ.प. परमेश्वर महाराज काळे यांचे सकाळी 8 ते 10 काल्याचे किर्तन होईल नंतर महाप्रसाद होईल या कार्यक्रमाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे गावाचे पो.पाटील आईनाथ वेताळ व अफसर शेख, सरपंच कृष्णा गावंडे, आप्पासाहेब तुकाराम वेताळ, गणेश आहेर, संतोष तुकाराम वेताळ, जनार्दन रामकृष्ण वेताळ, सोपान वेताळ, पो.पा जानेफळ अमिन सय्यद, नाजीर शब्बीर पटेल, जावेद पटेल, प्रकाश जेठे, शिवाजी जेठे, पंढरीनाथ जेठे, एकनाथ जेठे, नामदेव जेठे, सुखदेव जेठे, भानुदास जेठे, भागिनाथ जेठे, कारभारी जेठे, जनार्दन जेठे, नारायण जेठे, पुंडलिक जेठे, सतीश जेठे, रत्नाकर जेठे, लक्ष्मण जेठे, सुभाष वेताळ, दाऊद पटेल, आनंदा आदबने, सुखदेव अंकल, बंडू वेताळ, पत्रकार सुधाकर जेठे, सोमीनाथ आदबने, गजानन तुकाराम वेताळ, ज्ञानेश्वर वेताळ, समस्त गावकरी मंडळी.

# हळदी कुंकवाला जाणाऱ्या महिलेचे मंगळसूत्र लंपास

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** हळदी कुंकुवाच्या कार्यक्रमाकरिता जात असलेल्या ५५ वर्षीय महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र आणि इतर दागिने चोरी केल्याचे प्रकरण समोर आले आहे. दुचाकीवरून पाठलाग करून दागिने हिसकावून पळून जात आसतानाच समोरून येणाऱ्या दोन तरुणांनी चोराला पकडले. त्यामुळे चोरी केलेला सर्व ऐवज पोलिसांच्या हाती लागला आहे.

व्दारकाबाई रत्नाकर वाघचौरे (रा. शितल माता गल्ली, कन्नड) या सोमवारी (दि. २३) दुपारी सव्वा बारा वाजताच्या शेजारी बेबी वाल्मीक माने, आशा नंदु मोरे यांच्यासोबत महीलांसाठी आयोजीत केलेले हळदी कुंकु कार्यक्रमासाठी जात होत्या. दीपक पेट्रोल पंपच्या पुढे जुने राष्ट्रीय महामार्ग (औरंगाबाद-धुळे) रस्त्यावर मोटरसायकल पाठीमागे येवून थांबली व अचानक त्याने गळ्यात असलेले गळयातील सोन्याचे अंदाजे ५ ग्रॅमचे मंगळसूत्र व अंदाजे ५ ग्रॅमचे दागिने असा एकुण ३०,०००/- रुपयांचा मुद्देमाल त्याच्याकडून जप्त करण्यात आला. सोन्याचे मनी मंगळसूत्र व एकदानी ओढून दुचाकीस्वार पळुन जात होते. याच दरम्यान जोरात महिलेने आरडाओरडा केल्यानंतर समोरुन येणाऱ्या मधुकर काळे व कमलेश किशोर कदम (रा. बाजारपट्टी, कन्नड) यांनी चोरांना पकडले. यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे उपतालुका प्रमुख शिवाजी थेटे यांनी पोलीसांना या घटनेची माहिती दिली. ही घटनेची माहिती मिळताच सपोनि दिनेश जाधव, उपनिरीक्षक भूषण सोनार, पोकॉ विश्वास कुलकर्णी, बर्डे यांनी तात्काळ पोहोचून आरोपी रजनीकांत पुंजराम त्रिभुवन (वय २४, रा. वैजापूर) यास अटक केली. तसेच चोरीस गेलेला ऐवज त्याच्याकडून हस्तगत करून त्याच्या विरुद्ध कलम ३९२ नुसार गुन्हा दाखल केला.